कोल्हापूर संस्थानांतील

# आठवड्याचे बाजार

(पाहाणी व पुनर्घटना)

—— × १९४७ × ——

X:51.23144
H7
020710

सुधारणा विचार प्रकाशन . . . . . . ७

SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY
PUNE 411 004

CN
AcN 20710

Date of release for loan

This book should be returned on or before the last date stamped below.

*An overdue charge of 5 paise will be levied for each day the book is kept beyond this date.*

7 JUL 1980

M. S. M.]

कोल्हापूर संस्थानांतील

# आठवड्याचे बाजार

## ( पाहाणी व पुनर्घटना )

: लेखक :

कृष्णराव गोविंद नागेशकर

डी. एम्. ई. ( बॉम्बे );

ए. एम्. टेक्. आय्. ( ग्रेट ब्रिटन )

मार्केटिंग ऑफिसर व चीफ इन्स्पेक्टर वजन माप खातें,

इलाखा करवीर

× १९४७ ×

सुधारणा विचार प्रकाशन . . . . . . ७

प्रकाशक :—
बी. गो. पंडितराव,
बी. ए. (ऑ.)
पब्लिक रिलेशन्स ऑफिसर
कोल्हापूर स्टेट.

( अधिकृत प्रकाशन )
मूल्य १ रुपया

मुद्रक :—
कृ. ह. सहस्रबुद्धे,
प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापू

# प्रकाशकाचें निवेदन

★

कोल्हापूर संस्थानांतील व्यापारपेठा या प्रकाशनाप्रमाणेंच, आठवड्यांच्या बाजाराबाबतची माहिती एकत्रित नि शक्य तों तपशीलवार देणारें प्रस्तुत प्रकाशनही जिज्ञासूंच्या मान्यतेस पात्र होईल अशी आशा वाटते.

आठवड्याचे बाजार ही सामाजिक संस्था जुनी असली तरी सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक संघर्षणाच्या दृष्टीनें तिचें थोर महत्व आजवर तितकेसें विचारांत घेतलें गेलें नव्हतें. ही संस्था जनतेच्या आवश्यकतेतून आणि कांहीं नैसर्गिक सोयींतून जशी विकास पावली, तशीच त्याच आधारावर ती आजवर अबाधित राहिली आहे.

आतां इथून पुढचा काळ राष्ट्रीय पुनर्घटनेचा आहे. इंग्रजी अमदानींत सत्तेचें केंद्रीकरण झालें, देशाचा एक स्वतंत्र घटक हें गांवाचें स्वरूप नाहींसें झालें. पण आतां आपण परत खेड्याकडे स्वयंपूर्ण घटक या नात्यानें पाहात आहों तें अपरिहार्य झालें आहे. तद्वत्‌च आठवड्याचे बाजार हेही सामाजिक जीवनाचीं केंद्रें म्हणून विचारांत घेतले जातील व त्या भूमिकेवर पुनर्घटनेचे कांहीं कार्यक्रम आधारले जातील हें संभाव्य आहे.

अतएव, प्रस्तुत प्रकाशनांत एकत्रित आणलेली माहिती अनेकदृष्ट्या महत्त्वाची व मौलिक ठरेल; व ती परिश्रमपूर्वक संकलित केल्याबद्दल कोल्हापूर संस्थानच्या व्यापारपेठा व वजनमाप या खात्याचे प्रमुख श्री. के. जी. नागेशकर यांना वाचक खचित धन्यवाद देतील.

या पुस्तकाच्या वाचनानंतर प्रस्तुत विषयावर कांहीं सूचना करणें झाल्यास त्या अवश्य कराव्यात; त्यांचा आग्रहपूर्वक विचार केला जाईल.

२५ मे १९४७
कोल्हापूर.

नी. गो. पंडितराव
पब्लिक रिलेशन्स ऑफिसर,
संस्थान कोल्हापूर.

# अनुक्रमणिका

करवीर इलाखा ( नकाशा ) ... ... ...
प्रास्ताविक ... ... ... ...
उपोद्घात ... ... ... ... १

## बाजारांची पाहाणी

पेटा करवीर ... ... ... ३ ते १२

१ कांडगांव, २ इसूर, ३ खेबवडे, ४ इस्पुर्ली, ५ सांगरूळ.

पेटा शिरोळ ... ... ... १२ ते १६

१ घोसरवाड, २ दत्तवाड, ३ नांदणी, ४ शिरोळ.

पेटा हातकणंगलें ... ... ... १६ ते ३०

१ हेर्लें, २ पारगांव, ३ सांगाव, ४ वठार तर्फ वडगांव, ५ कुंभोज, ६ हातकणंगलें, ७ रुकडी, ८ यळगूड, ९ आळतें बाजारकेंद्र, १० रेंदाळ, ११ हुपरी, १२ वडगांव.

पेटा पन्हाळा ... ... ... ३० ते ४६

१ पन्हाळा, २ कळें, ३ कोतोली, ४ सातवें, ५ माळें, ६ पडळ, ७ बाजारभोगांव, ८ कोडोली.

जहागीर गगनबावडा ... ... ... ४६ ते ५७

१ तिथिगी, २ गगन बावडा, ३ धुंदवडें, ४ मुई बावडा, ५ राशिवडें, ६ पळसंबें.

पेटा राधानगरी ... ... ... ५८ ते ७२

१ राधानगरी, २ घोटवडें, ३ सरवडें, ४ वाळवें, ५ ठिकपुर्ली, ६ धामूड, ७ का॥ तारळें.

पेटा गारगोटी ... ... ... ७२ ते ८०

१ गारगोटी, २ पिंपळगांव, ३ पाटगांव, ४ शेणगांव, ५ मडिलगें बु॥

पेटा गडहिंग्लज ... ... ... ८० ते ८५

१ नेसरी, २ शिरगांव, ३ नूल.

महाल शाहूवाडी ... ... ... ८६ ते ९२

१ भेडसगांव, २ सरूड, ३ बांबवडें.

महाल रायबाग ... ... ... ९३ ते ९७

१ चिचली, २ रायबाग, ३ भेंडवाड, ४ पट्टण कोडोली.

महाल कटकोळ ... ... ... ९७ ते १००

१ कटकोळ.

जहागीर विशाळगड ... ... ... १०० ते १०३

१ महागांव, २ कापशी.

जहागीर कागल (सी.) ... ... ... १०३ ते १०९

१ कागल, २ मुरगूड, ३ चिखली.

जहागीर इचलकरंजी ... ... ... १०९ ते ११४

१ मणेराजुरी, २ भैरेवाडी, ३ उत्तूर, ४ आरग.

जहागीर तोरगळ ... ... ... ११४ ते ११५

१ चंदरगी.

जहागीर कागल (ज्यू.) ... ... ११५ ते ११८

१ म्हाकवें, २ शेंडूर, ३ गोरंबें.

जहागीर हिंमतबहादूर ... ... ... ११८ ते १२१

१ किणी बाजारकेंद्र, २ हलकर्णी.

जहागीर कापशी ... ... ... १२२ ते १२५

१ कापशी, २ खडकलाट.

बाजार योजना व त्यावरील खर्चासह तपशील ... १२६ ते १३८

—*—

# उपोद्घात

शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास केला तर आपणास असें दिसून येईल कीं त्यांत मुख्यतः तीन गोष्टींचा समावेश होतो:—

१ शेतामध्यें कसून निरनिराळ्या तऱ्हेचा माल तयार करणें;

२ शेतामध्यें तयार झालेल्या मालाची बाजारांत विक्री करणें व स्वतःच्या जीवनास लागणाऱ्या पण स्वतःस उत्पादन करतां न आलेल्या वस्तूंची खरेदी करणें; आणि

३ शेतांत पिकलेला माल विकून जी रक्कम येते तिचा योग्य रीतीनें विनियोग करणें.

मार्केटिंग खात्याचें मुख्य कार्यक्षेत्र म्हणजे वर दिलेल्या तीन बाबीं-पैकीं दुसरी बाब होय. आमचा आजचा शेतकरी हा बहुधा अडाणी व अदूरदर्शी आहे. मालाची खरेदीविक्री करतांना त्याला बाजारपेठेंत यावें लागतें व हा सर्व व्यवहार धंदेवाईक व्यापाऱ्यांच्या मार्फत करावा लागतो. सर्वसाधारणपणें व्यापारी हा वर्ग शहाणा व धूर्त असलेमुळें व्यापारी-शेतकरी या संबंधांत शेतकऱ्यांचेंच नुकसान एकंदरीनें होतें असा अनुभव आहे. म्हणूनच शेतकऱ्याच्या हिताचें रक्षण करून त्याला त्याच्या मालाबद्दल जास्तींत जास्त किंमत मिळवून देणें किंवा त्याला लागणारा माल शक्य तितक्या कमी किंमतींत मिळवून देणें हेंच मार्केटिंग खात्याचें मुख्य काम आहे. हा सर्व खरेदीविक्रीचा व्यवहार "बाजार" या सामाजिक संस्थे-तूनच होत असल्यामुळें बाजारांचें नियमन व सुधारणा करणें हें मार्केटिंग खात्याचें सर्वांत महत्त्वाचें कर्तव्य होय हें उघड आहे.

या हेतूनें संस्थानच्या मार्केटिंग खात्यानें संस्थानांतील सर्व बाजारांची पाहाणी करण्याचें ठरविलें; कारण अशा पाहाणीनंतरच खात्याच्या कार्य-क्रमाची आंखणी करणें शक्य होणार आहे. संस्थानांतील बाजारपेठांपैकीं कोल्हापूर, इचलकरंजी, जयसिंगपूर, गडहिंग्लज, मलकापूर व वडगांव या ठिकाणच्या बाजारपेठा फारच मोठ्या व महत्त्वाच्या आहेत. म्हणून त्यांची पाहाणी करण्याकरितां दरबारनें एक स्वतंत्र समिती नेमिली होती व तिचा अहवाल नुकताच प्रसिद्ध करणेंत आला आहे. उरलेल्या गांवीं लहान-

मोठ्या प्रमाणांत आठवड्याचे बाजार भरतात. या बाजारांची पाहाणी वजनमाप खात्याच्या इन्स्पेक्टर्स कडून करविणेंत आली व त्यांचीच माहिती इत्थंभूतपणें या पुस्तकांत देण्यांत आली आहे.

प्रत्येक बाजाराची पाहाणी करतांना पुढील गोष्टींकडे लक्ष देण्यांत आलें होतें:—

१ बाजार भरणाऱ्या गांवाचें नांव.

२ लोकसंख्या.

३ बाजाराचा दिवस.

४ कोणते गांवचे लोक येतात?

गांवांचीं नांवें, अंतर व लोकसंख्या.

५ बाजार भरण्याची जागा.

६ बाजारांत प्रामुख्यानें विक्री केले जाणारे जिन्नस.

७ एका बाजारांत किती रकमेची उलाढाल होते?

८ एका वर्षामध्यें बाजार सारखाच भरतो कीं कमीअधिक प्रमाणांत भरतो?

९ गुरांचा बाजार भरतो किंवा नाहीं? भरत असलेस त्यासंबंधीं साग्र माहिती.

१० बाजाराच्या गांवीं रस्ते, पाणी, बसण्याकरितां जागा, धर्मशाळा वगैरे सोई कोणत्या प्रमाणांत आहेत?

११ बाजारासाठीं हव्या असणाऱ्या सुधारणा व त्यांस लागणारा अंदाजी खर्च.

याप्रमाणें प्रत्येक बाजाराची पाहाणी करणेचें काम जून १९४६ मध्यें सुरू झालें व डिसेंबर १९४६ मध्यें पुरें करण्यांत आलें. या कामीं खात्यांतील सर्व इन्स्पेक्टर्सनीं कसोशीनें मदत केली व त्यामुळेंच हा अहवाल मला इतक्या लवकर सादर करतां आला. या त्यांच्या मदतीबद्दल व सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

—लेखक.

## पेटा करवीर : १ कांडगांव

कांडगांव हें गांव कोल्हापूर–राधानगरी रस्त्यावर कोल्हापूरपासून सुमारें ८ मैल लांब आहे. गांव रस्त्यावर असल्यामुळें व पाण्याची सोय चांगली असल्यानें गांवाच्या तक्रारी अशा विशेष नाहींत. या गांवीं कांडगांव को. क्रे. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

(२) गांवाची लोकसंख्या–१०५४ आहे. बहुतेक लोक शेतकरी आहेत.

(३) आठवड्याचा बाजार गुरुवारीं दुपारीं ३ ते ६ पर्यंत भरतो.

(४) या बाजारास खालील गांवचे ५० ते ७५ लोक येतात:—

| गांवाचें नांव. | लोकसंख्या. | अंतर मैल. |
|---|---|---|
| वाशी | १६३१ | २ |
| नंदवाळ | ४३६ | २ |
| जैताळ | २१४ | २ |
| देवाळे | १६५० | २ |
| हळदी | ९६७ | १॥ |
| सडोली | १२८५ | १॥ |
| आरे | १२७३ | २॥ |
| भहे | ७७० | २॥ |

(५) गांवाचे सुरवातीसच चावडी आहे व चावडीपुढें जी मोकळी जागा आहे, तेथें बाजार भरतो.

(६) जोंधळा, तांदूळ, मटण, भाजीपाला हे विक्रीचे प्रमुख जिन्नस होत.

(७) सुमारें रु. १५०ची उलाढाल हल्लीं होते. पूर्वी १०० ते १२५ लोक बाजारास येत असत व ४०० ते ५०० रु. ची उलाढाल होत असे.

(८) पावसाळ्यांत Shade नसलेनें बाजाराची कुचंबणा होते म्हणून
लहान बाजार असतो. इतर वेळीं वर दिलेप्रमाणें बाजार भरतो.

(९) गांवांत येण्यास रस्ता सुंदर आहे. पाणी आहे. फक्त सावली
व Shade नाहीं.

(१०) जरूरीच्या सोयी—

बाजारास उपयोगाची धर्मशाळा अगर लहानशी Shade बांधून
मिळावी.

चार दोन झाडें गांवांतील लोक लावणेस तयार आहेत. पण बाजारचे
ठिकाणीं तशी जागा नाहीं.

## पेटा करवीर : २ हसूर

कोल्हापूर–राधानगरी रस्त्यावर कोल्हापुरापासून १२ मैलांवर हा
गांव असून, येथें बाजार उत्तम भरतो. गांवांत व्यापाऱ्यांची संख्या १०।१२
आहे. मराठी ४ थीपर्यंत गांवीं शिक्षणाची सोय आहे. लोक गरीब व
सामुदायिक रीतीनें कार्य करावें अशा विचाराचे आहेत. या गांवीं हसूर
को. के. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) गांवची लोकसंख्या १२२७ आहे व त्यामध्यें मराठा व हरिजन
यांचा भरणा फार आहे.

(३) आठवड्याचा बाजार दर मंगळवारीं दुपारीं १ ते ६ पर्यंत भरत
असतो.

(४) आठवड्याच्या बाजाराकरितां खालील गांवचे सुमारें १०००
लोक जमतात:—

| गांवाचें नांव | लोक संख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| कोथळी | ८७२ | २ |
| हरवडे | ६०० | १॥ |
| म्हे | ७७० | ५ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| आरे | १२७३ | ४ |
| हळदी | १६७ | ४ |
| सडोली | ४९८ | २ |
| घानवडे | ३९१ | ३ |
| मा. शिरोळी | १६९७ | ३ |
| म्हारूळ | ८६० | ६ |
| हिरवडे | ३३२ | २ |
| बीड | २४२५ | ६ |
| दोनवडे | ५९९ | |
| सावर्डे | ६८४ | ३ |

याशिवाय सोनाळी, मासवडे, कांचनवाडी, माटेवाडी, चांदे, घामूड, आरळे, घानवडे, पाल, गर्दन, मांडरे, चामोडी, गाडीगोंड, कांडगांव, नंदगांव या गांवचे लोक जमतात.

(५) गांवाचे पश्चिमेस, गांवालगत माळावर बाजार भरतो.

(६) तांदूळ, भात, जोंधळा, मिरची, सर्व तऱ्हेचें कापड हे विक्रीचे मुख्य जिन्नस होत. परंतु संसारास लागणारा हरएक तऱ्हेचा माल या बाजारांत मिळतो.

(७) या बाजारांत सुमारें ६००० रु. ची उलाढाल होते. मोसमाचे वेळीं बाजार उत्तम भरतो व त्यावेळीं ८००० रु. पर्यंत उलाढाल होते.

(८) पावसाळ्यांत बाजार कमी भरतो व नोव्हेंबर ते मे अखेर बाजार उत्तम भरतो.

(९) गुराचा बाजार भरत नाहीं.

(१०) बाजाराच्या गांवीं (approach road) जोड-रस्ता नसल्येनें लोकांची गैरसोय होते. पिण्याच्या पाण्याची सोय नाहीं. सावलीची सोय थोडीशी आहे. धर्मशाळा नाहीं.

**(११) बाजारासाठीं हव्या असणाऱ्या सुधारणा—**

जोड-रस्त्यांची जरूरी फार आहे. कोल्हापूर-राधानगरी रस्ता या गांवापासून १॥ मैल अंतरावर आहे.

हसूर ते राशिवडें व हसूर ते धामवडें हा रस्ता तयार केल्यास सुमारें १५–२० खेड्यांची सोय होऊन व्यापार वाढेल.

बाजारचे ठिकाणीं आणखी ५, ६ झाडें लावून सावलीची सोय बाजारास दिली पाहिजे.

हसूर ते माळ्याची शिरोली हा रस्ता तयार झाल्यास ८ खेड्यांची सोय होणार आहे.

बाजारचे ठिकाणीं धर्मशाळा अगर Shade बांधली असतां खेडु-तांची व व्यापाऱ्यांची सोय होईल.

बाजारचे ठिकाणीं विहीर पाहिजे. बाजारचे लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय नाहीं.

गांवांत राहण्यास अपुरी जागा असल्यानें, गांवाचें बाहेर (पश्चिमेस माळावर) सुमारें २० (Blocks) जागा व्यापाऱ्यांना दिल्यास व्यापारी, घरें अगर दुकानें त्या बाजूस बांधण्यास तयार आहेत.

## पेटा करवीर : ३ खेबवडें

कोल्हापुराहून खेबवडें १४ मैल लांब आहे. कोल्हापूर ते इस्पुर्ली मोटाररस्ता व तेथून ३ मैल पायवाटेनें जावें लागतें. वाटेमध्यें दूधगंगा नदी लागते. पूल नसल्यानें पावसाळ्यांत जाण्याची अडचण आहे. गांवीं मराठी ४ इयत्तेपर्यंत शिक्षणाची सोय आहे. या गांवीं बाजारासाठीं कागल ज. मधून व्यापारी व खेडूत येत असतात.

(२) या गांवची लोकसंख्या १३२४ आहे. बहुतेक सर्व शेतकरी आहेत.

(३) आठवड्याचा बाजार मंगळवारीं दुपारीं २ ते ७ वाजेपर्यंत भरतो.

(४) या बाजारास खालील गांवचे लोक जमतात:–

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| कावणे | ६७१ | ५ |
| बंदूर | ११२७ | ४ |
| शेंड्डूर | १४९४ | २ |
| साके | ११७५ | ३ |
| व्हनाळी | ९२१ | २ |
| खेबूड बाचणी | ८८३ | २ |
| येड्डूर | ४४९ | (ही गांवे नकाशावर सांपडत नसलेनें मैल अंतर लिहितां आलेलें नाहीं.) |
| गोरंबे | १२२१ | |
| कॅबळी | ५४४ | |

याखेरीज कोगनोळी, कागल, एकोंडी, नंदगांव, नागांव, बाचणी, हमुर्ली, वडक शिवाले, निगवे, भुवे या गांवचे मिळून सुमारें ७०० ते ८०० लोक येतात.

(५) बाजार भरणेची जागा—चावडी शेजारी मोकळ्या जागी बाजार भरतो.

(६) तांदूळ, जोंधळे, भाजीपाला हे विक्रीचे मुख्य जिन्नस आहेत. परंतु इतर हरएक तऱ्हेचा शेतकऱ्याच्या जीवनाला उपयुक्त असणारा माल विकत मिळतो.

(७) दर बाजारीं सुमारें ३ ते ४ हजार रुपयांची उलाढाल होते.

(८) पावसाळ्यांत बाजार कमी भरतो. दूधगंगा नदीवर पूल नाहीं त्यामुळें अडचण. हंगाम संपल्यानंतर म्हणजे डिसेंबर ते एप्रिल अखेर बाजार मोटा भरतो.

(९) गुरांचा बाजार येथें भरत नाहीं.

(१०) एकहि पक्का रस्ता नाहीं. सर्वच कच्चे रस्ते, पायवाटा. त्यामुळें पावसाळ्यांत गैरसोयीचें, बाजारास सावलीची जागा, धर्मशाळा, पिण्याचें पाणी यापैकीं एकहि नाहीं.

(११) जरूर असलेल्या सुधारणा—

जोडरस्ता या गांवास असणें जरूर आहे. बाजारासाठीं विहीर, धर्मशाळा व सावलीची सोय या गोष्टी या बाजारास हव्या आहेत.

हें गांव दूधगंगा नदीनें दोन्ही बाजूंनीं वेढलें गेलेलें आहे. परंतु त्यावर धरण नसलेनें पावसाळ्यांत येथें जाणें दुरापास्त आहे. तेव्हां एकादें झाल्यास वाहतुकीस बरें.

## पेटा करवीरः ४ इस्पुर्ली

कोल्हापूर—गारगोटी रस्त्यावर, कोल्हापुरपासून इस्पुर्ली ११ मैल लांब आहे. गांव रस्त्यावर असल्यानें पुढारलेला आहे. व्यापाऱ्यांची संख्या मात्र विशेष नाहीं. या गांवीं इस्पुर्ली हनुमान को. क्रे. सोसायटी अन्‌लि. या नांवाची संस्था आहे.

(२) गांवची लोकसंख्या ७७९ असून मराठा व हरिजन यांचाच भरणा सर्वांत अधिक आहे.

(३) आठवड्याचा बाजार दर शुक्रवारीं दुपारीं १ ते ६ पर्यंत भरतो.

(४) या बाजारास आसपासच्या सुमारें २०।२२ खेड्यांतील लोक व्यापारास येतातः—

| गांवाचीं नांवें | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| दिंडनेर्ली | १८५८ | ३ |
| नागांव | ६५३ | २ |
| नंदगांव | १२५१ | ३ |
| कुरह | ६१० | १॥ |
| म्हालुंग | १२३९ | ३ |
| यवती | ८७३ | १॥ |
| निगवें | २१८३ | ५ |
| ठिपकुर्ली | १६९५ | ५ |
| वडकशिवाले | ७६१ | २ |
| येकुंडी | ९८६ | ४ |
| चुये | ९८१ | २ |

याशिवाय कांडगाव, गोरंबे, कोगनोळी, कोल्हापूर, खेबूड, हळदी, राशिवडें, केंबळा, वडगाव या सर्व खेड्यांचे मिळून ७०० ते ८०० लोक बाजारास जमतात.

(५) रस्त्याशेजारी धर्मशाळा आहे. व धर्मशाळेजवळ मोकळें पटांगण आहे, तेथें बाजार भरतो.

(६) कडधान्यें, तांदूळ, कापड, भाजीपाला हे विक्रीचे प्रमुख जिन्नस असून इतर सर्व संसारास लागणारे जिन्नस येथें विकत मिळतात.

(७) अंदाजें ३ ते ४ हजार रुपयांची उलाढाल प्रत्येक बाजारीं होते.

(८) पावसाळ्यांत बाजार कमी, इतर वेळीं मोठा, व पिकांचा हंगाम व गुऱ्हाळें आटपल्यानंतर म्हणजे जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत बराच मोठा बाजार भरतो.

(९) जनावरांचा बाजार येथें भरत नाहीं.

(१०) कोल्हापूर–हरपुर्ली हाच पक्का रस्ता या बाजूस आहे. इतर सर्व पायवाटा. त्यामुळें पावसाळ्यांत निरुपयोगी. धर्मशाळा आहे. पाण्याची सोय आहे. सावलीची सोय थोड्या प्रमाणांत आहे.

(११) बाजारास जरूरीच्या सोयी—

(अ) आजूबाजूच्या खेड्यांतून येणाऱ्या पायवाटांवर ओढे आहेत त्या ठिकाणीं मोऱ्या बांधणें जरूर आहे.

(ब) बाजाराजवळ विहीर असावी.

(क) सावलीसाठीं बाजाराजवळ आणखी थोडीं झाडें तयार करावीं लागतील.

## पेटा करवीर : ५ सांगरूळ

हा गांव कोल्हापूर–कळे रस्त्याच्या बाजूस कोल्हापुरापासून ९ ते १० मैल अंतरावर आहे. रस्त्यापासून ३ मैल आडवाटेनें जावें लागतें. जोडरस्ता नाहीं. गांवीं कोष्ट्यांची वस्ती बरीच होती. पण हल्लीं सूत मिळत

नसल्यानें, पोटासाठीं कोष्टी गांव सोडून इचलकरंजीस गेले आहेत. पिण्याचें पाणी फार लांबून आणावें लागत असल्यानें सुखवस्तु लोकहि परगांवीं रहाण्यास गेले आहेत. मराठी ७ वी पर्यंत शिक्षणाची येथें सोय आहे. शेतकऱ्यांची वस्ती येथें जास्त आहे. पंधरा व्यापारी आहेत. या गांवीं सांगरूळ श्रीपांडुरंग को. क्रे. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) गांवची लोकसंख्या ३१३४ आहे.

(३) आठवड्याचा बाजार गुरुवारीं दुपारीं २ ते ६ वाजेपर्यंत भरत असतो.

(४) या बाजारास खालील गांवचे लोक जमतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| खाटांगळें | ७६९ | १॥ |
| आमशी | ९३७ | २ |
| म्हारूळ | ८६० | २ |
| चीड | २४२५ | ३ |
| कोगे | १४६६ | ३ |
| कुडित्रे | ११८१ | २ |
| वाकरे | १५८२ | ३ |
| खुपिरे | २३१० | ४ |
| कोपार्डे | ८५६ | १॥ |
| बालिंगे | ४७६ | ४ |

याशिवाय उपवडे, बोळोली ( १२ वाड्यांसह ), मा. शिरोली, घोडेवाडी, बामणी, दोनवडे, शिंदेवाडी, सातार्डे, वाघुर्डे, सुळे, आकुर्डे, गोगवे, पनोरे, म्हासुर्ली वगैरे गांवचीं सुमारें २००० माणसें या बाजारास जमतात.

(५) गांवचे पश्चिमेस गांवालगत एक डोंगर आहे. त्या डोंगराचे पायथ्यास बाजार भरतो. सदर जागा एका पातळींत (Level) नाहीं.

(६) तयार कपडे, मिरची, चौघळे, तांदुळ, तेल हे विक्रीचे प्रमुख जिन्नस असले तरी इतर नेहमींचा सर्व माल बाजारांत विक्रीस येतो.

( फ ) बाजारचे जागीं धर्मशाळेची जरूरी आहे. पावसाळ्यांत लोक शाळेमध्यें जाऊन बसतात.

(७) बाजारांत उलाढाल ३००० ते ४००० रु. ची होते. खाद्य-धान्यावर कंट्रोल नव्हतें त्यावेळीं ६००० रु. ची उलाढाल होत असे.

(८) पावसाळ्यांत बाजार अगदीं कमी भरतो. वाटेंत आडवी नदी आहे, व बाजारांत आडोशासाठीं धर्मशाळा वगैरे कांहीं नाहीं. इतर वेळीं बाजार बरा भरतो.

(९) येथें जनावरांचा बाजार नाहीं.

(१०) बाजारास सावली विशेष नाहीं. धर्मशाळा व पाण्याची सोय नाहीं. जोड–रस्ता नसल्यानें पावसाळ्यांत अति कुचंबणा होते.

(११) बाजार वाढ होणें झाल्यास जरूरीच्या सुधारणा––

( अ ) बाजारची जागा वाढविणें जरूरीचें आहे. त्याकरितां बाजारामध्यें असलेल्या वडाच्या झाडाचा पार काढून टाकावा लागेल.

( ब ) बाजाराची जागा एका पातळींत नाहीं. त्यामुळें लोकांना सरळ बसतां येत नाहीं.

( क ) बाजारची जागा टेंकडीच्या पायथ्याशीं असल्यानें, पाव-साळ्यांत टेंकडीवरून येणारें पाणी, बाजारामधून वाहतें. म्हणून लोकांना नीट बसतांसुद्धां येत नाहीं. तरी चाच मारून पावसाळी पाणी बाहेर काढून देणें जरूरीचें आहे.

( ड ) पावसाळ्यांत या गांवचे लोकांचे अति हाल आहेत. दोन बाजूनें कुंभीनदी, एका बाजूनें उंच टेंकडी त्यामुळें पावसाळ्यांत रहदारी बंद असते. तरी जोड–रस्ता होणें अति जरूरीचें आहे. लोकांनीं गांवमदतीनें पूर्वी थोडा रस्ता केला आहे. पण तो पूर्ण झाला नाहीं.

( इ ) या गांवीं पिण्याच्या पाण्याचे अति हाल. मग बाजारास पाणी तरी कोठून मिळणार! गांवापासून २ मैल अंतरावर टेकडीवर पाणी साठवण्यासाठी उत्तम जागा आहे. तिन्ही बाजूनीं टेकड्या आहेत. एका बाजूनें बांध घालून पाणी अडविलेस, मोठा तलाव होणें अगदीं शक्य आहे. गांवचे पाण्याचे हाल नाहींसे होतीलच पण शेतीसही हें पाणी देतां येईल.

(ग) व्यापाऱ्यांना व इतर लोकांना वसाहतीसाठीं जागा पाहिजे-गांवांत जागा नाहीं व गांवालगत वसाहतीयोग्य जागा आहे.

(ह) पिण्याच्या पाण्याची सोय झाली कीं, येथल्या लोकांची जनावराच्या बाजाराची मागणी आहे.

या बाबारची आजूबाजूचे खेड्यांना फार जरूरी आहे.

## पेटा शिरोळ : १ घोसरवाड

कोल्हापूर–कुरुंदवाड रस्त्यावर हा गांव आहे. या गांवीं घोसरवाड को. क्रे. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या २३२७ असून मुख्य वस्ती मराठे लोकांचीच आहे.

(३) रविवारीं सायंकाळीं ४ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत येथील बाजार भरतो.

(४) पूर्वी बाजारास दुसऱ्या गांवचे लोक येत असत. दत्तवाडास बाजार झाल्यापासून स्थानिक लोकांव्यतिरिक्त बाहेरचे कोणी येत नाहींत.

भाजीपाला वगैरेचीच विक्री बाजारांत होत असलेनें ५०–६० रुपयां-पेक्षां जास्त उलाढाल होत नाहीं.

दत्तवाडचा बाजार वाढीस लागल्यानें त्याचा परिणाम या गांवचे बाजारावर झाला आहे. बाजार म्हटला तर भरतो म्हटला तर न भरतो अशा स्थितींत आहे.

बाजार चावडीसमोर भरतो.

## पेटा शिरोळ : २ दत्तवाड

कुरुंदवाडच्या पलीकडे करवीर संस्थानचा जो आठ खेड्यांचा विभाग आहे त्यांपैकीं सर्वांत महत्त्वाचा विशेषतः व्यापारीदृष्ट्या दत्तवाड हा गांव होय. या गांवीं दत्तवाड को. क्रे. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

जैन, लिंगायत, मराठा व हरिजन जवळ जवळ सारख्या प्रमाणांत असून एकूण लोकसंख्या ३१५५ आहे.

बुधवारीं बाजार भरतो. बाजार भरूं लागतो तो तिसऱ्या प्रहरीं व उठतो अंधार पडूं लागतांच.

बाजाराकरितां खालील गांवचे अदमासें दोनतीन हजार लोक येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| दानवाड | १८८१ | १॥ |
| घोसरवाड | २३२७ | २ |
| खिद्रापूर | ११२२ | ८ |
| हेरवाड | १९२१ | ६ |
| तेरवाड | ५२५ | ५ |
| बस्तवाड | ८३१ | ७ |

बाजार भरतो तो इनामदारांच्या वाड्यासमोरील पटांगणांत व त्यास लागून असलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंस.

बाजारांत जोंधळा व इतर कडधान्यें, कापड, मिठाई, भाजीपाला इत्यादींचा व्यवहार होतो. साधारणतः ४०००, ४५०० हजारांची उला-टाल दर बाजारीं होत असावी, असा अंदाज आहे.

पावसाळ्याचे कांहीं दिवस सोडून दिल्यास बाजाराचे स्थितींत पालट होत नाहीं.

गुरांचा बाजार भरतो, परंतु तो अत्यंत अल्प प्रमाणांत. विशेष उल्लेखनीय असा नाहीं.

कोल्हापूर—कुरुंदवाड या पक्क्या रस्त्यापासून दोन मैल आंत दत्तवाड वसलें आहे. दत्तवाडहून आजूबाजूंच्या गांवांना जोडणारे गाडीरस्ते आहेत. बांधलेले नाहींत.

पाण्याचे दृष्टीनें अत्यंत दुर्दैवी गांव आहे. नदीचें पाणी गांवांत आणून पाणी पुरवठा करण्याची पूर्वतयारी झाली असून नदींत जल—खेचक यंत्रें बसवण्यासाठीं एक इमारतही बांधली आहे. योजना पुरी झाल्यास चांगली सोय होण्यासारखी आहे.

दत्तवाड ही या भागांतील जयसिंगपूर खालोखाल तंबाखूची पेठ आहे; परंतु ती दुर्लक्षित आहे. किंचित् लक्ष पुरविल्यास व व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रयत्न केल्यास ही चांगल्यापैकीच पेठ होऊं शकेल. व्यापार हरिजनांच्या हातीं आहे ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे.

बाजार तूर्त ज्या जागेंत भरतो ती जागा व्यापारवाढीच्या दृष्टीनें अत्यंत अपुरी आहे. तेव्हां गांवाच्या पूर्वेस मारुतीचे देवळानजीक सरकारी शाळेशेजारील पटांगण हें बाजारकेंद्राच्या दृष्टीनें विशेष सोईस्कर होईल.

## पेटा शिरोळ : ३ नांदणी

सरदार पाटणकरांचा हा गांव. गांव मोठा असून पूर्वी या गांवापर्यंत जाईल अशी बांधलेली सडक होती. त्या वेळीं ही एक लहानशी व्यापारी पेठच होती. आज पूर्वीचें वैभव पार मावळलें असून व्यापार मोडकळीसच आलेला आहे. चामडी कमावण्याचा धंदा येथे फार मोठ्या प्रमाणांत चालतो. पुष्कळ लोकांच्या उपजिविकेचें तें साधन आहे. कमावण्याचा धंदा मात्र जुन्या पद्धतीनेंच चालतो. शिवाय १००–१५० हातमागही नवीन बसविलेले आहेत. हा धंदाही जोम धरूं पाहात आहे. या गांवीं नांदणी को. के. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

४८७६ लोकसंख्येपैकीं जवळ जवळ निम्मी वस्ती जैन लोकांची असून बाकीची लिंगायत, मराठा, हरिजन व मुसलमान यांची आहे.

रविवारीं ३ ते ६ वाजेपर्यंत चावडीसमोर रस्त्याच्या दुतर्फा बाजार भरतो.

पूर्वी जेव्हां बाजार जोमांत होता तेव्हां इचलकरंजी, जांभळी, हरोली, टाकवडे, शिरढोण, कुरुंदवाड, कोंडिग्रे, चिप्री, निम–शिरगांव, धरणगुत्ती व शिरोळ वगैरे ठिकाणांहून व्यापारी मंडळी सौद्यास येत असत. परंतु हल्लीं मात्र नांदणीचे मळ्यांतील भाजीपाला विकणारे शेतकरी व स्थानिक व्यापारी याशिवाय बाहेरचें कोणी येत नाहीं. म्हणून पूर्वी कित्येक हजारांवर होणारी उलाढाल १००–२०० रु. वर यावी ही दुर्दैवाची घटना आहे.

बाजार घटण्याची जीं अनेक कारणें आहेत त्यांतील प्रमुख येणप्रमाणें:—

(१) वहातुकीचे साधनांची आबाळ.

(२) वर्षाकाळीं नदी–नाल्याच्या पाण्यामुळें वहातुकीस अडथळा.

(३) पाण्याची गैरसोय.

(४) इचलकरंजी, जयसिंगपूर, शिरोळ व कुरुंदवाड हीं चारी बाजूस मोठीं बाजारकेंद्रें आहेत.

(५) जयसिंगपूरचा बाजार रविवारीं सुरू झाला हें त्यांतल्या त्यांत विशेष महत्त्वाचें व परिमाणकारी कारण होय. आतांपर्यंत जयसिंगपूरचा बाजार सोमवारीं होता तोंवर व्यापारी रविवारीं नांदणीचा बाजार आटोपून सोमवारीं जयसिंगपुरास जात. जयसिंगपूरचा बाजार रविवारीं भरूं लागल्यानें सहाजिकपणें नांदणीचे बाजारास जाणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या कमालीची घटली. बाजारास जाणाऱ्या लोकांचीही संख्या घटली आणि आजची नांदणी बाजाराची स्थिती " नाममात्र बाजार " अशी होऊन बसली आहे.

येथील बाजार वाढवण्याचें दृष्टीनें रविवार हा बाजार दिवस बदलून तो बुधवार करणेंत यावा शिवाय बाजाराची हल्लींची जागा गैरसोईची असलेनें गांवच्या पश्चिमेस पक्कया सडकेलगत असलेल्या मोठ्या माळावर बाजाराची तरतूद करणें वाढीच्या दृष्टीनें श्रेयस्कर टरेल असें वाटतें.

## पेटा शिरोळ : ४ शिरोळ

शिरोळ हें पेठ्याचें ठाणें आहे. जयसिंगपूर–नरसिंहवाडी रस्त्याच्या पांचव्या मैलावर हा गांव आहे. इंग्रजी शाळा, व्यापारी संस्था, क्रेडिट सोसायटी इतर चळवळीचीं केंद्रें इत्यादींचा हा गांव आहे. ऐतिहासिक महत्त्वही मोठें आहे.

येथील लोकसंख्या ६९५३ असून निम्मीअधिक वस्ती मराठ्यांची आहे.

बाजार शनिवारीं २ ते ६ वाजेपर्यंत असतो. गांवांतच रस्त्याच्या दोन्ही बाजूस बाजार भरतो.

आवळा, कापूस, भुईमूग इत्यादींचा व्यापार मोठ्या प्रमाणांत चालतो. शिवाय इतर किरकोळ व्यापार आहे तो वेगळाच. दर शनिवारीं ही उलाढाल २०००-३००० वर होत असते. कापसाचे हंगामांत मात्र ५००० वर जाते.

खालील गांवचे लोक व्यापारासाठीं व बाजारासाठीं येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| चरणगुत्ती | ८९१ | २ |
| नरसिंहवाडी | २६८६ | २ |
| घालवाड | १०८४ | ३ |
| कनवाड | १०५५ | ३ |
| कुटवाड | ७५१ | ३ |
| शिरटी | १७३६ | ३ |
| नांदणी | ४८७६ | ४ |

शिवाय जयसिंगपूर व इतर ठिकाणांहून येतात. गुरांचा बाजार भरत नाहीं. रस्त्याची सोय उत्तम आहे. पाण्याची सोय चांगली आहे.

बाजार कल्लेश्वराचे मंदिराचे भव्य पटांगणांत भरविणें हितदायी होणारें आहे. नजीकचे तलावामुळें पाण्याची उत्तम सोय होणारी असून कांहीं झाडेंही सावलीसाठीं आहेत.

## पेटा हातकणंगलें : १ हेर्लें

कोल्हापूर–मिरज रस्त्यावर आठव्या मैलावर हातकणंगलें पेट्यांतील वसलेला हा एक मोठा गांव आहे. या गांवीं हेर्लें को. के. सोसायटी अन्लि० नांवाची संस्था आहे.

जैन, मराठा, हरिजन व मुसलमान यांची लोकसंख्या गांवच्या ३७९९ लोकसंख्येपैकीं बरीच मोठी आहे.

दर शनिवारीं ३ ते ६ वाजेपर्यंत बाजार भरतो. चावडीशेजारील पटांगण हें बाजार भरण्याचें मुख्य ठिकाण आहे.

रुकडी, अतिग्रे, नागांव, शिरोली, हालोंडी, चोकाक वगैरे गांवांहून लोक बाजारास येतात.

चोंधळा, मिरची, हळद, कडधान्य व भाजीपाला हे बाजारांत प्रामुख्यानें विक्री केले जाणारे जिन्नस आहेत.

येथील बाजार हंगामी आहे. पावसाळ्यांत बाजार नांवासच भरतो. सुगींत भरगच्च असतो व उन्हाळ्यांत मध्यम प्रतीचा असतो. धान्यनियंत्रणा-मुळें बाजाराचें भरगच्च स्वरूप जाऊन किरकोळ स्वरूप आलें आहे.

सुगीचे दिवसांत होणारी व्यापारी उलाढाल ५००० पांच हजारापर्यंत जाते.

गुरांचा बाजार भरत नाहीं.

कोल्हापूर-मिरज पक्क्या सडकेवर आजूबाजूंना गांवें असलेनें वहातुकीची सोय चांगली आहे.

वाढत्या बाजारास सध्यांची जागा अपुरी पडेल असें वाटतें. त्याऐवजीं गांवाचे नजीक असलेल्या सरकारी मालकीचे गायरानांत बाजाराची व्यवस्था केल्यास अधिक सुखकर होईल.

## पेटा हातकणंगलें : २ पारगांव

पारगांव करवीर संस्थानच्या सरहद्दीवरील वारणेच्या कांठचा गांव आहे. वठारवरून कोडोलीमार्गें जो मोटार रस्ता कोल्हापुरास जातो त्या रस्त्याच्या चौथ्या मैलापासून आंत एक मैल दीड मैल गेल्यावर हातकणंगलें पेट्यांतील हा गांव लागतो. या गांवीं पारगांव को. ऑ. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

बहुसंख्य मराठा वस्ती असलेल्या या गांवाची लोकसंख्या २७३१ आहे. मंगळवार बाजारचा दिवस, आणि ३ ते ६ बाजार वेळ असते.

बाजारास तळसंदें, आंबप, वठार इत्यादि नजीकचे गांवांहून लोक येतात.

बाजार गांवांत चावडीसमोरच भरतो.

मुख्यतः व्यापार जोंधळा, तांदूळ, मिरची व किरकोळ भाजीपाला वगैरेचा चालतो. मिरचीचा बाजार मोठा असून हंगामी आहे. कोल्हापूर, कोडोली, वडगांव इत्यादि मोठ्या गांवांहून व्यापारी येऊन मिरची खरीदतात व ती घेऊन जातात.

आजूबाजूच्या गांवांना जोडणारे साधे रस्ते [ पायवाटा ] व गाडी रस्ते आहेत. बांधलेल्या सडका नाहींत. वारणा नदी आहे. पावसाळ्यांत गांवांत पाणी येतें. बाजार मंदावतो. दुसरी बाजारास योग्य अशी चांगलीशी जागा नाहीं. बाजारासंबंधीं विशेष विचार करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं; कारण एका बाजूस वडगांवचा नामांकित मोठा बाजार तर दुसऱ्या बाजूस कोडोलीचा विख्यात बाजार.

## पेटा हातकणंगलें : ३ सांगांव

कागलपासून तीन मैलावर व हुपरी, रेंदाळपासून तीन मैलावर असलेलें हातकणंगलें पेट्यांतील हें गांव आहे. या गांवीं सांगांव को. के. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

लोकसंख्या ३६८२ असून वस्ती हरिजन, मराठा, लिंगायत, जैन व मुसलमान यांची आहे.

येथील बाजार रविवारीं सायंकाळीं ५ ते ६ पर्यंत भरतो.

बाजारास लोक यळगूड, मौजे सांगांव, मुळकुड, तळंदगें, निंगनूर, कागल, रणदिवेवाडी इत्यादि ठिकाणांहून व्यापारासाठीं येतात. बाजार राजाराम चौकांत भरतो.

पूर्वी जोंधळा, तांदूळ, तंबाकू, पानाचे डाग व भुईमूग यांचा व्यापार मोठ्या प्रमाणांत होत असे. हल्लीं तें प्रमाण झपाट्यानें कमी होत आलेलें आहे.

अडीच-तीन हजारावर होणारी साप्ताहिक उलाढाल ५००-६०० पर्यंत घटली आहे. गैरसोईच्या पायवाटा व गाडीरस्ते व उन्हाळ्यांत आटणारे पाण्याचे आड यांमुळें त्रास होत आहे.

एका बाजूस हुपरी, रेंदाळ हीं मोठीं बाजार केंद्रें, दुसऱ्या बाजूस कागल त्यामुळें येथला व्यापार वाढणारही नाहीं. मात्र दिवसेंदिवस या बाजाराचें महत्त्व कमी कमी होत चाललें आहे.

हल्लीं भरत असलेल्या बाजाराची जागा-राजाराम चौक-अपुरी वाटल्यास गांवाचे उत्तेरकडील गांयरान ही जागा व्यापाराचे दृष्टीनें सोईची होईल.

## पेटा हातकणंगलें : ४ वठार तर्फ वडगांव

पुणें-बंगलोर रस्त्यावर हातकणंगलें पेट्यांतील हा गांव आहे. पूर्वी येथें बाजार भरत नव्हता. गेल्या विजयादशमीच्या मुहूर्तावर येथें बाजार सुरू करणेंत आला आहे. बाजार बाल्यावस्थेतच अद्यापि आहे. या गांवीं वठार धान्य सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

बहुसंख्य मराठा समाज असलेल्या या गांवची लोकसंख्या १२२४ आहे.

येथील बाजार शनिवारीं ३ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत भरतो. तूर्त शाळेसमोर बाजार भरविण्यांत येत आहे.

बाजारास किणी, वडगांव, तळसंदे, आंबप वगैरे ठिकाणांहून लोक येवूं लागले आहेत.

या बिकट परिस्थितींत सुरू केलेल्या या बाजारांत भाजीपाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्या वस्तु येणार व ५०-७५ रुपयापेक्षां उलाढाल अधिक ती कशी होणार !

या गांवचे पूर्वेस एक मैलावर किणीचा बाजार भरतो तो साधारण मोठा आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. दक्षिणेस एक मैलावर वडगांव

आहे. वडगांवचा बाजार कोल्हापूरचे बाजारासारखा फार मोठा आहे. उत्तरेस तीन मैलावर पारगांवचा बाजार आहे व जवळच कोडोलीसारखें नामवंत बाजारकेंद्र आहे. या बाजाराची आवश्यकता भासावी व तीही एवढ्या लहान वस्तीचे गांवांत ही एक आश्चर्याची गोष्ट आहे.

## पेटा हातकणंगलें : ५ कुंभोज

हें हातकणंगलें पेट्यांतील वारणेचे लगत असलेलें, सांगलीस नजीक पडणारें सरहद्दीवरील मोठें गांव आहे. या गांवीं कुंभोज को. क्रे. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

येथील लोकसंख्या ५१४० असून जैन, मराठा व हरिजन यांची वस्ती प्रामुख्यानें दिसून येते. येथें एक क्रेडिट सोसायटी असून व्यापारी असोसिएशनही आहे.

वाहतुकीचे गैरसोयीमुळें हा व्यापारी गांव पाठीमागें पडत चालला आहे. येथील बाजार रविवार व बुधवार या दोन्ही दिवशीं भरतो. मुख्य बाजार रविवारीं भरत असून बाजाराची वेळ ४ ते ६ पर्यंतची आहे. बुधवारीं फक्त लोण्याचा बाजार भरतो.

बाजारास लोक हातकणंगलें, आळतें, नेज, वडगांव, रुकडी, माणगांव, सांगली, नरंदें, मिणचें व सावडें इत्यादि ठिकाणांहून येतात.

व्यापार जोंधळा, तांदूळ, कापड, लोणी, भाजीपाला, हळद, भुईमूग, मिरची इत्यादींचा होतो.

बाजाराची व्यापारी उलाढाल पूर्वी १०,००० वर होती ती हल्लीं ४००० हजारावर आलेली आहे.

बाजार वर्षभर नियमित भरतो.

जनावरांचा बाजार पूर्वी होता म्हणे.

पायवाटा व गाडीरस्ते हेच मुख्यतः वाहतुकीचे मार्ग; तेही सुस्थितींत नाहींत. पूर्वी मोटारची व्यवस्था होती, हल्लीं नाहीं. एकंदरींत वाहतुकीसंबंधीं अत्यंत गैरसोय आहे.

वाहतुकीची गैरसोय दूर केल्यास व इतर कांहीं सवलती दिल्यास हें गांव एक पेठ होण्यासारखें आहे.

गांवांत भरणाऱ्या बाजाराची व्यवस्था गांवाबाहेरील नवीन शाळे-सवळील मोठ्या पटांगणांत होण्यासारखी आहे. जवळच एक छोटासा तलाव आहे. त्याचे आसपास गुरांचे बाजाराची व्यवस्था केल्यास उत्तम.

## पेटा हातकणंगलें :

## ६ हातकणंगलें

हें हातकणंगलें पेट्याचें मुख्य ठाणें होय. कोल्हापूर–मिरज मोटार रस्ता लगतून जातो. शिवाय रेल्वे स्टेशनही आहे. या गांवीं हातकणंगलें को. ऑ. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

गांवची लोकसंख्या ३३२३ असून पैकीं निम्मी वस्ती मराठा लोकांची आहे.

येथील बाजार दर मंगळवारीं भरतो. २ वाजतां सुरू होणारा हा बाजार सायंकाळीं ६ वाजतां उठतो.

येथील बाजारास खालील गांवचे लोक येतात:—

| गांवाचें नांव. | लोकसंख्या. | अंतर मैल. |
|---|---|---|
| आळतें | ४६६१ | २ |
| तारदाळ | २५८७ | ३ |
| कुंभोज | ५१४० | ५ |
| नेज | १४६५ | ४ |
| मेलजें | १०१३ | २ |
| तिळवणी | ६१७ | ३ |

बाजार पिराच्या दर्ग्याच्या भव्य पटांगणांत भरतो. जागा प्रशस्त व ऐसपैस आहे; परंतु बैठकीची मांडणी व्यवस्थितपणाची नसल्यामुळें जो ती जागा सांपडेल तो त्या ठिकाणीं बसतो व शिस्तीचे अभावीं उत्पन्न होणारा गोंधळ व अव्यवस्था कमालीची वाढलेली असते.

गांवच्या मध्यमार्गींच ही जागा असल्यानें सर्व लोकांना व व्यापाऱ्यांना अत्यंत सोयीची अशीच आहे. रेल्वे स्टेशन असलेमुळें दूरचे व्यापारी ( मिरज, जयसिंगपूर, रुकडी, कोल्हापूर व सांगली ) व्यापारासाठीं येतात. मोटारीचे वाहतुकीची सोयही आहे. त्यामुळें नांदणी, इचलकरंजी इत्यादि गांवांहूनही व्यापारी लोक येतात.

बाजारांत जोंधळा, मिरची, कापड, गूळ, हळद, भुईमूग, किराणा व भाजीपाला इत्यादींचा व्यापार होतो. साप्ताहिक घडामोड ३०००–४००० पर्यंत होते.

बाजार नियमितपणें वर्षभर भरतो.

या बाजारास थोडेसें व्यवस्थितपणाचें स्वरूप दिल्यास त्याचें स्वरूप कोल्हापुरांतील कपिलतीर्थ मंडईसारखें होईल. दर्ग्याच्या पटांगणांत उन्हाळ्यांत सावली मिळूं शकण्याइतकीं भरपूर झाडें आहेत. पाणी मात्र जवळपास नाहीं. पाण्याची व्यवस्था तेथें झाल्यास लोकांना व व्यापाऱ्यांना निष्कारण उपहारगृहाचा आश्रय घ्यावा लागतो, तो घ्यावा लागणार नाहीं व एक मोठी गैरसोय दूर होईल. भोंवतालच्या आठ नऊ गांवांचे लोक तेथें बाजारासाठीं येतात, ते हातकणंगल्यास जोडणारे गाडीरस्त्यानें.

शिस्तीनें बसण्यासाठीं पावसापासून रक्षण होणाऱ्या छपरासह उंच दगडी चबुतरे बांधल्यास येथील बाजार नमुनेदार होईल.

## पेटा हातकणंगलें : ७ रुकडी

हातकणंगलें पेट्यांतील एक मोठा गांव आहे. प्राथमिक शिक्षकांचें ट्रेनिंग कॉलेज येथेंच आहे. एक दोन क्रेडिट सोसायट्याही पण आहेत. या गांवीं रुकडी को. क्रे. सोसायटी अन् लि. नांवाची संस्था आहे.

गांवची लोकसंख्या ४३१९ इतकी आहे. त्यांत मुख्य भरणा मराठा, हरिजन, जैन व मुसलमान इत्यादिकांचा आहे.

बाजाराचा दिवस गुरुवार. बाजारास दोनप्रहरीं २ वाजतां सुरवात होते व सूर्यास्ताचे वेळीं बाजार उठगतो. बाजार भरतो तो गांवांतल्या

मुख्य रस्त्यावरच. रस्ता अरुंद व त्यांत बाजाराची भर. गर्दी कमाळीची होते. इकडून तिकडे फिरणें मुष्कील होतें. गांवांतील घरांपुढेंच बाजार भरत असलेनें व्यवस्थित स्वरूप दिसणें शक्यच नाहीं. अव्यवस्थितपणा सीमेस पोहोंचतो. कोणीही कोठेंही बसावें. त्या बसण्यास कांहीं धरबंदच नाहीं.

बाजारास खालील गांवचे लोक येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| माणगांव | ३४८७ | १ |
| रुई | २५७३ | ४ |
| चोकाक | १०२७ | २ |
| अतिग्रे | ११७८ | १॥ |
| हेर्ले | ३७११ | ३ |
| हालोंडी | ११५३ | ३ |
| मालें | ७१७ | ४ |
| चिंचवाड | १२४३ | ५ |

शिवाय हातकणंगलें, मिरज, कोल्हापूर, कुंभोज इत्यादि गांवांहून व्यापारी मंडळी येतात.

बाजारांत मिरची, कापड, कापूस, किराणा, भाजीपाला इत्यादि माल विक्रीसाठीं येतो व साधारणत: ३००० रु. ची उलाढाल होत असते.

बाजार वर्षभर समप्रमाणांत असतो.

दैववशात् रेल्वेस्टेशन असतांना व त्याच्या आसपास भव्य पटांगण व लहानसा तलाव असतांना गांवांतील किचकट जागेंत बाजार भरतो याबद्दल आश्चर्य वाटतें.

स्टेशननजीकच्या पटांगणांत बाजार भरलेस अधिक सोईचें होणार आहे. स्टेशन गांवालगतच आहे. बाहेरगांवचे व्यापारी रेल्वेनें येतात. त्यांस ही जागा अत्यंत सोईची होईल. पटांगण प्रशस्त असलेनें व्यापाऱ्यांच्या बसणेची आंखणी पद्धतशीर करतां येईल. थोडीं झाडें लावलीं कीं सावली मिळेल. नजीक लहानसा तलाव असलेनें तेथें गाड्या सोडतां येतील व जनावरांना भरपूर पाणीही पण मिळेल. बाजारास येणाऱ्या लोकांची पाण्याची

सोय सहजगत्या होण्यासारखी आहे. कारण याच बाजूनें नळाचें पाणी गांवांत नेलेलें आहे. बाजारचे ठिकाणीं एक दोन नळ ठेवले तर पुरेसें होईल. आजूबाजूचे खेड्यांतून रुकडीस येण्यास गाडीरस्ते आहेत.

## पेटा हातकणंगलें : ८ यळगूड

यळगूड हा गांव हुपरी–रेंदाळच्या मध्यें कोल्हापूर–रेंदाळ रस्त्यापासून दोन मैलांवर वसलेला आहे. गांव दुमाला आहे. या गांवीं को. ऑ. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

मुख्यतः मराठा वस्ती असलेल्या या गांवची लोकसंख्या १८८८ आहे.

बाजार बुधवारीं सायंकाळीं ५ ते ६ पर्यंत शाळेसमोरील प्रांगणांत भरतो. या बाजाराचा विशेष म्हणजे नियमानें अनियमितपणें भरणारा हा बाजार होय. एका बाजूस सांगांव–कागल हीं बाजार केंद्रें व दुसऱ्या बाजूस हुपरी, रेंदाळ हीं बाजार केंद्रें. यामुळें, वाहतुकीची गैरसोय असलेल्या या यळगुडास बाजार अक्षरशः नाममात्रच भरतो आणि तोही फक्त हंगामांत. एरव्ही एकही व्यापारी किरकोळ सुद्धां बाजारास येत नाहीं.

## पेटा हातकणंगलें : ९ आळतें बाजारकेंद्र

हातकणंगलें स्टेशनपासून दोन मैलावर आळतें हा गांव आहे. पूर्वी हा गांव पेट्याचें ठिकाण होता. हल्लीं पेटा हातकणंगलें येथें आहे. आळत्यास यल्लमादेवीची यात्रा बऱ्याच मोठ्या प्रमाणांत भरते. या गांवीं आळते छत्रपती को. ऑ. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

आळतेची लोकसंख्या ४६६१ असून हरिजन, मराठा व लिंगायत यांची वस्ती समप्रमाणांत आहे.

साप्ताहिक बाजार शनिवारीं दुपारीं ३ वाजल्यापासून भरूं लागतो. ६ वाजतां बाजार उठतो.

पूर्वी धान्यादिकांचा बाजार बरा भरत असे. तो कमी होत होत हल्लीं नाममात्र राहिला आहे. आजूबाजूच्या मळ्यांतील शेतकरी व क्वचित् प्रसंगीं नेज व कुंभोजहून भाजीपाला घेऊन कांहीं मंडळी बाजारास येतात.

बाजार गांवांतच रस्त्याच्या दोन्ही बाजूस भरतो.

बाजार भाजीपाल्यापुरताच मर्यादित झालेनें ५०।६० रुपयांपेक्षां विक्री जास्त संभवत नाहीं.

उन्हाळ्याच्या दिवसांत बाजाराचें स्वरूप अगदींच खालावलेलें असतें. वर्षांतून साधारणतः सहा महिने बाजार भरतो व यात्रेच्या वेळीं व्यापारी उलाढाल १५,०००।२०,००० वर जाते.

गुरांचा बाजार येथें भरत नाहीं.

गांवांत पाण्याची गैरसोय प्रामुख्यानें जाणवते. हातकणंगलें स्टेशन ते वडगांव हा रस्ता पक्का आहे. कुंभोज, नेज वगैरे गांवांना जोडणारे रस्ते, गाडीरस्ते या सदरांतच मोडण्यासारखे आहेत.

या बाजारासंबंधीं विशेष उल्लेखनीय असें कांहीं नसलेनें व वाढ होण्याची शक्यता मुळींच नसलेनें तत्संबंधीं विशेष विचार करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

## पेटा हातकणंगलें : १० रेंदाळ

हातकणंगलें पेट्यांतील कोल्हापूर–रेंदाळ रस्त्यावरील करवीर संस्थानचें शेवटचें गांव. या गांवीं रेंदाळ को. क्रे. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

येथील लोकसंख्या ३३८५ इतकी आहे. पैकीं १६३८ इतकी वस्ती मराठा लोकांची आहे.

येथील बाजार गुरुवारीं ३ वाजल्यापासून ५ वाजेपर्यंत असतो. बाजार चावडीसमोरच्या रस्त्यावरच भरतो.

बाजारास लोक हुपरी, मांगूर, यळगूड, टोणेवाडी, रांगोळी इत्यादि गांवांहून येतात.

जोंधळे, तांदूळ, इतर कडधान्यें, भुईमूग व मिरची इत्यादींचा व्यवहार चालतो. सरासरी विक्री ३००० रु. पर्यंत चात असेल.

गुरांच्या बाजाराची तरतूद येथें करणेंत आलेली नाहीं. आणि त्याची आवश्यकताही पण नाहीं. कारण हुपरीसारखा मोठा बाजार (गुरांचासुद्धां) जवळच एक मैलावर आहे.

हुपरी—रेंदाळ ही पक्की सडक व इतर गांवांना गाडीरस्ते. पाण्याची सोय नजीकचे तलावानें झालेली आहे.

बाजारची जागा हुपरी रस्त्यावर तलावाचे नजीक दत्ताचे देवळाजवळील पटांगणांत केल्यास आहे त्या जागेपेक्षां किती तरी पटीनें सोईचें होईल.

## पेटा हातकणंगलें : ११ हुपरी

हें गांव कोल्हापूर—रेंदाळ रस्त्यावर असून कोल्हापूरपासून १२ मैलावर आहे.

हुपरी हें करवीर इलाख्यांत चांदीचे दागिने करण्यांत पहिल्या प्रतीचें गांव आहे. येथें चांदीचे दागिने तयार करण्याचे कारखानेवजा अजमासें १६० दुकानें असून अकरा इंजिनवर चालणारे कारखाने आहेत. ह्या एकंदर दुकानांतून ८०० ते ९०० कामगार काम करितात. ह्या ठिकाणीं अजमासें ८० ते ९० लाखांचे दागिने दर वर्षी केले जातात व ते कलकत्ता, मद्रास, कराची इत्यादि ठिकाणीं पाठविले जातात.

ह्या ठिकाणची लोकसंख्या ६००० असून मुख्य वस्ती मराठा १९१८ हरीजन ७०८ लिंगायत ४४१ व बाकी इतर.

येथील आठवड्याचा बाजार दर शनिवारीं भरतो.

बाजाराकरितां खालील गांवचे अजमासें ५ ते ६ हजार लोक येतात.

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| इंगळी | १९८६ | २ |
| पट्टणकोडोली | २३१२ | २ |
| तळंदगे | ६६७ | ३ |
| सदलगे | — | २॥ |
| चंदुर | २५७४ | २ |
| यळगुड | १८८८ | २ |
| सांगांव | ३६८५ | २ |
| रेंदाळ | ३३८५ | १॥ |
| लिंगनूर | ६७७ | ८ |
| सांगवडे | ११३७ | ३ |
| बसगडे | २६१६ | ४ |
| कागल | ८०३१ | ५ |
| माणगांव | १६७७ | ८ |
| रांगोळी | २२९२ | ३ |
| रुई | १२४८ | ६ |

येथील आठवड्याचा बाजार चावडीसमोर व गांवांतील रस्त्यावर भरतो. बाजार साधारणतः ११ वाजल्यापासून संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत असतो.

बाजारांत मुख्यतः तांदुळ, जोंधळा, गहूं, तुरीची डाळ, व इतर कडधान्य,यांची प्रामुख्यानें विक्री केली जाते.

हल्लींच्या परिस्थितींत साधारणतः सहा सात हजारांची उलाढाल प्रत्येक बाजारादिवशीं होते. पूर्वी हीच उलाढाल १५–२० हजारापर्यंत जात असे.

वर्षामध्यें सगळेच महिने बाजार सारख्या प्रमाणांत भरत नसतो. साधारणतः पेरणी सुरू झाल्यापासून पिकें काढीपर्यंत, म्हणजे जवळ जवळ वर्षांतून पांच महिने बाजार साधारण प्रमाणांत भरतो व बाकीचे सर्व आठवड्यांत तो उत्तम प्रकारें भरतो.

येथील आठवड्याचा गुरांचा बाजार शनिवारींच भरतो. अजमासें १००–१५० जनावरें विक्रीकरितां येतात. हुपरी–रेंदाळ रस्त्यावर

एका बाजूला खुंट वगैरे पुरून जनावरें वगैरे बांधण्याची सोय केली आहे. पाण्याची सोय आहे. सावलीकरितां झाडें वगैरे लावलेलीं आहेत.

ह्या ठिकाणीं पाण्याची अतिशय उत्तम सोय आहे. गांवांत अंबाबाईचे देवळानजीकच्या टटावर टाकी ठेवून त्यांत पाणी पंप करून टाकलें जातें व त्यांतून तें गांवांत पुरविलें जातें. बाजाराकरितां येणाऱ्या लोकांना व व्यापाऱ्यांना बसण्याकरितां कांहींच सोय नाहीं. पावसाळ्यांत, पावसामुळें व उन्हाळ्यांत उन्हामुळें लोकांना फारच त्रास होतो.

हल्लीं जो आठवड्याचा बाजार गांवांत रस्त्यावर भरतो त्याऐवजीं तो दुसरीकडे मोकळ्या जागेत भरविण्याची व्यवस्था करावी लागेल. सावलीकरितां शेडस् बांधाव्या लागतील. इंगळी व तळंदगें ह्यांना हुपरीला जोडणारे रस्ते करावे लागतील.

## पेटा हातकणंगलें : १२ वडगांव

वडगांव हें हातकणंगलें पेट्यांतील बाजाराचें मुख्य गांव आहे. तें कोल्हापुरापासून १३ मैलांवर वसलेलें आहे. येथील लोकसंख्या ५००० असून त्यांत २२०० मराठे, १००० लिंगायत आणि बाकीचे इतर निरनिराळ्या जमातीचे लोक आहेत. गांवांत शिक्षणाची सोय असून सरकारी शाळेंत मुलकीपर्यंत शिक्षण दिलें जातें व शिक्षण प्रसार मंडळानें चालविलेल्या शाळेंत इंग्रजी शिक्षणाची सोय केलेली आहे. या गांवीं म्युनिसिपालिटी असून तिचें उत्पन्न १०–१२ हजारांचें आहे. लोकहिताच्या सर्व गोष्टी म्युनिसिपालिटीकडून केल्या जातात. घरोघर पाण्याच्या चाव्या आहेत.

करवीर इलाख्यांत जे दोन तीन मोठे बाजार भरतात, त्यांत वडगांवच्या बाजाराचा पहिला नंबर लागतो.. बाजार दर सोमवारीं भरतो आणि दुपारीं १२ वाजलेपासून संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत बाजाराचा व्यवहार चालू असतो.

बाजारांत मुख्यतः जोंधळा, तांदूळ, गहूं, तुरी इत्यादि जिन्नस मोठ्या प्रमाणांत येतात. हल्लींच्या दिवसांत जवळ जवळ अडीचशें तीनशें पोतीं

चौपळा येतो. यावरून लढाईपूर्वीच्या काळांत तो किती येत असेल याची कल्पना करतां येईल. पूर्वी जवळ जवळ तीनचारशें गाड्या कडधान्य येत होतें. धान्याशिवाय भाजीपाला, कांदे, लसूण, मिरची इत्यादि नित्योपयोगी जिन्नस मोठ्या प्रमाणावर येतात.

या गांवच्या आसपासच्या २५-३० खेड्यांतील जवळ जवळ १०-१२ हजार लोक बाजाराकरितां येतात. शिवाय, ब्रिटिश हद्दींतील बरेचसे लोक खरेदीविक्रीकरितां येतात.

बाजार दिवशीं जवळ जवळ २५-३० हजार रुपयांची उलाढाल होते.

वडगांवचा आठवड्याचा बाजार' हा जनावरांच्या बाजाराबद्दल फार प्रसिद्ध आहे. करवीर इलाख्यांत या बाजाराचा नंबर पहिला लागतो. शेळ्या, मेंढ्या खेरीज करून दोन अडीच हजार जनावरें विक्रीकरितां येतात. पिकांची कापणी झालेवर हाच आंकडा तीन चार हजारावर जातो. या बाजारांतील शिंगोटी कराचें उत्पन्न कमींत कमी ९-१० हजार रुपये होतें. हल्लीं जो शिंगोटी कर घेतला जातो त्याला ठराविक प्रमाण नाहीं.

हल्लींची पद्धतः—

| | | |
|---|---|---|
| ५० रु. पर्यंत | (किंमतीवर) | ४ आणे. |
| ५० ते १०० ,, | ,, | ८ ,, |
| १०० च्या पुढें | ,, | १ रुपया. |

या पद्धतीऐवजीं रुपयाला पै अगर दोन पै कर ठेवला तर विकणारा व म्युनिसिपॅलिटी या दोघांचाही फायदा होईल.

हल्लीं बाजार म्युनिसिपॅलिटीच्या ऑफिस शेजारच्या पटांगणांत अलि-कडे व पलिकडे भरतो. आठवड्याच्या बाजाराचा भव्यपणा लक्षांत घेतां ही जागा फारच अपुरी आहे. जनावरांच्या बाजारांत जनावरें अशा तऱ्हेनें बांधलेली असतात कीं, गिऱ्हाइकास आंत जावयास मिळत नाहीं. व आंत गेलेला मनुष्य चक्रव्यूहांतच सांपडतो. सगळीकडे जनावरें शिंगें हाल-वित असतात, त्यामुळें गिऱ्हाइकास जनावर पसंत करण्यापुरतासुद्धां धीर रहात नाहीं. तेव्हां जनावरांच्या बाजाराची आंखणी अशी व्यवस्थित केली पाहिजे, कीं जिच्या योगें गिऱ्हाइकास सहज आंत जातां येईल व सावकाशपणें

जनावरांचें निरीक्षण करून मनपसंतीप्रमाणें जनावर खरेदी करतां येईल. याकरितां हल्लींच्या जागेच्या तिप्पट जागेची जरूरी आहे. ठिकठिकाणीं सावलीकरितां झाडें लावलीं पाहिजेत. धान्याच्या बाजाराची जागाहि अपुरी आहे. सरकारी चावडीच्या मागें जी खुली जागा आहे त्या ठिकाणीं ह्या बाजारांची सोय केल्यास, या बाजाराचा सहज समावेश होईल; व या बाजाराची आंखणीहि व्यवस्थित करतां येईल.

## पेटा पन्हाळा : १ पन्हाळा

पेट्याचें व ऐतिहासिक ठिकाण म्हणून या गांवास महत्त्व आहे. मराठी सातवी व इंग्रजी चौथीपर्यंत या गांवीं शिक्षणाची सोय आहे. पन्हाळ्यास नमुनेदार "हिल स्टेशन" करण्याचें सरकारनें योजिलें असून, त्याप्रमाणें प्रयत्न सुरू झाले आहेत. मोटारीनें येणें जाणें या गांवीं सोयीचें पडतें. येथें पन्हाळा को. ऑ. सोसायटी लि. नांवाची संस्था आहे.

गांवची लोकसंख्या २४५३ आहे.

आठवड्याचा बाजार दर रविवारीं दुपारीं १ ते ६ वाजेपर्यंत भरतो.

आठवड्यास खालील गांवचे सुमारें २००० लोक बाजारांत जमतात.

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंदाजें मैल अंतर |
|---|---|---|
| आसुर्लें | ११९१ | ५ |
| पोर्ले | १८५१ | ६ |
| गोलिवडे | २८७ | ४ |
| पिंपळें | ५३४ | ५ |
| आळवें | ५६३ | ५ |
| दिगवडे | ४७६ | ७ |
| कोळोली | ११९१ | ९ |
| बांदिवडे | ३२० | ८ |
| राक्षी | ७९४ | २ |
| गुडे | १२० | १ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंदाजें मैल अंतर |
|---|---|---|
| अंबवडें | ८१३ | ३ |
| दाणेवाडी | ९० | ४ |
| वाडी रत्नागिरी | १५१० | ५ |
| गिरोली | १७७ | ६ |
| जाफळें | ३८३ | ५ |

याशिवाय उत्रें, वाघवें, देवठाणें, माजनाळ, पुनाळ, तिरपण, कोतोली, कणेरी, नणुंद्रें, वारनूळ, का॥ बोरगांव, करंजफेण, कारवें, मोहरें, बोरपाडळें, शहापूर, देवाळें, आरळें या गांवचे लोक बाजारास येतात.

मुनसफ कचेरीजवळ "हायस्कूल बाग" नांवाची मोकळी जागा आहे, त्या जागीं व मुनसफ कचेरीजवळच्या गांवच्या मुख्य रस्त्यावर बाजार भरतो.

तांदूळ, जोंधळा, लोणी, भाजीपाला हे विक्रीचे मुख्य जिन्नस आहेत. तरी इतर सर्व जीवनोपयोगीं माल येथील बाजारांत विक्रीस येतो.

सुमारें ४००० रु. ची उलाढाल चालू परिस्थितींत होते. कंट्रोल ऑर्डर्स नसतांना उलाढाल ६००० ते ७००० रु. पर्यंत होत असे.

साधारणतः वर्षभर हा बाजार सारखाच भरतो. पावसाळ्यांत थोडा कमी.

गुरांचा बाजार येथें नाहीं.

कोल्हापूर ते पन्हाळा एकच पक्का रस्ता, इतर सर्व पायवाटा. धर्मशाळा नाहीं. बाजाराचे ठिकाणीं सावलीची सोय व पाण्याची सोय आहे.

बाजारासाठीं सोयी—रस्तेः—

(अ) कोतोली ते केरलें रस्ता. हा रस्ता सुमारें १० मैल लांब होईल. व यायोगें सहा खेड्यांची सोय होईल.

(आ) घुंगुर ते पन्हाळा, हा रस्ता १२ मैल लांबीचा होईल.

(इ) नावली ते पन्हाळा रस्ता

पाण्याची सोयः—

हायस्कूल बागेंत पडीक स्थितींत विहीर आहे. ती दुरुस्त करून, पंप बसवून मिळाला म्हणजे बाजारास त्याची चांगली सोय होईल. हायस्कूल बागेंत एकादी धर्मशाळा अगर "Shade" बांधून मिळाल्यास पावसाळ्यांत बाजार चांगला भरेल.

दुकानें बांधण्यास जागाः—

हायस्कूल बागेंत दुकानें बांधण्यास व्यापाऱ्यांना जागा मिळावी अशी त्यांची इच्छा आहे.

जनावरांचा बाजार येथें भरावा अशी लोकांची इच्छा आहे. अंबर-खान्यांतील मोकळ्या जागीं जनावरें बांधण्यास जागा आहे. तेथें विहीर आहे. फक्त पंप बसवून हौद बांधावा लागेल. तेथें झाडांची सावली आहे.

## पेटा पन्हाळा : २ कळें

हा गांव कोल्हापुराहून १० मैल अंतरावर आहे. या गांवापर्यंत पक्का रस्ता आहे. मराठी सातवीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. व्यापारी वर्ग येथें सुमारें २५, ३० असून या बाजारावर आजूबाजूच्या पंचवीस खेड्यांचे लोक अवलंबून असतात. गांवीं पोस्टाची सोय आहे. दळण, कांडप व तेल काढणेच्या येथें दोन गिरण्याहि आहेत. दररोजचा व्यापारहि येथें उत्तम चालतो. या गांवीं कळें को. के. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

या गांवची लोकसंख्या १९०२ आहे. व्यापारी, शेतकरी हा दोन्ही वर्ग येथें आहे.

आठव्याचा बाजार दर शनिवारी भरतो. बाजार भरणेची वेळ दुपारीं १२ ते ७ पर्यंत आहे.

आठवड्याचे बाजाराकरितां खालील गांवचे लोक येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| म्हाळुंगे | ६११ | ३ |
| पुनाळ | ९१८ | १॥ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| माजनाळ | ६९० | २ |
| तिरपण | ८३३ | २ |
| काटेभोगांव | ७१२ | १ |
| पोहाळें | ६०६ | ५ |
| परखंदळें | ६८० | ३ |
| वाघुर्डे | ५५५ | ३ |
| सावर्डे | ६८४ | १ |
| आडूर | ११९३ | ४ |
| कोपार्डे | ४५७ | ५ |

याशिवाय सातार्डें, पुशीरें, बाजार भोगांव, किसरूळ, सांगरूळ, कळेंवें, कोल्हापूर या गांवचे मिळून २०० व्यापारी व खरेदी करणारे लेहूव २००० असे जमतात.

गांवचे पश्चिमेस मोकळ्या जागी शाळा आहे. शाळेजवळच्या मोकळ्या जागीं व गांवाचे बाजारपेठेंतील मुख्य रस्त्यावर बाजार भरतो.

तांदूळ, जोंधळा, कोणी, मासळी, घोंगडी व कापड हे विक्रीचे प्रमुख जिनस असले तरी इतर हरएक प्रकारचा जरुरीचा माल बाजारांत विकत मिळतो.

सुमारें ५००० रु. ची उलाढाल या बाजारांत होते.

साधारणतः वर्षभर हा बाजार सारखाच भरतो. फक्त पावसाळ्यांत थोडा कमी.

गुरांचा बाजार भरत नाहीं.

हा बाजार कोल्हापूर—गगनबावडा रस्त्यावर, कोल्हापुरापासून १२ मैलांवर भरतो. यापासून दुसरा एक पक्का रस्ता बाजार भोगांवकडे जातो. इतर सर्व रस्ते कच्चे व पायवाटांचेच आहेत. धर्मशाळा नाहीं. पिण्याच्या पाण्याचीहि गैरसोय आहे. सावलीची सोय थोडीशी आहे.

हव्या असणाऱ्या सुधारणाः—

(अ) जनावराचा बाजार येथें भरावा असें लोकांना वाटतें. गांवा-जवळ एक आंबराई व तेथून एक फर्लांगावर नदी आहे. त्या ठिकाणीं हा बाजार भरण्याची सोय आहे.

(ब) पावसाळ्यांत आसऱ्याचें ठिकाण नसल्यानें, धर्मशाळेची अगर Shade ची फार जरूरी आहे.

(क) पाण्याची या गांवीं गैरसोय आहे. बाजारचे ठिकाणीं विहीर अगर बोअरिंग पाहिजे.

(ड) बाजारचे ठिकाणीं सावलीसाठीं आणखी थोडीं झाडें लावावीं लागतील.

(इ) बाजाराची जागा, हल्लीं बाजारास पुरत नाहीं, त्यामुळें गांवामध्यें लोक, मिळेल त्या जागीं विक्रीस बसतात. तरी आणखी मोकळी जागा बाजारास मिळवून देणें जरूरीचें आहे. ( Ideal Bazar Place ) " आदर्श बाजारचें ठिकाण " करण्यास हें योग्य गांव आहे.

## पेटा पन्हाळा : ३ कोतोली

पन्हाळा पेट्यांतील लोकसंख्येच्या मानानें हें चौथ्या नंबरचें गांव असून पन्हाळ्याहून सुमारें ७ मैल आहे. हा गांव कळयाहून ६ मैल व बाजार भोगांवहून ६ मैल आहे. या गांवीं येण्यास कोठूनहि रस्ता नाहीं. गांवीं मराठी सातवीपर्यंत शिक्षणाची सोय आहे.

(२) गांवची लोकसंख्या २३४५ आहे. या गांवीं कोतोली को. क्रे. सोसायटी अनूलि. नांवाची संस्था आहे.

(३) आठवड्याचा बाजार दर मंगळवारीं दुपारीं २ ते ६ वाजे-पर्यंत भरतो.

(४) या बाजारास खालील गांवचे सुमारें २००० लोक जमतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| कणेरी | ८४३ | २ |
| बांदिवडे | ३२० | ४ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| नणुंद्रे | ४९४ | १॥ |
| घोटवडें | ५४७ | ३ |
| तेळवें | २८४ | १॥ |
| तिरपण | ८६३ | ३ |
| दिगवडें | ४७६ | ३ |
| पिंपळें | ३४४ | २ |

याशिवाय करंजफेण, गोळिवडें, वाघवे, पन्हाळा, कळे, भोगांव, बारनूळ, माजनाळ, ठाणें, देवठाणें, पुनाळ या गांवचे लोक येतात.

(५) गांवचे पश्चिमेस मारुतीचें देऊळ आहे. देवळाच्या आस-पासच्या मोकळ्या जागीं हल्लीं बाजार भरतो. पण ती जागा बाजारास अपुरी पडते.

(६) सर्व प्रकारचें धान्य, कापड, तयार कपडे, मटन, हे मुख्य विक्रीचे जिन्नस असून इतर हरएक प्रकारचा शेतकरी जीवनास उपयोगी माल या बाजारीं विक्रीस येतो.

(७) सुमारें ६००० रु.ची उलाढाल या बाजारीं होते.

(८) पावसाळ्यांत बाजार कमी भरतो. कारण कोठूनहि येण्यास पक्का रस्ता नाहीं. इतर वेळीं बाजार बरा भरतो.

(९) येथें जनावरांचा बाजार नाहीं.

(१०) या गांवीं येण्यास फक्त पायवाटाच आहेत. बाजारास पाण्याची सोय, व सावलीची सोय नाहीं. पावसाळ्यामध्यें मारुतीच्या देवळाचा लोक आश्रय घेतात. पण एका स्वतंत्र धर्मशाळेची जरूरी आहे.

(११) बाजारवाटीस खालील सोयी पाहिजेत:—

(अ) कोतोली ते कळे रस्ता तयार होऊन मिळावा. हें अंतर ६ मैल आहे.

(आ) बाजारास सध्याची जागा अपुरी असल्यानें, गांवाच्या पूर्वेस, व गांवालगत स. नं. ४९६ या ठिकाणीं बाजार न्यावा. जागा

मोकळी ( बिनशेती ) मुबलक मोठी आहे. या जागेंत अर्धवट काढलेली विहीर आहे. झाडांची लागवड येथें होऊं शकेल.

(इ) पोस्टाची सोय व्हावी.

(ई) पावसाळ्यांत आडोशासाठीं धर्मशाळा बांधली जावी.

(उ) जनावरांच्या बाजाराची येथें आवश्यकता आहे; व वर सुचविलेल्या नवीन जागीं, जनावरें बांधणेस मुबलक जागा आहे. जवळच पाणी आहे व सावलीसाठीं झाडें लावण्यास ग्रामपंचायत तयार आहे.

या सोयी केल्या असतां गांवचा बाजार सुधारेल.

## पेटा पन्हाळा : ४ सातवें

सातवें हें गांव वारणा नदीचे कांठीं असून कोल्हापूर–मलकापूर रस्त्यावर असलेल्या अंबवडें गांवापासून जवळच आहे. गांवीं मराठी सातवीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. गांवचे लोकांना शेती भरपूर असल्यानें ते सुखी व सहकार्यानें काम करावें अशा बुद्धीचे आहेत. या गांवीं को. ऑ. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) गांवची लोकसंख्या २३९७.

(३) आठवड्याचा बाजार शनिवारीं दुपारीं १ ते ६ पर्यंत भरतो.

(४) आठवड्याचे बाजाराकरितां आजूबाजूच्या सुमारें ३०, ३५ खेड्यांतील मिळून २००० लोक जमतात. संस्थानांतील गांवें खालीलप्रमाणें.

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| पारगांव | ३७३२ | ७ |
| सावडें | १०५४ | १ |
| आवळी | ९७६ | ४ |
| कारवें | १०१५ | २ |
| येरगांव | ९८० | ३ |
| नावली | ४५९ | ३ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| देवाळें | १६५० | ३ |
| बोरिवडें | १९३८ | ५ |
| शहापूर | ४८६ | ३ |

याशिवाय ब्रिटिश हद्दींत असलेल्या गांवाहून लोक येतात. ठाणा-पुडें, देववाडी, चिकुर्डें, मांगलें, कोदें, चिखली, पेतवडें, नाटोली, बांगाव, बत्तीस शिराळें हीं तीं गांवें होत.

(५) शाळेजवळच्या मोकळ्या व मध्यवर्ती जागेंत बाजार भरतो.

(६) जोंधळा, तांदूळ, मिरची, कापड हे प्रमुख जिन्नस होत. इतर सर्व माल विक्रीस येतो.

(७) सुमारें ४००० रु.ची उलाढाल बाजारांत होते.

(८) जोडरस्ता गांवास कोठेंहि नसल्यानें पावसाळ्यांत बाजार कमी. इतर वेळीं बरा.

(९) हल्लीं जनावरांचा बाजार नाहीं. पण पूर्वी हा बाजार चांगला मोठा भरत असे.

(१०) या गांवीं येण्यास पक्का रस्ता नाहीं. बाजारचे ठिकाणीं सावली, पाणी अगर धर्मशाळा याची सोय नाहीं.

(११) जरूर असणाऱ्या सोयी—

बाजारच्या जागेजवळ असणाऱ्या इमारतींत शाळा भरते. शाळा गांवाबाहेर बांधली गेल्यास, आहे त्या इमारतीचा धर्मशाळा म्हणून उपयोग होऊं शकेल.

झाडांची सावली बाजारास नाहीं. ग्रामपंचायत आपले खर्चानें झाडें लावण्यास तयार आहे.

गांवालगत एक विहीर काढली गेली आहे, ती पुरी केल्यास बाजारास त्याचा फायदा चांगलाच होईल.

जनावरांचा बाजार येथें भरावा असें लोकांना फार वाटतें. या बाजारास जरूर त्या सर्व सोयी करण्यास गांवमदत मिळणार आहे.

वारणा नदी ओलांडण्यास सावर्डे या गांवीं असलेली नाव सातवें या गांवीं आणल्यास बाजारची सोय होईल.

रस्ते—

(अ) बोरपाडळें ते सातवें रस्ता हा तीन मैल लांबीचा होईल.

(ब) सातवें ते कोडोली रस्ता करणेचें ठरलें आहे. तो लौकर पुरा व्हावा.

(क) सातवें गांवापासून वारणा नदी १ मैल लांब आहे. तरी नदीपर्यंत पक्का रस्ता झाल्यास, पाणी आणणेस व बाजारचे लोकांना येणेजाणेस बरें पडेल.

पाण्याची सोय करणें या गांवास फार जरूरीचें आहे. पाणी १ मैल लांबीवरून आणावें लागत असल्यानें, दिवसाच्या कामाचें वेळेपैकीं इकडे बराच वेळ खर्च करणें अपरिहार्य असतें.

## पेटा पन्हाळा : ५ मालें

मालें हें गांव कोल्हापूर ते मलकापूर रस्त्यावर असलेल्या वाघबीळ या ठिकाणापासून तीन मैल उत्तरेकडे आहे. गांवामध्यें मराठी चौथीपर्यंत शिकण्याची सोय आहे. या गांवीं को. के. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

हल्लीं येथें बाजार विशेष भरत नाहीं. ८ ते १० वर्षांपूर्वी चांगला बाजार भरत असे व त्या वेळचे परिस्थितीचें खालील वर्णन आहे:—

(२) गांवची लोकसंख्या २१६६ असून बहुसंख्य शेतकरी आहेत.

(३) या गांवीं शनिवारीं दुपारीं २ ते ५ पर्यंत बाजार भरत असे.

(४) आठवड्याचे बाजारास खालील गांवचे लोक १०० पर्यंत जमत असत:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| पोखलें | ६१५ | १ |
| बाखलें | १०९१ | २ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| केसलें | १०९१ | १ |
| मोहरें | ११५८ | २ |

(५) गांवाचे मध्यवर्ती असलेल्या चावडीशेजारील रस्त्यावर बाजार भरत असे.

(६) तांदूळ, जोंधळा, भाजीपाला हे विक्रीचे मुख्य जिन्नस होत.

(७) सुमारें २०० ते ३०० रु. ची उलाढाल होत असे.

(८) पावसाळ्यांत बाजार कमी व इतर वेळीं बरा असा असे.

(९) जनावरांचा बाजार येथें नाहीं.

(१०) बाजारचे ठिकाणीं सावलीची सोय, पाण्याची अगर धर्मशाळेची कोणतीहि सोय नाहीं. गांवीं येण्यास पक्का रस्ता एकहि नाहीं. त्यामुळें पावसाळ्यांत लोकांचे फारच हाल होतात.

(११) खालील सोयी मिळाल्या असतां पुन्हा बाजार भरेल असें लोक म्हणतात, पण मला तसें वाटत नाहीं.

( अ ) मालें ते कोडोली रस्ता. हें अंतर २ मैल आहे.

( ब ) मालें ते वाघवीळ रस्ता. हें अंतर ३ मैल आहे.

हे रस्ते तयार करण्यास लोक गांवमदत देण्यास तयार आहेत.

गांवालगत असलेल्या ओढ्याजवळ बांधवलेला झरा आहे. त्यास रहाट व फरशी वगैरे होऊन मिळाल्यास नवीन भरल्या जाणाऱ्या बाजाराची व लोकांचीही सोय होणार आहे.

रस्त्यांची मागणी सयुक्तिक वाटते.

## पेटा पन्हाळा : ६ पडळ

कोल्हापुरापासून सदर गांव ९ मैल अंतरावर आहे. मराठी सातवीपर्यंत या गांवीं शिक्षणाची सोय आहे. या गांवचा बाजार पूर्वी मोठा असून

सर्व जिन्नस येथें विकत मिळत होते. इकडच्या खेड्यांतील लोकांना कोल्हापूरचे बाजारास जावें लागत नव्हतें, एवढा बाजार मोठा भरत असे.

या गांवांतील लोक उत्साहि असून कोणतेंही सार्वजनिक काम पाळक दिवस पाळून करण्याच्या तयारीचे आहेत. या गांवीं पडळ महारवाडा धान्य को. सो. अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

गांवची लोकसंख्या १३९९ आहे. मराठा, हरिजन, ब्राह्मण सर्व जातीचे लोक आहेत.

आठवड्याच्या बाजाराचा दिवस सोमवार असून दुपारीं २ ते ६ वाजेपर्यंत बाजार भरतो.

खालील गांवचे लोक या बाजारास येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| पोर्ले | ४४४ | १॥ |
| यवलूज | १७५७ | १॥ |
| सातार्डे | ८१२ | २ |
| देवठाणें | ३९१ | ३ |
| माजगांव | ३९२ | १ |
| पुशीरें | ३६९ | ३ |
| असुर्ले | ११९१ | २ |
| उत्रें | ९०४ | ३ |

याशिवाय म्हाळुंगें, का॥ ठाणें, सांगरूळ, वरींग पाडळी, खुपीरें, बाघवें, निटवडें या गांवाचे २०० लोक या बाजारास येतात.

गांवाचे एका बाजूस पूर्व पश्चिम रस्त्यावर बाजार भरतो.

तांदूळ, जोंधळा, भाजीपाला हे विक्रीचे प्रमुख जिन्नस होत. इतरहि सर्व माल बाजारांत येतो.

या बाजारांत हल्लीं ४०० रु. पर्यंत उलाढाल होते. धान्यावर बंदी नसतांना येथील उलाढाल ८०० ते १००० रु. पर्यंत होत असे.

पावसाळ्यांत बाजार फारच कमी भरतो. नोव्हेंबर ते मे अखेर बाजार बरा.

जनावरांचा बाजार या गांवीं नाहीं.

या गांवीं येण्यास दोन रस्ते आहेत. कोल्हापूर—कळे रस्ता व कोल्हापूर—प्रयाग रस्ता. मोठ्या रस्त्यापासून गांवीं जाण्यास जोडरस्ता (Approach road) नाहीं. हा जोडरस्ता सुमारें ३ मैल लांबीचा होईल. जोडरस्ता नसल्यानें पावसाळ्यांत लोकांचे अति हाल होतात. बाजारचे ठिकाणीं पिण्याच्या पाण्याची व धर्मशाळेची सोय नाहीं. बाजारास सावली नाहीं.

हव्या असणाऱ्या सुधारणाः—

बाजाराचे ठिकाणीं सावलीची सोय व पिण्याच्या पाण्यासाठीं जवळ विहीर पाहिजे. वरील जोडरस्ते पाहिजेत. लोक पाळक दिवस पाळून रस्ते करण्यास तयार आहेत. गांवाचे दक्षिणेस गांवठाण लगत एक खण (पाण्याची) आहे. ती वाढवून दिली असतां पाण्याची सोय होणार आहे.

वर लिहिलेल्या जोडरस्त्यावर दोन ओढे आहेत; त्या ठिकाणीं फरशीचा पूल केला असतां, या बाजाराची सोय होऊन गांवहि पुढें येईल.

या गांवीं ग्रामपंचायत असून, झाडें लावणें वगैरे किरकोळ सोयी करण्यास ती तयार आहे.

## पेटा पन्हाळा : ७ बाजार भोगांव

कोल्हापुरापासून सदर गांव २० मैल असून "सुधारणा केंद्र" म्हणून सुधारणा खात्यातर्फे निवडलें गेलें आहे. या गांवीं मराठी शाळे-साठीं स्वतंत्र इमारत असून मराठी ७ वी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. येथल्या बाजारावर कोकणांतील लोक फार अवलंबून असतात.

गांवची लोकसंख्या १०२७ आहे. बहुतेक सर्व लोक शेतकरी आहेत.

येथल्या बाजारास प्रमुखतः खालील गांवचे ३००० ते ४००० लोक येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| अणस्कुरा | ५५६ | १२ |
| मोसूम | २७६ | |
| बरकी | २९० | १० |
| मुरंबाळ | | |
| येळवडी | २८४ | ६ |
| करंजफेण | ३३३ | ५ |
| पाल | ९६ | ५ |
| इंजोळी | १४५ | ६ |
| सावर्डी | २०७ | ४ |
| पेंडागळे | ५१६ | २ |
| पोळें | | |
| किसरूळ | ७७० | ३ |
| कोळीक | ४०६ | ८ |
| सोनुर्लें | ५५८ | ३ |
| बोरगांव | ९५९ | ॥ |
| नेरलें ( ज. बावडा ) | ६९० | १६ |
| तिरवडें ( ,, ) | ६७५ | १६ |
| मांजरें ( ज. विशाळगड ) | ३१९ | ११ |
| यळवण ,, | ९६१ | १२ |
| शेबवणें ,, | ६२४ | १३ |

याशिवाय माळापुडे, पाट पन्हाळा, पडसाळी, गोण्णेवाडी, मनवाड, पिसात्री, पोंबरें, काळजवडें, परळी नांदारी, उंड्री, कळे मावडी, गजापूर, मूळ वाळवड, या गांवचे व ब्रिटिश हद्दींतील लोकही या बाजारास येत असतात.

या गांवीं दर बुधवारीं दुपारीं १२ ते संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत बाजार भरतो.

बाजार भरण्याची जागा, गांवाबाहेर शाळेशेजारीं आहे. बाजारास लोक खूप येत असल्यानें सर्व जागा भरून जाते.

कापड, जनावरें, नारळ, मिरची, तंबाकू, तांदूळ, जोंधळा हे विक्रीचे प्रमुख जिन्नस असून, हरएक प्रकारचा इतर सर्व तऱ्हेचा माल येथल्या बाजार दिवशीं विक्रीस येतो.

या बाजारामध्यें दर बाजारीं ८ ते १० हजार रुपयांची उलाढाल होते. याशिवाय जनावराचे बाजारामध्यें सुमारें ५ हजार रुपयांची उलाढाल होते.

पावसाळ्यांत बाजार कमी भरतो. अणरकुरा, काजिडा या बाजूचे लोक पावसामुळें बाजारास येऊं शकत नाहींत. जानेवारी ते मे अखेर मोठा बाजार असतो.

येथें जनावराचा बाजार भरतो. सर्व तऱ्हेचीं जनावरें ४०० पर्यंत येथें विक्रीस येतात. जनावराचे बाजाराकरितां मुख्य रस्त्यावरच सोय आहे. दोन्ही बाजूनें जनावरें बांधतात. ही जनावराच्या बाजाराची जागा बदलून नदीशेजारीं नेली तर जास्त सोय होईल. जनावरांना पिण्यास पाण्याची सोय आहे. या बाजारामध्यें ८००० रु. पर्यंत उलाढाल होते.

कळे—बाजार भोगांव हा एकच रस्ता या बाजूस आहे. पावसाळ्यामध्यें पोहाळ ओढ्यास पूल नसलेनें लोकांची येण्याजाण्याची फारच अडचण आहे. या रस्त्याशिवाय इतर उन्हाळी रस्ते आहेत. बाजारास सावलीची जागा आहे; पण ती जागा अपुरी आहे. धर्मशाळा नाहीं. पिण्याच्या पाण्याची सोय आहे.

जरूर असणाऱ्या सोयीः—

(अ) धर्मशाळा बाजाराचे ठिकाणीं बांधणें जरूरीच आहे.

(ब) पोस्टाच्या सोयीची आवश्यकता वाटते.

(क) बाजार भोगांव—काजिडा रस्ता तयार होणें जरूर आहे. हा रस्त १८ मैल लांबीचा होईल व सुमारें ८।९ खेड्यांची सोय होईल.

(ड) केरली—अणरकुरा रस्ता करणेचें पूर्वीच ठरलें आहे. या रस्त्याचा बाजाराची वाढ होण्याकडे निश्चित उपयोग होईल.

(इ) हल्लीचे बाजाराचे ठिकाणीं, पावसाळ्यांत चिखल होतो. तो न व्हावा म्हणून बाजाराची जागा मुरुमानें भरून घेणे जरूर आहे.

(फ) स्थानिक दुकानदारांना बाजाराचे ठिकाणीं दुकानें बांधण्यास ( Blocks ) जागा पाहिजे आहे.

या सर्व सुधारणा उपलब्ध झाल्या असतां, या पेठ्यांतील हें " आदर्श बाजारचें ठिकाण " होऊं शकेल.

## पेटा पन्हाळा : ८ कोडोली

कोडोली हें पन्हाळा पेठ्यांतील व्यापार व लोकसंख्येच्या दृष्टीनें एक नंबरचें गांव आहे. येथें एक सहकारी व एक खासगी अशा दोन शिक्षण-संस्था आहेत. सरकारी शाळेंत मराठी ७ वी पर्यंत शिक्षण दिलें जातें व २५० विद्यार्थी शिक्षण घेतात. खासगी शाळेंत इंग्रजी ४थी पर्यंत शिक्षण दिलें जात असून ती कोल्हापूर शिक्षण प्रसारक मंडळानें चालविली आहे. त्यांत १७५ विद्यार्थी शिक्षण घेत असतात. लुगडीं विणण्याचे २५० हातमाग असून लोक उद्योगी आहेत. या गांवीं कोडोली यंत्रून को. ऑ. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

येथील लोकसंख्या ६७४९ असून मराठा ३३२१, हरिजन जवळ जवळ १५००, लिंगायत ३९२ व बाकी इतर आहेत.

येथील बाजारचा दिवस गुरुवार असून बाजार करणेची वेळ साधारणतः दुपारीं १२ ते संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत आहे.

बाजाराकरितां खालील गांवचे अंदाजें ४।५ हजार लोक येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| बोरपाडळें | ११८४ | ३ |
| मोहरें | ६४२ | १ |
| आरळें | | २ |
| सातवें | १२०६ | ३ |
| कारवेवाडी | | २ |
| पारगांव | ३७३२ | ३॥ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| तिळेवाडी | | ४ |
| घुणकी | ३२२२ | ५ |
| तळसंदें | १५२० | ४ |
| यमाईवाडी | | १। |
| पोखलें | ६१५ | २ |
| मालें | २१६६ | २। |
| जाखलें | १०९३ | २ |
| केखलें | १०९१ | २॥ |
| पडळी | १३९९ | ३ |
| मांडपाळें | १३२१ | ३॥ |
| दाणेवाडी | ९० | ४ |
| गिरोली | १७७ | ४ |
| बहिरेवाडी | ७५९ | २॥ |
| किणी | २८२३ | ७॥ |

बाजार गांवचे मुख्य रस्त्यावर भरतो.

बाजारांत ज्वोंधळा, मिरची, भुईमूग, कांदे हे जिन्नस मोठ्या प्रमाणांत येतात.

बाजारांत सर्वसाधारण ८।१० हजाराची उलाढाल होते. आणि सुगीमध्यें फक्त मिरचीचाच व्यवहार दर बाजारीं १५।२० हजारांचा होतो.

सुगीच्या हंगामामध्यें बाजार फारच मोठ्या प्रमाणांत भरतो व यानंतर बाजार विशेषतः कमी अधिक प्रमाणांत भरतो.

कोडोलीला पूर्वी म्युनिसिपालिटी होती; पण हल्लीं ग्रामपंचायत सर्व व्यवहार पहाते. त्या ग्रामपंचायतीनें गांवालगत एक "गायरान" या नांवानें ओळखली जाणारी मोकळी जागा सरकारकडून घेऊन जनावरांचा बाजार भरविणेची खटपट केली होती; पण पाण्याच्या गैरसोयीमुळें ती यशस्वी होऊं शकली नाहीं.

जनावरांचा बाजार भरविण्याकरितां येथील लोक फार उत्सुक आहेत व त्याकरितां वाटेल ती मदत करावयास तयार आहेत. वडगांवला

जनावरांचा बाजार दर सोमवारीं भरतो व सोमवारचा बाजार झाल्यावर तीं जनावरें मांगल्याच्या बुधवारच्या बाजाराला कोडोली रस्त्यानें जातात व तेथून बांबवडे रस्त्यानें मलकापूरच्या शुक्रवारच्या बाजाराला जातात. करितां हल्लीं जो बाजार गुरुवारीं भरतो त्याऐवजीं तो जर मंगळवारीं भरविला तर वडगांवचा बाजार सोमवारीं, कोडोलीचा मंगळवारीं, मांगल्याचा बुधवारीं, बांबवड्याचा गुरुवारीं व मलकापूरचा शुक्रवारीं अशी सोईस्कर योजना होईल. जनावनारांच्या बाजारांत शिंगोटी कराचे अजमासें अडीच हजाराचें व खालीं नमूद केल्याप्रमाणें पाण्याची सोय केल्यास पाणी-पट्टीचें अजमासें पंधराशें मिळून ४००० चें उत्पन्न वर्षाला होईल.

गांवाला पाण्याची जी टंचाई आहे ती गांवाजवळ ओढ्यांत विहीर खोदून इंजिननें पाणी टाकींत भरून जर गांवांत फिरवलें तर लोकांना व बाजारला त्याचा उपयोग होऊं शकेल.

गांवचे सुरवातीला ज्या मोकळ्या जागा आहेत त्यांत गायरान रि. स. नं. २६७ चा जो प्लॉट आहे त्यांत व त्यासमोरच्या मोकळ्या जागेंत जनावरांचा व आठवड्याचा बाजार या दोहोंचा समावेश होऊं शकेल. बाजाराकरितां येणाऱ्या लोकांकरितां सावलीची व्यवस्था करणें अत्यंत जरूर आहे.

हल्लीं पुणें—रत्नागिरी रस्ता कोडोलीवरून जाणेयेणेकरितां उपयोगांत येणार असलेमुळें ह्या गांवाला बरेंच महत्त्व येईल. त्या दृष्टीनें वर नमूद केलेल्या सोई केल्या तर या बाजारचें महत्त्व वाढेल.

---

## जहागीर गगनबावडा : १ तिसंगी

ज. गगनबावडामधील हा गांव असून, कोल्हापूर—गगनबावडा रस्त्यावर कोल्हापुरापासून १९ मैलावर आहे. गांवामध्यें मराठी तिसरी इयत्तेपर्यंत शिक्षणाची सोय आहे. या गांवीं भरणारा बाजार "साळवण बाजार" या नांवानें ओळखला जातो. या गांवचे लोक मागासलेले,

स्वभावानें गरीब व शेतीचें पुरेसें उत्पन्न नसलेले असे आहेत. या जहागिरींतील हा सर्वांत मोटा बाजार होयः—

गांवची लोकसंख्या ७६८ असून, त्यांत मराठा व हरिजन यांचाच भरणा फार आहे.

आठवड्याचा बाजार दर शुक्रवारीं दुपारीं १ ते ५ चे दरम्यान भरत असतो.

आठवड्याच्या बाजाराकरितां खालील गांवचे अंदाजे २५०० ते ३००० लोक येतात.

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| मुतकेश्वर | १९९ | ४ |
| खडूळें | ११५ | ३ |
| लोंगे | २०५ | २॥ |
| अंदूर-अगदूर | ३७३ | ६ |
| मंदूर-मगदूर | ३६४ | ४ |
| मांडुकली | ५५५ | ४ |
| तळें | १८७ | ५ |
| तांदुळवाडी | ३५६ | २ |
| हरपवडें | ५१८ | ४ |
| काळजवडें | ५१९ | ३ |
| साळवण | १६३ | ॥ |
| सालरी | ३१३ | १ |

याखेरीज कळें, कोतोली, आसगांव, घरपण, परखंदळें, सांगरूळ, आकुर्डे, गोटें, अंबर्डे, गवशी, अंदूर, मगदूर, असळज, वेसरफ, सांगशी, कातळी या गांवचे लोक येतात.

आठवड्याचा बाजार गांवाच्या दक्षिणेस एक फर्लांगवर या गांवा खालील ' टेकावरील वाडी ' म्हणून वाडी आहे, त्या वाडी शेजारील मोकळ्या जागीं भरतो.

तंबाकू, मिरची, मासळी, मटन, तांदूळ, भोंपळे, भाजीपाला हे या बाजारांतील विक्रीचे प्रमुख जिन्नस होत; परंतु शेतकरी संसारास लागणारा हरएक प्रकारचा माल या बाजारीं विक्रीस येतो.

धान्य ( भात ) देऊन इतर किरकोळ जिन्नस विकत घेणेची पद्धत या बाजारीं दिसून येते.

बाजारांत हल्लींचे परिस्थितींत ४००० रु. ची उलाढाल होते. परंतु कंट्रोल नसतांना ६००० रु. ची उलाढाल होत असे.

पावसाळ्यांत बाजार फारच कमी भरतो. ( यावेळीं बाजार रस्त्यावर भरतो. ) इतर वेळीं ८ महिने बाजार उत्तम भरतो.

येथें जनावरांचा बाजार भरत नाहीं.

बाजारचें ठिकाण प्रशस्त आहे. या ठिकाणीं झाडाची सावली आहे. जवळच नदीचें पिण्यायोग्य पाणी आहे. उन्हाळ्यांत या ठिकाणीं बैलगाड्या येऊं शकतात. पण पावसाळ्यामध्यें गाडीरस्ता पाण्याखालीं बुडला जातो. म्हणून या ठिकाणीं बाजार भरणें अशक्य होतें. पावसाळ्यांत मोठ्या रस्त्यावर ( कोल्हापूर–गगनबावडा ) बाजार भरतो. बाजारचे ठिकाणीं धर्मशाळा, Shade वगैरे कांहीं नाहीं.

(अ) हल्लींची बाजार भरणेची जागा बदलणेची नसल्यास बाजारास जाणारा गाडी रस्ता उंचवून, खडी घालून मिळणें जरूरीचें आहे.

(ब) बाजाराची जागा बदलणें झाल्यास गांवालगत बिनशेतीची उन्हाळी व पावसाळी उपयोगाची, कोल्हापूर–गगनबावडा रस्त्यावर अशी दुसरी जागा आहे तेथें बाजार न्यावा. जवळच एक पडलेली विहीर आहे ती दुरुस्त करावी लागेल. सदर जागेत सावलीसाठीं झाडें लावावीं लागतील. सदर जागा खासगी मालकीची असून मुबलक मोठी आहे.

(क) कळें ते गगनबावडा हा एकच रस्ता या बाजूस आहे. या रस्त्यावरील गांवें बाजारास येऊं शकतात. इतर खेड्यांना जाणाऱ्या फक्त पायवाटा आहेत. पावसाळ्यांत रहदारी बंद असते.

(ड) साळवण ते कोदें रस्ता ( अंतर ७ मैल ) तयार होऊन मिळावा.

(इ) साळवण ते बावेली हा रस्ता तयार झालेस व्यापारवाढ होईल. या रस्त्यावर ६ खेडीं येतात.

(फ) बाजारचे ठिकाणीं धर्मशाळा बांधून मिळावी.

(ग) जनावरांचे बाजारची येथील लोकांची मागणी आहे. या बाजूस जनावरांचा बाजार फक्त बाजार भोगांव येथें आहे. जनावरें बांधण्यास जागा, पाण्याची सोय, सावलीची सोय येथें आहे.

(ह) येथें पोस्टाची जरुरी आहे.

## जहागीर गगन बावडा : २ गगन बावडा

हें जहागिरीचें मुख्य ठिकाण असून कोल्हापुरापासून ३५ मैल आहे. गांवीं मराठी ७ वीपर्यंत व इंग्रजी ५ वीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. व्यापाऱ्यांची संख्या २५ पर्यंत असून आपलें गांव व व्यापार यामध्यें सुधारणा व्हावी अशी यांची फार इच्छा आहे.

(२) गांवची लोकसंख्या १३७९ आहे.

(३) दर गुरुवारीं दुपारीं ११ ते ६ पर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजारास खालील गांवचे व हेत, उपळें, नेरलें, मोंदे, खुळखुळें, वेसरफ, सैतवडें, पळसंबें, असळज, कळें, मल्हार पेठ, साळवण या गांवचे, एकंदर मिळून २००० लोक जमतात.

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| करूळ | ११२७ | ५ |
| येडगांव | ९५२ | ७ |
| नावलें | ५९९ | ७ |
| वाभोंबे | ३५८ | ८ |
| अचीर्गे | १२८९ | १२ |
| कोकीठरे | ३०१२ | १० |
| नाधवडे | २५०८ | १२ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| नापणें | ५८९ | १० |
| कुसूर | १८२० | ८ |
| कुरली | १५६४ | १२ |
| खंबाळें | १२२७ | ११ |
| उंबर्डे | १९६३ | ११ |
| मांगोली | १२६१ | ९ |
| वेंगसर | ८७१ | ११ |
| सांगशी | १२५ | २॥ |
| कातळी | १६८ | २॥ |
| तिथवली | १२०७ | ११ |
| तिरवडें | ६७५ | ८ |
| म्हासुर्ली | १०९१ | ११ |

याशिवाय केव्हां केव्हां हुपरी, माणगांव, संकेश्वर व कोल्हापूर येथूनहि व्यापारी माल विक्रीसाठीं येतात.

(५) गांवामधील बाजारपेठेच्या मुख्य रस्त्यावर बाजार भरतो.

(६) वरी, नाचणा, भोंपळा, तांदूळ, मटन, मासळी, तंबाकू, गूळ, घोंगडी हे विक्रीचे प्रमुख जिन्नस होत. पण प्रपंचास जरूरीस लागणारा सर्व प्रकारचा माल बाजारांत विक्रीस येतो.

(७) हल्लीं उलाढाल ३००० रु. पर्यंत होते. पूर्वी ५००० रु. पर्यंत होत असे.

(८) जून ते सप्टेंबर अखेर बाजार फार कमी भरतो. इतर वेळीं बाजार उत्तम भरतो.

(९) गुरांचा बाजार भरत नाहीं.

(१०) गगन बावडा–कोल्हापूर हा एकच रस्ता इकडील बाजूस आहे. इतर सर्व पायवाटा व पावसाळ्यांत त्या बंद असतात. बाजाराचे ठिकाणीं सावली विशेष नाहीं. पिण्याच्या पाण्याची सोय बरी नाहीं. धर्मशाळा नाहीं.

(११) जरूर असणाऱ्या सोयी—

बावडा ते धुंदवडें रस्ता तयार होणें जरूर आहे. या रस्त्याची लांबी सुमारें १३ मैल असून या रस्त्यावर ८ ते १० खेडी येतात.

लुपणी नदीवर पूल होणें जरूर आहे.

मांडुकली-धुंदवडें कच्चा रस्ता पक्का होणें बरें. अंतर ६ मैल.

येथें बाजारचे ठिकाणाजवळ सार्वजनिक विहीर आहे. ती उपसून रहाट बसवून दिला असतां लोकांची सोय होईल.

जनावरांचा बाजार भरावा अशीहि मागणी आहे.

येथें पाऊस अति, त्यामुळें बाजारचे लोकांसाठीं धर्मशाळा बांधली जाणें जरूर वाटतें.

बाजारची जागा, व व्यापाऱ्यांना वसाहतीसाठीं जागा गांवाचे पूर्वेस दिली असतां, व्यापारामध्यें वाढ होऊं शकेल.

## जहागीर गगन बावडा : ३ धुंदवडें

कोल्हापूर-गगन बावडा रस्त्यावर, कोल्हापुरापासून २४ मैलांवर अंदूर नांवाचें खेडें आहे. अंदूरपासून ५ मैल अंतरावर धुंदवडें असून, गांवास जाणारी वाट खराब आहे. पावसाळ्यांत ही वाट बंद असते. येथें मराठी ३ रीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. गांवचे लोक गरीब (स्वभाव व आर्थिक परिस्थिती) आहेत.

(२) गांवची लोकसंख्या ५३१ असून, मराठा व हरिजन यांचा भरणा सर्वांत जास्त आहे.

(३) बाजारचा दिवस रविवार असून दुपारीं २ ते ५ पर्यंत बाजार भरतो.

(४) खालील गांवचे सुमारें १००।१२५ लोक बाजारास येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| खेरिवडें | २२१ | २ |
| शेळोशी | २०८ | २॥ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| जरगी | ३११ | ३ |
| गारिवडें | २९८ | ५ |
| बावेली | ३४७ | ५ |
| कडवें | १५३ | ४ |
| पडसाळी | ५७७ | ८ |

याशिवाय कळें, बाजडा, धामूड, राशिवडें या गांवचे लोक येतात.

(५) गांवाशेजारच्या माळावर बाजार भरतो.

(६) मटन, मासे, नाचणे, तांदूळ, कापड हे विक्रीचे प्रमुख जिन्नस होत.

(७) बाजारामध्यें १५० रु. पर्यंत उलाढाल होते.

(८) जून ते आक्टोबरपर्यंत बाजार मुळींच भरत नाहीं. इतर वेळीं भरतो.

(९) गुरांचा बाजार भरत नाहीं.

(१०) या गांवीं येण्यास, व तेथून दुसऱ्या कोणत्याहि खेड्यास जाण्यास फक्त पायवाटा आहेत. बाजारास सावली पुरेशी नाहीं. धर्मशाळा नाहीं. पाणी पिण्याची सोय आहे.

(११) हव्या असणाऱ्या सुधारणाः—

(अ) सावलीसाठीं आणखी ४।५ झाडें जरूर आहेत.

(ब) बाजारासाठीं, बाजारचे जवळ विहीर काढून पाहिजे.

(क) धर्मशाळा पाहिजे.

(ड) गांवास येणारा रस्ता दुरुस्त राखला जाणें जरूर आहे.

## जहागीर गगन बावडा : ४ भुईबावडा

गगन बावड्याचे पश्चिमेस ६ मैलावर हा गांव असून, " सुधारणा-केंद्र " म्हणून निवडला गेला आहे. गांवांत व्यापाऱ्यांची संख्या १२ आहे.

घरटीं एक तरी मनुष्य मुंबईस कामास आहे. गांवात मराठी पांचवीपर्यंत शाळा आहे. गांव व्यवस्थित मांडणीचा व एकदम लक्ष वेधून घेणारा असा दिसून येतो.

(२) गांवची लोकसंख्या १५१८ असून, प्रामुख्यानें मराठे लोकांची संख्या बरीच आहे.

विशेष सूचना—या गांवीं ७ वर्षांपूर्वी बाजार भरत होता. हल्लीं बाजार मुळींच भरत नाहीं. खालीं दिलेली परिस्थिती ७ वर्षांपूर्वीची आहे.

(३) दर शुक्रवारीं दुपारीं ११ ते ४ पर्यंत बाजार भरत असे.

(४) आठवड्याच्या बाजारास खालील गांवांचे मिळून २०० लोक जमत असत:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| हेत | ६०७ | ३ |
| आखवणे | ५३१ | ३ |
| उपळे | ६४७ | ४ |
| नेरळे | ६९० | ६ |
| बांभवडे | ४९१ | ७ |
| कुंभवडे | ५४१ | ३ |
| सोनाळी | ७१८ | ५॥ |

याशिवाय दोनारी, तिरवडे, कोम, नोदें, मांगोली, उंबडें, कुसूर या गांवचे लोक येतात.

(५) गांवांतील प्रमुख रस्त्यावर बाजार भरत असे.

(६) कडधान्य, तांदूळ, नागली, गूळ, मिरची हे बाजारांतील विक्रीचे प्रमुख जिन्नस होत.

(७) उलाढाल ३०० ते ४०० रु. पर्यंत होत असे.

(८) हल्लीं बाजार या ७८ वर्षांत मुळींच भरत नाहीं.

(९) जनावरांचा बाजार या गांवीं नाहीं.

(१०) बाजारात सावलीची जागा आहे. पण बाजारांतील लोकांस पाणी पिण्याची सोय नाहीं. धर्मशाळा नाहीं.

(११) खालील सोयी लोकांना जरूर वाटतात:—

(अ) नदीशेजारीं विहीर काढणें जरूर आहे. उन्हाळ्यांत गांवात अगर बाजारात पाणी नाहीं.

(ब) आजूबाजूस २५ मैलांत जनावरांचा बाजार नसल्यानें, येथें जनावरांचा बाजार भरूं शकेल.

(क) बावडा–तिटवली रस्त्याची दुरुस्ती करणें जरूर आहे.

(ड) गड नदीवर पूल होणें जरूर आहे व धर्मशाळा पाहिजे. वळ कोंकणांत या बाजारचे ठिकाणाशिवाय दुसरा बाजार नाहीं.

## जहागीर गगन बावडा ; ५ राशिवडें

कोल्हापूर–राधानगरी रस्त्यावर, कोल्हापुरापासून १४ मैलावर हा गांव आहे. बावडा जहागिरींतील हा दुसऱ्या नंबरचा गांव असून मराठी ७ वी पर्यंत येथें शिक्षणाची सोय आहे. येथें धान्याची को–ऑपरेटिव्ह सोसायटी आहे. या गांवाचा व्यापार बरा असून येथें सुमारें २५ व्यापारी आहेत. गांवीं पोस्टाची सोय आहे. गांवचे लोक उत्साहानें कोणतेंहि सार्वजनिक काम पार पाडण्याच्या वृत्तीचे आहेत.

(२) गांवची लोकसंख्या २८२४ आहे.

(३) आठवड्यांतून दोन वेळीं, सोमवार व शुक्रवार या दिवशीं दुपारीं २ ते ६ पर्यंत बाजार भरतो.

(४) खालील गांवचे व्यापारी येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| कुरूकली | ९७८ | ३ |
| परितें | १०६७ | २ |
| यवती | ८७३ | ४ |
| म्हाळुंगे | १२३९ | ३ |
| बेलें | ८६३ | ३ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| सोनाळी | ७१८ | २॥ |
| कोळव | १६४० | २ |
| पुंगाव | ८२५ | ३ |
| धामूड | १०६३ | ४ |
| चांदें | ५११ | |
| कोतें | ११२९ | ४ |

याशिवाय कुई, इसूर, सोनाळी, घोटवडें, गेळवडें, वाघवडें, मोहेरें, माकोडी, शिरगांव, मांजरवाडी, आरळें, धानवडें, धुंदुरवाडी, अवचितवाडी, सावडें व मांडरें या गांवाचे लोक येतात.

(५) गावांतील मुख्य रस्त्यावर व्यापाऱ्यांचीं दुकानें आहेत व त्याच रस्त्यावर बाजार भरतो.

(६) तांदूळ, चुरमुरे, चिवे, लाकूड हे विक्रीचे मुख्य जिन्नस होत. परंतु इतर सर्व जरूरीचे जिन्नस बाजारांत विकत मिळतात. मोसमाच्या दिवसांत आंबे, फणस यांचा बाजार मोठा असतो.

(७) २०० ते ५०० रु. ची उलाढाल नेहमींच्या बाजारांत व आंब्याचे मोसमाचे वेळीं १००० रु. ची उलाढाल होते.

(८) शुक्रवारपेक्षां सोमवारीं बाजार मोठा भरतो. दररोज सकाळीं आजूबाजूच्या १०।२० खेड्यांतून लाकडाच्या मोळ्या व गवत विक्रीस येतें. नोव्हेंबर ते मे अखेर बाजार मोठा व इतर वेळीं साधारण भरतो.

(९) जनावरांचा बाजार भरत नाहीं.

(१०) बाजाराच्या ठिकाणीं सावलीची, पिण्याच्या पाण्याची व धर्मशाळा वगैरेचीही सोय नाहीं. कोल्हापूर राधानगरी रस्त्यावर असलेल्या खेड्यांना या बाजारास येण्यास रस्ता चांगला असून इतर खेड्यांना फक्त पायवाटा आहेत.

(११) हव्या असणाऱ्या सुधारणा:—

(अ) राशिवडें–बावेली रस्ता तयार केलेस २९ खेड्यांची सोय होणार आहे.

(ब) भोगावती नदीवर पूल केल्यास सुमारें ५० खेड्यांची सोय होणार आहे.

(क) हल्लीं भरत असलेल्या बाजाराची जागा बदलून, गांवाच्या उत्तरेस गोठण नांवाचा माळ ( स. नं. १०३१, ३ एकर, ५ गुंठे ) आहे. तेथें बाजार नेला असतां त्यामध्यें लोकांची सोय होण्यासारखी आहे.

(ड) गोठणांत पाण्यासाठीं विहीर काढली तर बाजाराची सोय होईल.

(इ) धर्मशाळा बांधली असतां पावसाळ्यांत व्यापाऱ्यांची गैर-सोय दूर होईल.

(फ) गांवाच्या मध्यभागीं असलेल्या तलावाची, गाळ वगैरे काढून दुरुस्ती केल्यास लोकांची सोय फार होणार आहे.

(ग) पाणी नसल्यानें जनावरांचा बाजार भरत नाहीं. पाण्याची सोय झाल्यानें तोही भरूं लागेल.

## जहागीर गगन बावडा : ६ पळसंबे

कोल्हापूर—गगनबावडा रस्त्यावर कोल्हापुरापासून २७ मैलावर सदर गांव आहे. हा बाजार असळज गांवाचे हद्दींत भरत असतो. गांवांत दुकान एकहि नाहीं. लोकांची आर्थिक परिस्थिती निकृष्ट व स्वभाव गरीब आहे.

(२) या गांवची लोकसंख्या २२५ असून, त्यांत मराठ्यांचा भरणा फार आहे.

(३) दर मंगळवारीं दुपारीं १ ते ५ चे दरम्यान बाजार भरतो.

(४) आठवड्याच्या बाजाराकरितां खालीं दिलेल्या गांवचे लोक सुमारें १५० येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| शेनवडें | १५८ | ५ |
| खुळखुळें | ३५९ | ३ |
| असळज | ५०२ | ॥ |
| वेसरफ | २१६ | ॥ |
| शेळवडें | ४८७ | २ |
| मोंडें | ३११ | ३ |

याशिवाय अंदुर, कुवारें, सरगी, कोनोली या गांवचे लोक येतात.

(५) कोल्हापूर–गगन बावडा रस्त्यानजीक असलेल्या एका खाजगी मालकीच्या भातशेती जमिनीमध्यें सदर बाजार भरतो. पावसाळ्यांत या ठिकाणीं बाजार भरत नाहीं.

(६) मासळी, मिरची, कांदे व धान्य हे विक्रीचे महत्वाचे जिन्नस होत.

(७) हल्लीं सुमारें २०० रु. ची उलाढाल होते, धान्यावर बंदी नसतांना ४०० रु. ची उलाढाल होत असे.

(८) पावसाळ्यांत चार महिने सबळ सवळ बाजार भरत नाहीं. उरलेले आठ महिने बाजार बरा भरतो.

(९) येथें गुरांचा बाजार भरत नाहीं.

(१०) कोल्हापूर–गगन बावडा हा एकच रस्ता या बाजूस आहे. इतर सर्व पायवाटा आहेत. म्हणून पावसाळ्यांत रहदारी कमी. बाजारास पिण्याच्या पाण्याची सोय आहे. सावलीसाठीं झाडें आहेत. धर्मशाळा नाहीं

(११) हव्या असणाऱ्या सुधारणा—

(अ) या खाजगी मालकीच्या जमिनीमधून शेजारच्या खाजगी मालकीच्या माळावर बाजार न्यावा. यासाठीं जागा अॅक्वायर करावी लागेल.

(ब) या ठिकाणीं सावलीसाठीं झाडांची लागण करावी लागेल.

(क) पावसाळ्यांत, बाजार भरणें अशक्य होतें म्हणून धर्मशाळा अगर Shade बांधून देणें जरूर आहे.

## पेटा राधानगरी :

## १ राधानगरी

राधानगरी हें गांव कोल्हापूर–फोंडा या मुख्य रस्त्यावर कोल्हापुरापासून एकतीस मैलावर आहे. हें पेट्याचें मुख्य ठिकाण असून येथें मुलकीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. जनावरांचा व माणसांचा असे दोन दवाखाने असून दररोजच्या टपालाची सोय आहे. या गांवीं राधानगरी श्री लक्ष्मी को–के. सोसायटी अनलि. नांवाची संस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या २६९३ असून हरिजन व मराठा यांची वस्ती जास्त आहे.

(३) येथें बाजार रविवारीं भरतो. बाजार सकाळीं ११ वाजलेपासून संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत असतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या गांवांचे अदमासें २००० लोक येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| सोळांकूर | ९४३ | ५ |
| मोघर्डे | १०९ | ५॥ |
| मल्लेवाडी | १८९ | ६ |
| हेळेवाडी | १४९ | ९ |
| ऐनी | ८०३ | ८ |
| काट्टेगांव | २७८ | ६ |
| पणोरी | ५३६ | ५ |
| फराळे | ५०० | ५ |
| हसणगांव | १९८ | ४ |
| राजापूर | २५३ | ८ |
| भांडणे | ३५३ | ११ |
| कांबर्डे | २०७ | ७ |
| नानिवडे | ३५८ | १४ |
| कोनोली | ६६७ | ८ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| चांबर्डे | २७३ | ८ |
| पाट पन्हाळा | १६७ | ४ |
| रामणवाडी | ७६ | २ |
| पेठबिवर्डे | ३११३ | २ |
| ओळवण | ८२३ | १० |
| पडळी | ३१८ | १॥ |
| सावर्धन् | ६१ | २ |
| पिरळ | ९०२ | २ |
| शिरोली | ६८७ | २ |
| कुडुत्री | ४७९ | ३ |
| करंजफेण | ३८० | ४ |

(५) बाजार गांवांतील मुख्य रस्त्यावर भरतो. त्यामुळें रहदारीस अडथळा होतो.

(६) बाजारांत विक्रीकरतां भात, नाचणा, मिरची, तंबाकू, मासळी व मातीचीं भांडीं हे जिन्नस प्रामुख्यानें येतात.

(७) या बाजारांत अंदाजें ५।६ हजारांची उलाढाल होते.

(८) इकडे पावसाचें मान जास्त असले कारणानें व भोंवतालचा प्रदेश डोंगराळ असल्या कारणानें लोकांना बाजारांत येणें कठीण पडतें. यामुळें पावसाळ्यांत बाजार विशेष भरत नाहीं. हिवाळ्यांत व उन्हाळ्यांत बाजार चांगला भरतो.

(९) येथें गुरांचा बाजार भरत असून ३००।४०० पर्यंत जनावरें विक्रीकरितां येतात. येथील शिंगोटी कराचें उत्पन्न ५०।६० रुपये इतकेंच आहे. हल्लीं भरत असलेल्या बोर्डिंग जवळील गुरांच्या बाजाराची जागा योग्य अशी नाहीं. परंतु सर्व्हे नं. ५३५ या झाडीमय असलेल्या बागेंत भरावा व जनावरांना पिण्याच्या पाण्याची कांहीं तरी सोय करावी लागेल.

(१०) येथें पाण्याची सोय बरी आहे. बाजाराचे लोकांकरितां धर्मशाळा बांधल्यास त्यांची राहण्याची सोय होण्यासारखी आहे.

(११) बाजारवाढीचे दृष्टीनें बाजाराकरितां सोईस्कर जागा पाहून बाजार भरणेकरितां शेड्स बांधणें योग्य होईल. उपरि निर्दिष्ट केलेल्या कोल्हापूर-फोंडा या रस्त्याव्यतिरिक्त दुसरे चांगले रस्ते नाहीत.

राधानगरी ते फराळें हा जुना रस्ता दुरुस्त करून मिळावा व मांजरखिंड ते नानिवडें हा उन्हाळी रस्ता पक्का करून मिळावा अशी लोकांची मागणी आहे.

## पेटा राधानगरी — २ घोटवडें

घोटवडें हें गांव राधानगरी पेट्यांत असून कोल्हापुरापासून १६ मैलावर आहे. मराठी चवथीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. तसेंच "घोटवडें कोऑपरेटिव्ह सोसायटी अन्लि." या नांवाची एक सहकारी संस्था आहे. गांवांत ४०–५० हातमाग आहेत. येथें दररोजच्या टपालाची सोय आहे.

(२) या गांवची लोकसंख्या ९७९ असून त्यांत मुख्य वस्ती मराठ्यांची आहे.

(३) आठवड्याचा बाजार शनिवारीं भरतो. बाजारची वेळ साधारणतः दुपारीं १ वाजलेपासून सायंकाळीं ७ वाजेपर्यंत आहे.

(४) या बाजाराकरितां खालील गांवचे लोक अदमासें २००० येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| कोवळें | | १ |
| शिरसें | ७४० | २ |
| आमजाई व्हरवडें | ५१२ | ३ |
| आवळी | ८७६ | २॥ |
| गुडाळ | ११७० | ३ |
| परितें | १०६७ | २ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| पुंगांव | ८२५ | २ |
| घाफोडी | ४९१ | ३ |
| वाघवडॅ | १५९ | ३ |

(५) बाजार गांवांतील मुख्य रस्त्यावरच भरतो.

(६) हल्लीं बाजारांत मुख्यतः तुरीची डाळ, उडीद, मिरची, कांदे, मसाल्याचे जिन्नस, लुगडी, चोळखण वगैरे जिन्नस विक्रीकरितां येतात.

(७) हल्लीं बाजारांत ४–५ हजारांची उलाढाल होते.

(८) बाराहि महिने बाजार या गांवीं चांगला भरतो. फक्त पावसाळ्यांत बाजार थोडासा कमी प्रमाणांत भरतो.

(९) या ठिकाणीं जनावरांचा बाजार भरत नाहीं. तथापि जनावरांचा बाजार भरविण्याची परवानगी या गांवास मिळालेली आहे. तूर्त तयारी म्हणून जनावरांना पाण्याची सोय करणेकरितां तात्पुरतें धरण घालून पाणी अडविलेलें आहे. बाजाराची जागाहि मुक्रर केलेली आहे. शिवोटी कराचा मक्ता ५०० ते ७०० रुपयापर्यंत घ्यावयास गांवकरी तयार आहेत.

(१०) गांव रस्त्यावर आहे. म्हणून बरेचसे लोक बाजाराला जमतात. लोकांना बसण्याकरितां शेड्स वगैरे कांहीं नाहीं. भोगावती नदी रस्त्यालगत वहात असल्या कारणानें पाण्याची सोय आहे.

(११) या गांवचा बाजार पूर्वी सोमवारीं भरत असे. पण अलीकडे सोमवारचा दिवस बदलून शनिवार ठरविण्यांत आला व त्याच वेळीं राशिवड्याचा (बावडा जहागीर) बाजार सोमवारीं भरविण्याचें ठरविण्यांत आलें. पण यामुळें राशिवड्याचा बाजार वाढला नाहींच नाहीं; पण घोटवड्याचा बाजार मात्र घटला. पूर्वी घोटवड्यास १५–२० हजारांची उलाढाल होत असे. पण आतां मात्र ती ४–५ हजारांवर आली आहे. राशिवड्याचा बाजार आठवड्यांतून दोन वेळां भरवला जातो, सोमवार व शुक्रवार. बाजारांत भाजीपाल्याशिवाय कोणतेच जिन्नस विक्रीकरितां यत नाहींत व बाजाराला अवघीं २५–३० माणसें येतात. तेव्हां राशिवड्याचा बाजार फक्त शुक्रवारीं ठेवून घोटवड्याचा बाजार सोमवारीं ठेवणें जास्त

श्रेयस्कर वाटतें. या गांवाच्या आसपासचे बाजार म्हणजे वाळवें आणि धामूड या गांवचे होत. तेही दर शनिवारींच भरतात. या सर्व गोष्टी विचारांत घेतां बाजारवाढीच्या दृष्टीनें घोटवड्याचा बाजार दर सोमवारीं भरविणें इष्ट आहे, असें दिसून आलें. यामुळें या गांवचा व आसपासच्या बाजाराच्या गांवांचाहि बाजार मोठा भरेल यांत शंका नाहीं. गांवकऱ्यांची व बाजाराला येणाऱ्या व्यापाऱ्यांची हीच मागणी आहे. बाजाराला येणाऱ्या लोकांच्याकरितां शेडस् बांधणें फार जरूर आहे. बाजारवाढीचे दृष्टीनें सुधारणा केल्यास घोटवडें हें गांव वाढेल व जनावरांचा बाजारही भरावयास लागेल.

## पेटा राधानगरी : ३ सरवडें

सरवडें हें गांव राधानगरी पेट्यांतील असून निपाणी–राधानगरी–फोंडा रस्त्यावर राधानगरीपासून आठ ८ मैलावर आहे. येथें मुलकीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. वैद्यकीय केंद्र असून दररोजच्या टपालाची सोय आहे. या गांवीं सरवडें श्रीलक्ष्मीबाई को. ऑ. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या २३२७ असून मुख्य वस्ती मराठा व हरिजन यांची आहे.

(३) येथें दर शुक्रवारीं सकाळीं पहाटे ५॥ वाजलेपासून संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपासच्या गांवचे अदमासे चार हजार लोक जमतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| यमगें | १६२८ | ६॥ |
| चिमगांव | १३१९ | ६॥ |
| हमिदवाडा | १७७० | १२ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| खडकेवाडा | १६८६ | १२ |
| निपाणी (ब्रि०) | | २० |
| मडिलगे | १८०० | ४ |
| कूर | ८८३ | ३ |
| टिकेवाडी | ८१४ | ३ |
| नाधवडे | ९४८ | ३ |
| कोनवडे | ७३५ | ३॥ |
| पांचवडे | २७६ | ५ |
| मिणचें | ५८५ | ५ |
| मिणच्याचा धनगरवाडा | १०५ | ६ |

(५) नवीन वसाहतीच्या वरचे बाजूस बाजारटेक या जागीं बाजार भरतो. ही जागा बाजारास सोईची व पुरेशी आहे.

(६) या बाजारांत मुख्यतः सर्व प्रकारचें धान्य, तंबाकू, तयार कपडे, लुगडीं, चोळखण, भाजीपाला, वाणसौदा, मासळी, घोंगडीं वगैरे सर्व प्रकारचा जीवनोपयोगी माल विकावयास येतो.

(७) या बाजारांत सर्वसाधारण १० हजार रुपयेपर्यंत उलाढाल होते.

(८) पावसाळ्यांत बाजार कमी प्रमाणांत भरतो. हा बाजार राधानगरी पेट्यांत मोठा गणला जातो.

(९) या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाहीं.

(१०) या गांवाचे समोंवार दूधगंगा नदी असलेनें गांवचे लोक नेहमीं पिण्याकरितां व खर्चाकरितां ह्या नदीच्या पाण्याचा उपयोग करतात. बाजारादिवशीं बाजारचे लोकांकरितां ग्रामपंचायतीतर्फे लोकांची पाण्याची सोय केली जाते.

## पेटा राधानगरी : ४ वाळवें

वाळवें हें गांव राधानगरी पेठ्यांतील असून कोल्हापूर–गारगोटी रस्त्यावर शेळेवाडी या गांवावरून मुख्य रस्त्याचे आंत अडीच मैल आहे. या गांवालगत दूधगंगा नदी वाहात असल्यानें पावसाळ्यांत या गांवास जाणें व त्या लोकांना कोल्हापुरास येणें दुरापास्त होतें. येथें मुलकी-पर्यंत शिक्षणाची सोय असून वैद्यकीय केंद्र आहे. पोष्टाची सोय आहे. या गांवीं का।। वाळवें रघुवीर को. के. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या ३२८४ असून मुख्य वस्ती मराठा व हरिजन यांची आहे.

(३) येथें दर शनिवारीं १२ वाजलेपासून संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपासच्या गांवचे अजमासें ४।५ शें लोक जमतात:—

| गांवाचे नांव | लोकसंख्या | अं. मै. |
|---|---|---|
| शेंडूर | १४९४ | ७ |
| कोनवडें | ८०४ | ६ |
| सावर्डे बु. | १६०८ | ५ |
| सावर्डे खु. | ६६८ | ५ |
| गोरंबें | १२२१ | ७ |
| म्हनाळी | ९२१ | ४ |
| सार्के | ११७५ | ५ |
| शिदनेर्ली | १८०९ | ८ |
| वामणी | ७८७ | ४ |
| बेलवली बु. | ११७२ | १॥ |
| बेलवली खु. | ६५७ | ३ |
| केंबळी | ५४४ | ३॥ |
| वाचणी | ९६६ | ४॥ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| वाळवें खु. | ८९५ | १ |
| पिराची वाडी | ५६५ | २ |
| सोनाळी | १११६ | ३ |
| बिद्री | ७३६ | ४ |
| बोरवड | २०४१ | ५ |
| तिटवें | ९०५ | ३ |
| शेळेवाडी | ४८० | ३ |
| टिकपुर्ली | १६९६ | ४ |
| अर्जुनवाडा | ९४३ | ४ |
| तुरंबे | १८०५ | ४ |
| कासारवाडा | ५३२ | ५ |
| तळाशी | १६८१ | ५ |
| माजगांव | ३९२ | ४ |
| निगवें | १६९८ | ३ |
| कावणें | ६७१ | ३ |
| चुवें | ९८१ | २॥ |
| चंद्रे | ११७४ | १॥ |

(६) या बाजारांत मुख्यतः सर्व प्रकारचें धान्य, तयार कपडे, लुगडीं, चोळखण, भाजीपाला, तंबाकू, वाणसौदा वगैरे सर्व जीवनोपयोगी जिन्नस विकावयास येतात.

(७) या बाजारांत सर्वसाधारणतः दीड, दोन हजार रुपयेपर्यंत उलाढाल होते.

(८) पावसाळ्यामध्यें बाजार कमी प्रमाणांत भरतो. आणि उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत मोठ्या प्रमाणांत भरतो.

(९) या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाहीं.

(१०) उन्हाळ्यामध्यें बाजार नदीलगत असलेल्या मोठ्या पटांगणामध्यें भरतो. पावसाळ्यांत नदीला पाणी येत असल्यामुळें पटांगण

बाजार भरण्यास निरुपयोगी होतें व तोच बाजार विठ्ठल मंदिरासमोर व सभोंवतीं भरतो, व वर्षांतील कांहीं आठवडे मरगाई देवीच्यासमोर भरतो. मरगाई देवीसमोर असलेल्या पटांगणांत सोईस्कर शेडस् बांधल्यास बाजाराकरितां ती जागा योग्य होईल. पाण्याकरितां एखादी सार्वजनिक विहीर बांधावी लागेल.

## पेटा राधानगरी : ५ ठिकपुर्ली

ठिकपुर्ली हें गांव राधानगरी पेट्यांत कोल्हापूर–गारगोटी रस्त्यावर एकोणीस मैलावर असलेल्या शेळेवाडी या गांवापासून रस्त्यापासून एक मैल आहे. येथें मराठी ४ थी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. येथें वाचनालय असून धान्य सोसायटी आहे. दररोजच्या पोस्टाचे टपालाची सोय आहे. या गांवीं ठिकपुर्ली को.–ऑ. के. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) याची लोकसंख्या १६९५ असून मुख्य वस्ती मराठा व हरिजन यांची आहे.

(३) येथें दर बुधवारीं बारा वाजलेपासून संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपास गांवचे अजमासें हजार बाराशे लोक जमतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| बेलेवाडी खु॥ | ११७२ | ५ |
| बेलवळी | ६५७ | ५ |
| तळाशी | १६८१ | २ |
| शेळेवाडी | ४८० | १ |
| माजगांव | ३९२ | १ |
| सिरसें | ३७० | ३ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| चांदिकरवाडी | ५११ | ३ |
| परितें | १०६७ | ३ |
| कुरुकली | ९७८ | ४ |
| चुयें | ९८१ | ४ |
| कपिलेश्वर | ९५६ | ५ |
| कावणें | ६७१ | ३ |
| म्हाळुंगें | १२३९ | ३ |
| अर्जुनवाडा | ९४३ | ३ |
| आवळी | ८७६ | ६ |
| शिरगांव | ११८६ | ६ |
| तिटवे | ९०५ | ४ |
| कासारवाडा | ५३२ | ५ |
| कोलव | १६७० | ३ |

(५) बाजार पेठेंतच रस्त्यावर भरतो.

(६) बाजारांत मुख्य जिन्नस धान्य, तयार कपडे, लुगडीं, चोळखण भाजीपाला, तंबाखू, मिरची, वाणसौदा वगैरे जीवनोपयोगी जिन्नस येतात.

(७) या बाजारांत सर्वसाधारण दहा हजार रुपयेपर्यंत उलाढाल होते.

(८) पावसाळ्याव्यतिरिक्त बाजार बरा भरतो.

(९) या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाहीं. कारण पाण्याची सोय नाहीं.

(१०) येथें गांवचे लगत इलाखा पंचायतीनें बांधलेल्या विहिरीच्या पाण्याचाच पिण्याकरतां उपयोग होतो. पण उन्हाळ्यामध्यें या विहिरीच्या पाण्याचा पुरवठा होत नाहीं.

(११) नुकताच गांवमदतीनें शेळेवाडीपासून टिकपुर्लीपर्यंत एक मैलाचा रस्ता केलेला आहे. यामुळें आजूबाजूचे लोकांना बाजारास येणे-करितां सोय झाली आहे. तरी पण टिकपुर्ली ते परितें हा रस्ता दुरुस्त करून मिळाल्यास आजूबाजूच्या बऱ्याच गांवचे लोकांची सोय होण्यासारखी आहे.

## पेटा राधानगरी :  ६ धामूड

धामूड हें गांव राधानगरी पेठ्यांतील असून कोल्हापूर–राधानगरी रस्त्यावरील १९ व्या मैलावर असलेल्या आमजाई–व्हरवडें मुख्य रस्त्यापासून २॥ मैल आंत आहे. येथें मराठी ४ थी पर्यंत शिक्षणाची सोय आहे.

(२) या गांवची लोकसंख्या १६०३ असून मराठा व हरिजन यांची वस्ती जास्त आहे.

(३) येथें शनिवारीं दोनप्रहरीं १ वाजलेपासून सायंकाळीं ६ वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजाराकरितां खालील गांवचे ३।४ हजार लोक जमतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| केळोशी ( थोरली ) | ९२३ | २॥ |
| बावेली | ३४७ | ६ |
| कडुवें | १५३ | ७ |
| गारीवडें | २९८ | ९ |
| कानोली | ५६७ | ११ |
| शेळोशी | २०८ | १२ |
| म्हासुर्ली | ५३० | ५ |
| अपटाळ | ३२७ | ३ |
| केळोशी ( धाकटी ) | ४८० | ३ |
| गुरंबाळी | ४५३ | २ |
| कांचनवाडी | २१९ | ५ |
| चाफोडी | २५९ | ५ |
| गर्जन | ३१९ | ५ |
| तरसंबळें | ३६० | ३ |
| कोतें | ११११ | ३ |
| चांदें | ५११ | ३॥ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| धानवडें | ६८१ | ४ |
| धुंगरवाडी | १०० | ४ |
| वाघवडें | १५९ | २ |
| कोदवडें | २१७ | २ |
| येळवडें | ९२१ | २ |
| पुंगाव | ४१४ | १॥ |
| बेलें | ८६१ | २ |
| शिरगांव | ११८६ | १ |

(५) बाजार गांवांतील मुख्य रस्त्यावर भरतो.

(६) या बाजारांत भात, तांदूळ, नाचणा, वाणसौदा, भाजीपाला इ. जीवनोपयोगी जिन्नस विक्रीकरितां येतात.

(७) बाजारांत ४।५ हजार रुपयांची उलाढाल होते. नियंत्रण बसण्यापूर्वी हीच उलाढाल ७।८ हजारांपर्यंत होत होती.

(८) या गांवचे दोन्ही बाजूस भोगावती व तुळशी या दोन नद्या असलेनें पावसाळ्यांत येथील बाजार कमी प्रमाणांत भरतो व पीक निघाले-नंतर हा बाजार बाटीस लागतो.

(९) या गांवीं बाजाराला पावसाळ्यांत येणाऱ्या लोकांची फारच कुचंबणा होते; कारण आमजाई-व्हरवडें-शिरगांवपर्यंतचा रस्ता शेतवडींतून गेलेला आहे व शिरगांवजवळच भोगावती नदी आहे. बाजारांत लोकांना बसण्याकरितां धर्मशाळेसारखी एखादी इमारत अगर देऊळ नाहीं. गांवालगतच असलेल्या ओढ्यांत इलाखा पंचायतीनें बांधलेल्या विहिरीचे पाण्याचाच लोक उपयोग करतात.

(१०) आमजाई-व्हरवडें ते धामूड या रस्त्यावर अंदाजें २०० गाड्या फिरतात. गाड्यांना डोंगरावरून व शेतवडींतून जावें लागतें, यामुळें गाडीवानांचें अतोनात नुकसान होतें. असें सांगणेंत येतें कीं, या रस्त्यावर नुसतीं गुरेंच दगावलीं असें नव्हे तर कित्येक गाडीवानही दगावले आहेत. तेव्हां हा रस्ता आखणी करून दिल्यास गांवमदतीनें कच्चा रस्ता करून

देणेस लोक तयार आहेत. अपुरी राहिलेली विहीर पुरी करून मिळणेची लोकांची मागणी आहे. बाजारला येणाऱ्या लोकांसाठीं एकादी धर्मशाळा होणें जरूर आहे.

## पेटा राधानगरी : ७ क॥ तारळें

कसबा तारळें हें गांव राधानगरी पेट्यांतील आहे. कोल्हापूर ते गैबीखिंड रस्त्यावरील खिंडीचें व्हरवडें गांवापासून ३ मैल आंत असून रस्ता आडमार्गांचा आहे. येथें मराठी सात इयत्तेपर्यंत व इंग्रजी तीन इयत्तेपर्यंत शिक्षणाची सोय आहे. या गांवीं तारळें को-ऑ. के. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) लोकसंख्या १५०० असून मुख्य वस्ती मराठा, हरिजन यांची आहे. तरी पण ब्राह्मण वस्ती बरीच असलेनें हें राधानगरी पेट्यांतील सुशिक्षित, सुधारलेलें गांव गणलें जातें.

(३) येथें दर गुरुवारीं सकाळीं दहा अकरा वाजलेपासून संध्याकाळीं सहा सात वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) येथें बाजाराकरितां खालीं नमूद केलेल्या आसपासच्या गांवचे अदमासें १००० लोक जमतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| तारळें खु॥ | ९१५ | ॥। |
| कुकुडवाडी | १२९ | १॥ |
| गुडाळ | ११७० | १ |
| आवळी खु॥ | ४२४ | २ |
| तरसंबळें | ३६० | ३॥ |
| कळंकवाडी | ९२ | १ |
| कंथेवाडी | २८० | २ |
| गुडेवाडी | २७९ | ३॥ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| अपटाळ | ३२७ | ७ |
| जळगांव | ६०२ | ६ |
| दुर्गमानवाड | ४६३ | ३ |
| पिरळ | ९०३ | २ |
| कुडुत्री | ४७९ | १ |
| करंजफेण | ३८० | १॥ |
| शिरोली | ६८७ | १॥ |
| अणार्जे | ७०६ | ३ |
| खिंडीचें व्हरवडें | ६३७ | ३ |
| मानवें | ३६७ | १२ |
| बोरबेट | २२८ | १८ |
| तळीयें | ११६ | ४ |
| लखनापूर | १७५ | ५ |
| कंदळगांव | १८८ | ३ |
| सई | १४० | ६ |
| पळसाळी | ५७७ | १० |
| जरगी बावेली | ३११ | १२ |

(५) येथें बाजार हल्लीं मारुतीचे देवालयासभोंवतीं व मुख्य रस्त्यावर भरतो. ही जागा अपुरी असून रहदारीस बाजारामुळें अडथळा होतो.

गांवाचे मध्यभागीं अदमासें साडेतीन एकर सरदार पाटणकर यांची खुली जागा आहे. यांत फक्त गवत व वेळूची लागवड केलेली आहे. ही अशीच ठेवल्यास गांवच्या आरोग्याच्या दृष्टीनें अपायकारक आहे. तेव्हां ही जागा ॲक्वायर करून येथें बाजार भरवल्यास योग्य होईल.

(६) बाजारांत मुख्य जिन्नस धान्य, तयार कपडे, कापड, लुगडीं, चोळखण, भाजीपाला, तंबाखू, मिरची, वाणसौदा, मीठ, नारळ, मासळी वगैरे जिन्नस विक्रावयास येतात.

(७) या बाजारांत सर्वसाधारण १००० रुपयांची उलाढाल होते.

(८) पावसाळ्यामध्यें बाजार साधारण कमी भरतो; याचें कारण आजूबाजूचा सर्व भाग डोंगराळ असून नदी ओढ्यामुळें रहदारी बंद होते.

(९) गुरांचा बाजार भरत नाहीं; भरण्याकरितां लोकांची मागणी आहे व त्यास लागणारी सर्व प्रकारची मदत करण्यासही लोक तयार आहेत.

(१०) या गांवीं सार्वजनिक पाण्याची सोय नाहीं. घरोघर आड आहेत. तसेंच गांवाजवळ नदी आहे; ह्यामुळें पाण्याची सोय झालेली आहे.

## पेटा गारगोटी : १ गारगोटी

करवीर इलाख्यांत जे सहा पेटे आहेत, त्यापैकीं हें एक पेट्याचें ठिकाण असून, कोल्हापूर–पाटगांव रस्त्यावर, कोल्हापुरापासून ३१ मैलांवर आहे. येथें मराठी सातवीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. प्रिन्स शिवाजी एज्यु. सोसायटीतर्फे येथें एक हायस्कूल स्थापन केलें गेलें आहे. त्यायोगें लौकरच मॅट्रिकपर्यंत शिक्षणाची सोय येथें होईल. बोर्डिंग बांधण्याचें काम सुरू झालेलें आहे. या गांवीं गारगोटी–भुदरगड' को. ऑ. के. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

(२) लोकसंख्या–या गांवाची लोकसंख्या २२८३ आहे. त्यामध्यें सर्व जातीचे लोकांचा भरणा आहे.

(३) बाजारचा दिवस–दर बुधवारीं दुपारीं १ ते ६ पर्यंत येथें बाजार भरत असतो.

(४) बाजारास खालील गांवचे मिळून ८०० ते १००० लोक येत असतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| खानापूर | ७२४ | १ |
| पाल | ४१२ | ३ |
| शिंदेवाडी | २०२ | २ |
| अंतवर्गे | ५०० | ४ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| कळनाकवाडी | ७२३ | ३ |
| आकुर्डे | १२१९ | ४ |
| फणसवाडी | ४१८ | ४ |
| सालपेवाडी | २६९ | ५ |
| पू | ९३६ | ३ |
| सोनारवाडी | ११०७ | २ |
| भाटवडे | ३७१ | ३ |
| म्हसवे | १००९ | १॥ |
| मिणचें | ७८५ | ४ |
| दारवाड | ६७० | २ |

याशिवाय शेणगांव, कडगांव या बाजूचे लोक येतात.

(५) बाजार भरणेची जागा—मामलेदार ऑफिस ते दवाखाना या गांवांतील मुख्य रस्त्यावर बाजार भरतो. या रस्त्यास लागून असणारे बोळां-मध्येंही विक्री करणारे खेडूत बसतात.

(६) या बाजारांतील विक्रीचे मुख्य जिन्नस, तांदूळ, जोंधळा, मिरची, कडधान्य, मांस, भाजीपाला हे होत.

(७) या बाजारांत सुमारें २००० रु. पर्यंत उलाढाल होते.

(८) उन्हाळ्यांत फार मोठा बाजार भरतो व इतर ऋतूंमध्यें सर्वसाधारण बाजार भरतो.

(९) या गांवीं जनावरांचा बाजार भरत नाहीं.

या गांवीं पिण्याच्या पाण्याची सोय म्हणजे गांवाजवळ नदी आहे. बाजारास बसण्याकरितां जागा भरपूर नाहीं. सावलीची सोय आहे. धर्मशाळा नाहीं.

(११) बाजारास जरूर असणाऱ्या सोयी—

बाजाराजवळ पिण्याच्या पाण्याच्या सोयीची जरूरी आहे. नदी बाजारापासून सुमारें ३।४ फर्लांगावर आहे. गारगोटीच्या पूर्वेस ३ मैलावर

डोंगरांत पाळ या नांवाचें खेडें आहे. तेथें जिवंत पाण्याचे झरे आहेत. तेथून बाजारास अगर गांवासहि पाणीपुरवठा करतां येईल.

कोठल्याहि बँकेची शाखा, अगर पैशाची देवाण घेवाण करणाऱ्या सहकारी सोसायटीची येथील व्यापाऱ्यांना जरूर वाटते.

नवीन मार्केट बांधून मिळाल्यास, व्यापारी लोक त्याचा पुरा फायदा करून घेतील.

या गांवीं धर्मशाळेचीहि जरूरी आहे. गारगोटी गांवाचा संबंध नेहमीं कोल्हापुराशीं असतो. गारगोटी हें गांव बेळगांव पोस्टल डिव्हिजनमध्यें असल्यानें कोल्हापूरचें टपाल येथें उशीरां ( तिसरे दिवशीं ) मिळतें. सदर गांव सातारा पोस्टल डिव्हिजनमध्यें अंतर्भूत झाल्यास, कोल्हापूरचें टपाल दुसरे दिवशीं मिळेल.

## पेटा गारगोटी : २ पिंपळगांव

हा गांव गारगोटी पेट्यांत कोल्हापूर—गारगोटी या रस्त्यावर गारगोटीपासून १२ मैल आंत व उत्तुर—भैरेवाडी—आजरा या रस्त्यावरील उत्तुरपासून आंत ४ मैलावर आहे. गांवच्या चोहो बाजूस डोंगर असून पूर्व बाजूस चिकोत्रा नदी वाहते व या नदींत बाराही महिने पाणी असतें. येथें मराठी ५ वी पर्यंत शिक्षणाची सोय आहे.

(२) या गांवची लोकसंख्या ११३४ असून मराठा व इतर लोकांची वस्ती जास्त आहे. येथें ग्रामपंचायत असून रस्त्यांची डागडुजी व साफसफाई चांगल्या रीतीनें ठेविली आहे.

(३) येथें दर मंगळवारीं ११ वाजलेपासून सायंकाळीं ६ वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) येथें खालीं नमूद केलेल्या गांवांपैकीं अंदाजें २००० हजार लोक बाजाराकरितां येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| घामण | १०४० | १ |
| बामण | ३९२ | १ |
| बेळेवाडी ( हुबळगी ) | ६८३ | १॥ |
| झुलपेवाडी | — | १ |
| दिंडेवाडी | ६६० | १॥ |
| बारव | ८१४ | २ |
| नागरवाडी | २१८ | १ |
| हसूर | ६९७ | ४॥ |
| हेळेवाडी | २६९ | १॥ |
| मुस्कटें | ३०८ | ३ |
| मानवळे | ५७५ | ३ |
| बेगवडें | ५०३ | ४ |
| राळगुंडी | ६७६ | ४ |
| चिमल | १४८५ | ४ |
| मेगुळी | ४८६ | ७ |
| सोनुर्ली | २८३ | ८ |
| घोळोली | १०० | ७ |
| बिद्रि | १८६ | ६ |
| नवेल | ३२८ | ८ |
| भेडवडें | २२८ | ४॥ |
| पाल | ४३२ | ५ |
| महागोंड | ८३९ | ५ |
| करपेवाडी | ३९७ | ४ |
| बहिरेवाडी | १७८९ | ५ |
| ममेवाडी | ८११ | ५ |
| कडगांव | ३३४ | ८ |
| खडकेवाडा | १६८६ | १० |
| बोझावी | १०८१ | ६ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| वजरें | ५७९ | ७ |
| पेरणुळी | ८५७ | ९ |
| वडकशिवाळें | ५७९ | ६ |
| अर्दाळ | १३४२ | ५ |
| कोळगें | १०४९ | ९ |
| माद्याळ | १०७७ | ४ |

(५) तांदूळ, जोंधळा, नाचणा, मिरची हे जिन्नस विक्रीस येत असून वाणसौदा, भाजीपाला, कापड, कपडे इ. जीवनोपयोगी वस्तूही येतात.

पावसाळ्यामध्यें आजूबाजूच्या गांवाहून या बाजाराला येण्यास सोई-स्कर रस्ते नसल्यानें बाजार लहान प्रमाणांत भरतो व इतर वेळीं चांगला भरतो.

(६) येथें बाजारचे दिवशीं अंदाजें ४००० रु. पर्यंत उलाढाल होते.

(७) येथें २९।१०।४६ पासून गुरांचा बाजार भरणेस सुरवात झाली असून सरासरी १०० गुरें या बाजारीं विक्रीकरितां येतात. हा बाजार शाळेच्या पूर्व बाजूस असलेल्या पटांगणांत भरतो.

(८) वाहनें जाणेयेणेकरितां या बाजारास कचे रस्ते, पक्के रस्ते करणें अत्यंत आवश्यक आहे. बहिरेवाडी ते गारगोटी हा पूर्वी आंखलेला रस्ता केल्यास बाजारास सोईचें होण्यासारखें आहे.

(९) गुरांचे बाजाराकरितां हल्लीं भरत असलेल्या जागेंत बाजारांचे सावलीकरितां झाडें लावणें जरूर आहे. व पाण्याचीही कांहींतरी सोय ग्राम-पंचायतीतर्फे करणें जरूर आहे. येथें सार्वजनिक विहीर नसलेनें खासगी विहीरींचाच लोकांना उपयोग करावा लागतो. तेव्हां एखादी सार्वजनिक विहीर होणें जरूर आहे.

हल्लीं बाजार भरत असलेली जागा अपुरी भासते. तेव्हां शाळेच्या पूर्व बाजूस असलेल्या मोठ्या पटांगणांत धर्मशाळा, पाणी, झाडी, इ. सोय केल्यास बाजार भरविणेस ही जागा योग्य होईल.

गांवची नैसर्गिक ठेवण सुंदर आहे. ग्रामसुधारणेचें तत्त्व लोकांस पटलें असलेनें त्यांच्या उत्साहास सहकार्याची जोड आहे. योग्य रीतीनें लक्ष घातलेस आदर्श असें गांव होईल. हा बाजार सुरू होऊन फक्त ५ वर्षे झालीं तरी त्या मानानें पाहतां याची वाढ अत्यंत झपाट्यानें होत आहे.

## पेटा गारगोटी : ३ पाटगांव

पाटगांव हें गांव गारगोटी पेट्यांत असून नवीनच झालेल्या गारगोटी–पाटगांव या रस्त्यावर कोल्हापूरपासून ५२ मैलांवर आहे. येथें मुलांची व मुलींची मराठी ४ थीपर्यंत शिकण्याची सोय आहे.

(२) येथें बाजार शनिवारीं १२ वाजलेपासून सायंकाळीं ६ वाजे-पर्यंत भरतो.

(३) या गांवची लोकसंख्या ९६२ असून मराठे वस्ती जास्ती आहे.

(४) या बाजाराकरितां खालील गांवचे अंदाजें २०० लोक येतात:—

| गांवचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| तांबोळी | | ४ |
| शिवडाव खु॥ | ५७७ | ३ |
| शिवडाव बु॥ | | ४ |
| तांबेची वाडी | ५९६ | ४ |
| अंजुर्डी | २४६ | ५ |
| मटगांव | ६३४ | २ |
| माणी | १३३ | २ |

(५) बाजारांत प्रामुख्यानें कडधान्यें, कांदा, मिरची, गूळ, तंबाखू, कापड वगैरे जीवनोपयोगी वस्तू विक्रीकरितां येतात.

(६) या बाजारांत ५।६ शे रुपयांची उलाढाल होते.

हा बाजार पावसाळ्यांत भरत नाही. उन्हाळ्यांत बरा भरतो.

(७) येथें गुरांचा बाजार भरत नाहीं.

(८) येथें पोस्टाची सोय नाहीं, धर्मशाळा नाहीं.

(९) पिण्याचे पाण्याची सोय मुबलक आहे. विहीरी घरोघर असून पाणी मुबलक असतें.

(१०) या गांवामधून नदी वहात असलेकारणानें रहदारीस फार अडथळा होतो. याकरितां लांकडी साकव वगैरे घालून मिळाल्यास पावसाळ्यांत बाजार भरणेस सोईचें होईल. येथें बाजार अत्यंत जुजबी भरतो.

## पेटा गारगोटी : ४ शेणगांव

हा गांव भुदरगड पेट्यांत कोल्हापूर–पाटगांव रस्त्यावर कोल्हापूर पासून ३३ मैलावर आहे. या पेट्यांत शेणगांव हें व्यापारी गांव मानलें जातें. येथें मुलांची व मुलींची मराठी ४ थी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. या गांवीं शिवलिंग को. ऑ. क्रे. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या १४८४ असून मुख्य भरणा मराठा लोकांचा आहे.

(३) येथें बाजार गुरुवारीं ११ वाजेपासून संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत भरतो:—

(४) या बाजाराकरितां खालील गांवचे अंदाजें ४।५ शे लोक येतात.

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| आकुर्डें | १२१९ | १ |
| सोनारवाडी | ११०६ | १ |
| फणसवाडी | ४१८ | २ |
| मड्डर | ८५० | १ |
| देवकेवाडी | १२६ | १ |
| सालपेवाडी | २६९ | २ |

(५) बाजार गांवांतील पेठेंतील रस्त्यांत भरतो. बाजारांत मिरची, भात, नाचणे, डाळी, किराणा माल, कापड इ. जिन्नस विक्रीकरितां येतात.

(६) येथें अंदाजें एक हजार रुपयांची उलाढाल होते.

(७) येथें माघ महिन्यांत ( माहीचे वेळेस ) मोठ्या प्रमाणांत व जून महिनेंत लहान प्रमाणांत बाजार भरतो.

(८) येथें गुरांचा बाजार भरत नाहीं; व तशी भरण्यासारखी सोय नाहीं.

(९) आकुर्डे ते शेणगांव व मड्डूर ते शेणगांव हे गांवरस्ते दुरुस्त करून मिळावेत.

(१०) धर्मशाळा बांधून मिळावी.

(११) गांवालगतच नदी असल्यानें पाण्याची भरपूर सोय आहे.

## पेटा गारगोटी : ५ मडिलगें बु॥

मडिलगें हें गांव भुदरगड पेट्यांत कोल्हापूर–गारगोटी रस्त्यावर, कोल्हापूरपासून २७ मैलावर आहे. येथें मुलकीपर्यंत शिक्षणाची सोय असून दररोजच्या टपालाची सोय आहे. या गांवीं मडिलगें श्री जगदंबा को. ऑ. क्रे. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) याची लोकसंख्या १८०० असून मुख्य वस्ती मराठा, हरिजन व इतर यांची आहे.

(३) येथें दर सोमवारीं बारा वाजलेपासून संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपासच्या गांवचे अदमासें ४०|५० लोक जमतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| मडिलगें खु. | ५५३ | १ |
| कलनाकवाडी | ७२३ | २ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| आंबवणें | ५०० | २ |
| पळशिवणें | ५८९ | २॥ |
| गंगापूर | १०४८ | १ |
| चिमगांव | १३११ | ३॥ |

(५) या गांवचा बाजार पेठेमध्यें रस्त्यावर भरतो.

(६) बाजारांत मुख्य जिन्नस धान्य, भाजीपाला, वाणसौदा, वगैरे जीवनोपयोगी जिन्नस विक्रीस येतात.

(७) या बाजारांत सर्वसाधारणपणें शंभर रुपयांपर्यंत उलाढाल होते.

(८) बाजार अत्यंत जुजबी भरतो; याचें कारण प्रख्यात मुरगूडचा बाजार येथून तीन मैल व गारगोटीचा चार मैल इतके जवळ आहेत.

(९) या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाहीं व भरण्यासारखी सोय नाहीं.

(१०) विहीरीचे पाण्याचा पिण्याकरतां उपयोग करतात. परंतु त्यापासून लोकांस नारूचा उपद्रव होत असल्यामुळें ह्या ठिकाणीं दुसरी कांहीं तरी पिण्याच्या पाण्याची सोय करणें जरूर आहे.

## पेटा गडहिंग्लज : १ नेसरी

नेसरी हा गांव कोल्हापूरपासून ६१ मैलावर असून गडहिंग्लजचे दक्षिणेस मुख्य रस्त्यापासून आंत १४ मैल आहे. या ठिकाणीं मुलामुलींच्या प्राथमिक शिक्षणाची सोय आहे. तसेंच कापड व्यापारी असोसिएशन व ग्रामपंचायत अशा दोन संस्था आहेत. पोस्ट ऑफिसची सोय आहे. या गांवीं नेसरी धान्य सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या १८६३ असून मुख्य वस्ती मराठा व लिंगायत यांची आहे.

(३) आठवड्याचा बाजार गुरुवारीं सकाळीं ११ वाजल्यापासून सायंकाळीं ६ वाजेपर्यंत भरतो.

(४) या बाजारास खालील गांवचे अदमासे दोन हजार लोक जमतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| तळेवाडी | २६७ | १ |
| वाघराळी | २१९ | २ |
| तावरेवाडी | १०३ | ०॥० |
| तारेवाडी | २८५ | १॥० |
| हडलगें | ८७१ | १॥० |
| डोणेवाडी | १७८ | १॥० |
| सांबरें | ९७६ | २ |
| कुंमरी | ४३५ | ४ |
| यमेहट्टी | २०७ | ४ |
| काळंबवाडी | १८३ | ४ |
| सरोळी | ४९४ | २॥० |
| पोश्रांतवाडी | ९८ | २ |
| चाळवणवाडी | ११६ | २ |
| शिरसिंगी | ५८८ | ५ |
| किणें | ६६४ | ५ |
| बांटगी | ८५४ | ५ |
| कोळिंद्रे | ७३८ | ६ |
| हुंदेवाडी | १८५ | ६ |
| बटकणंगलें | ८४३ | ३ |
| शिपूर | ९८९ | २ |
| हेळेवाडी | १२३ | २ |
| शिंद्रेवाडी | ३९१ | २ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| लाकुडवाडी | ४०८ | ८ |
| सांवतवाडी | ११६ | ४ |
| जांबुळवाडी | ६७५ | ४ |
| लिंगनूर | ६७७ | ३ |
| तुपरवाडी | ३९५ | ३ |
| आर्जुनवाडी | ४९६ | ३ |

(५) बाजार गांवचे मुख्य पेठेंत भरतो.

(६) बाजारांत भात, तांदूळ, मिरची, तेल, तंबाकू, गूळ, लोणी वगैरे जिन्नस विक्रीकरितां येतात

(७) बाजारांत ८–१० हजार रुपायांची उलाढाल होते.

(८) हा बाजार पावसाळ्यांत अत्यंत गैरसोयीचा आहे. कारण हिरण्यकेशी व घटप्रभा या नद्यांना पूर येतो व चिखलामुळें पाऊलवाटाही बंद होतात. हिवाळ्यांत व उन्हाळ्यांत मात्र बाजार मोठ्या प्रमाणांत भरतो.

(९) या गांवीं गुरांचाहि बाजार भरतो. बाजारांत २–३ शें जनावरें येतात. जनावरांना सावलीची सोय आहे. हा बाजार नवीनच भरत असलेनें शिंगोटीचा मक्ता होत नाहीं. जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय आहे.

(१०) बाजारचे लोकांना बसण्या, उठण्याकरितां धर्मशाळेची सोय आहे. पिण्याच्या पाण्याची गैरसोय आहे.

(११) नेसरी हा गांव ५०।६० खेड्यांना मध्यवर्ति असलेनें येथें महत्त्वाची बाजारपेठ होणेची शक्यता आहे. याकरितां नेसरी ते दड्डी, नेसरी ते आडकूर व नेसरी ते महागांव हे एकूण २१ मैलाचे रस्ते होणें जरूर आहे. धर्मशाळेनजीकची विहीर खोदून पिण्याच्या पाण्याची सोय करणें जरूर आहे. तसेंच धर्मशाळेजवळ सावलीकरितां बाजारवाढीचे दृष्टीनें जादा झाडें लावणें जरूर आहे.

## पेटा गडहिंग्लज : २ शिरगांव

शिरगांव हें गांव गडहिंग्लज पेट्यांत असून गडहिंग्लज पासून अजमासें ३० मैल लांब आहे. या गांवास जाणेचें झाल्यास कापशी जहागिरींतील खडकलाट या गांवापासून आडमार्गानें अजमासें चार मैल आंत जावें लागतें. येथें मराठी चार इयत्तेपर्यंत शिक्षण घेणेची सोय आहे. या गांवीं शिरगांव बसवेश्वर को.-ऑ. क्रे. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

(२) याची लोकसंख्या २७०१ असून मुख्य वस्ती लिंगायत यांची आहे.

(३) येथें दर सोमवारीं बाजार बारापासून संध्याकाळीं सहा वाजे-पर्यंत भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपास गांवचे अजमासें ५०० लोक येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| नागराळ (ब्रि.) | | ५ |
| तमनाकवाडी | ८९९ | ३ |
| शिरगांववाडी | २०० | १॥ |
| शिरगांव | ५०० | १॥ |
| नेज (ब्रि.) | | २ |
| संकणवाडी | ७०० | २ |

(५) बाजार पेठेसमोरील पटांगणांत भरतो. हल्लींच्या बाजाराच्या मानानें जागा योग्य आहे.

(६) बाजारांत मुख्य जिन्नस सर्व प्रकारचें धान्य, भाजीपाला, वाण-सौदा, मिरची वगैरे जीवनोपयोगी जिन्नस विकावयास येतात.

(७) या बाजारांत सर्वसाधारण रु. २०० पर्यंत उलाढाल होते.

(८) नेहमींच बाजार साधारणपणें जुजबी असतो.

(९) या गांवीं गुरांचा बाजार भरत नाहीं; व तशी सोय नाहीं.

(१०) या गांवास पिण्याच्या पाण्याची अत्यंत गैरसोय आहे. गांवालगत असलेल्या ओढ्याचें पाणी आठ महिने व पुढें ओढ्यामध्यें झरे वगैरे काढून पाण्याची सोय लोक करतात. तेव्हां कायम पाण्याची सोय होण्याकरतां एखादी मोठी सार्वजनिक विहीर होणें योग्य आहे.

बाजार भरणेकरतां शेड बांधून मिळाल्यास बाजार भरणेस सोईचें होईल.

## पेटा गडहिंग्लज : ३ नूल

क॥ नूल हें गांव गडहिंग्लज पेट्यांतील असून गडहिंग्लजपासून सात मैलावर आहे. शिक्षणाची सोय मराठी चौथीपर्यंत आहे. पोस्ट ऑफिसची सोय आहे. या गांवीं नूल धान्य–सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या ३००३ असून मुख्य वस्ती मराठा व हरिजन यांची आहे.

(३) येथें दर शनिवारीं सकाळीं ९ वाजलेपासून दोनप्रहरीं एक वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपासच्या गांवचे लोक अदमासें १५०० जमतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| जरळी | १७६२ | ४ |
| खमलेहट्टी | ८८२ | १॥ |
| चनेकुपी | १४१४ | ४ |
| चिंचेवाडी | ९३० | २ |
| भडगांव | २८७६ | ७ |
| नोकूड | ८१९ | ४ |
| यनेचवंडी | ६४० | १॥ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| तनवडी | ५३५ | १ |
| नेरेवाडी | ९४१ | २ |
| हिडदुगी | ७६२ | ६ |
| तुपरवाडी | ३९५ | ५ |
| तैगिनहाळ | ४०५ | ७ |
| मनवाड | ७४० | ४ |
| कुंबळहाळ | ३५४ | १॥ |
| बसर्गे | २०८१ | १॥ |
| हडलगे | ८७१ | २ |
| हदरगुची | ५३७ | ३ |
| नांगनूर | १०७० | ३ |
| खणदाळ | १३०४ | २ |
| हसूर | २५९ | ५ |
| नंदनवाड | ७४० | ४ |

(५) बाजार गांवचे मुख्य रस्त्यावर भरतो. सदरची जागा अपुरी आहे. सबब बाजार तेथील शाळेलगत असलेल्या खुल्या जागेत नेलेस सोईचें होईल.

(६) या बाजारांत मुख्यत: तांदूळ, जोंधळा, गहू, भाजीपाला, लोणी, तयार कपडे, वाणसौदा वगैरे जीवनोपयोगी जिन्नस विकावयास येतात.

(७) बाजारांत सर्वसाधारण ४००० रुपयेपर्यंत उलाढाल होते.

(८) गुरांचा बाजार भरत नाहीं.

(९) या गांवाचे लोकांना पिणेच्या पाण्याची सोय आहे. गांवांत २।३ विहिरी आहेत.

(१०) बाजाराकरितां येणारे लोकांकरितां शेड्स बांधणें जरूर आहे. निलजी ते नूल रस्ता केलेस बाजारवाढीचे दृष्टीनें उपयुक्त होईल.

## महाल शाहूवाडी : १ भेडसगांव

या महालांतील एका बाजूचें, वारणा नदीचे कांठचें व मलकापुराहून ९ मैलांवर असलेलें असें हें गांव आहे. मराठी सातवीपर्यंत येथें शिक्षणाची सोय आहे. या गांवीं भेडसगांव धान्य को-ऑ. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे. या गांवचा बाजार हल्लीं मोडला आहे.

बाजार मोडणेचीं कारणें:—

या गांवापासून १॥ मैल अंतरावर ब्रिटिश हद्दींतील बिळाशी गांव आहे. या गांवीं दर रविवारीं बाजार भरतो. ३ मैलावर कोकरूड गांवीं बुधवारीं बाजार भरतो. हे फार मोठे बाजार असल्यानें, आसपासचे लोकांची या ब्रिटिश हद्दींतील गांवीं जाण्याची वहिवाट आहे. आपल्या गांवचा बाजार सुधारावा, म्हणून गांवचे लोकांनीं बाजाराचा दिवस बदलून पाहिला. पण त्याचा उपयोग कांहींहि दिसून येत नाहीं. १९४१ सालापूर्वी या बाजारास सुमारें ८०० माणसें येत होतीं व सुमारें १५०० ते २००० रु. ची उलाढाल होत असे. जनावरांचा बाजारहि पूर्वी होता. पण हल्लीं तोहि मोडला आहे.

बाजाराची हल्लींची परिस्थितिः—

(२) गांवची लोकसंख्या २१०० असून मराठा, हरिजन व ब्राह्मण यांचा भरणा जास्त आहे.

(३) आठवड्याचा बाजार दर शनिवारीं दुपारीं २ ते ५ पर्यंत भरतो.

(४) बाजारास खालील गांवचे लोक येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| माणगांव | ३४८७ | १॥ |
| शिवारें | ६४५ | २ |

याशिवाय ब्रिटिश हद्दींतील बिळाशी, मांगरूळ, रिळे, किणरे, शिराळें व बचीसशिराळें येथून २० ते २५ लोक येतात.

(५) गांवाचे मध्यास चावडी आहे व चावडीजवळील दक्षिण-उत्तर रस्ता, हें बाजाराचें ठिकाण होय. केव्हां केव्हां बाजार गांवालगत असलेल्या तलावाजवळ भरतो.

(६) तांदूळ, जोंधळा, मिरची, कडधान्य हे विक्रीचे मुख्य जिन्नस होत.

(७) सुमारें ४० ते ५० रु. ची उलाढाल होते.

(८) पावसाळ्यांत बाजार अगदींच भरत नाहीं व उन्हाळ्यांत थोडासा भरतो.

(९) जनावरांचा बाजार येथें नाहीं.

(१०) पाण्याची सोय आहे. धर्मशाळा व बाजारास सावलीची व्यवस्था नाहीं व कोठूनहि पक्का रस्ता नाहीं. त्यामुळें पावसाळ्यांत वाहतुकीचे फार हाल होतात.

(११) जरूरीच्या गोष्टीः--

भेडसगांव ते कापशी हा रस्ता तयार केला असतां बाजार वाढूं शकेल. हें अंतर ३ मैल असून वाटेमध्यें ३ खेडीं आहेत.

भेडसगांव ते वारणा नदीपर्यंत रस्ता तयार झाल्यास ब्रि. हद्दींतील बिळाशी गांवाशीं दळणवळण करणें सोपें होईल.

पोस्टाच्या सोयीची लोकांना जरूरी वाटते.

गांवालगत असलेल्या तलावाचा गाळ काढल्यास वर्षभर लोकांना पिण्यास पाणी पुरेल.

बाजारास संरक्षण नसल्यानें बाजार चांगला भरूं शकत नाहीं असें कांहीं लोकांचें मत दिसून आलें.

भेडसगांवचें वैशिष्ट्यः-

गांवालगत उत्तरेच्या बाजूस तलाव आहे. तिन्ही बाजूंनी नैसर्गिक टेकड्या आहेत, व एका बाजूकडून बांध घालून पाणी अडवलें गेलें आहे. तलावाचें क्षेत्रफळ मोठें असल्यानें पाणी मुबलक सांठून राहतें. तलावाची (Level) पातळी आजूबाजूच्या पिकाऊ जमिनीरेक्षां उंचावर असल्यानें,

पिकासहि हें पाणी देतां येणें शक्य आहे. तळावांतील गाळ काढला तर पाणी वर्षभर पुरूं शकेल. गाळ काढण्याचा खर्च शेतकऱ्यांना पाणी देऊन त्यांतून मागूं शकेल.

## महाल शाहूवाडी : २ सरूड

कोल्हापूर–मलकापूर रस्त्यावरील बांबवडें गांवापासून सरूड हा गांव ३ मैल अंतरावर आहे. शाहूवाडी महालांतील हा सर्वांत मोठा गांव असून व्यापाऱ्यांची संख्या वीसपर्यंत आहे. मराठी ७ वी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. शाळेची स्वतंत्र मशी इमारत आहे. या बाजूच्या खेड्यांतील खेडूत सरूडच्या बाजारास नेहमीं येतात. येथें हातमागावर कापड काढणारे कोष्टी पन्नास आहेत. या गांवीं सरूड को–ऑ. के. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे. याशिवाय धान्य सोसायटी आहे.

(२) गांवची लोकसंख्या २४७४ असून शेतकरी लोकांचा भरणा फार आहे.

(३) आठवड्याचा बाजार दर मंगळवारीं दुपारीं १ ते ६ वाजे-पर्यंत भरतो.

(४) या बाजारास खालील गांवचे लोक जमतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| शिर्ये | ९४० | १ |
| नेरलें | ७६७ | ६ |
| साळशी | १६२० | ५ |
| वाडी चरण | ५६७ | २ |
| चरण | ६११ | २ |
| येरगांव | ९८० | ३ |
| सैदापूर | १४५ | ३ |
| सावर्डे | ३२२ | ५ |
| पाटणें | ६६४ | ॥ |

याशिवाय कापशी, वडगांव, शिवारें, माणगांव, मेडसगांव, सातवें या कोल्हापूर हद्दींतील व सांगाव, कंदूर, पुनवत, चिखली, नाटोली या ब्रिटिश हद्दींतील गांवचे व्यापारी व खेडूत मिळून १५०० ते २००० लोक जमतात.

(५) गांवचे पूर्वेस गांवालगत मारुतीचें देऊळ आहे. तेथील मोकळ्या जागीं बाजार भरतो.

(६) जोंधळा, तांदूळ, गहू, कडधान्य, कापड हे विक्रीचे प्रमुख जिनस असले तरी इतर हरएक प्रकारचा नित्योपयोगी माल या बाजारीं विकण्यास येतो.

(७) सुमारें ३००० ते ४००० रु. ची उलाढाल प्रत्येक बाजारीं होते.

(८) नदीवर पूल नसलेनें पावसाळ्यांत बाजार थोडा कमी भरतो. बाकी उरलेले आठ महिने वर दिल्याप्रमाणें बाजार भरतो.

(९) गुरांचा बाजार भरत नाहीं.

(१०) बाजारचे जागेजवळ पाण्याची सोय, धर्मशाळा व बाजारास सावलीची सोय नाहीं. बांबवडे ते सडोली हा एकच उन्हाळी व पावसाळी चालणारा रस्ता आहे. इतर सर्व पावसाळ्यांत निरुपयोगी असलेल्या पायवाटा आहेत.

(११) बाजारास हव्या असणाऱ्या सुधारणाः—

(अ) रस्तेः— सरूड गांवापासून वारणा नदीपर्यंत रस्ता पाहिजे आहे. नदीजवळीकडे ब्रिटिश हद्दींतील गांवें असून, तेथील लोक बाजारास सरूडास येत असतात.

सरूड ते येरगांव ते सातवे हा रस्ता तयार होऊन मिळाल्यास बाजारांत वाढ होईल. हें अंतर ७ मैल आहे.

(ब) जनावरांचा बाजारः—जनावरांचा बाजार येथें भरविण्याची शक्यता व लोकांना जरूरी आहे. गांवाशेजारीं तळाव व त्याशेजारीं सरकारी पैकी जमिनींतील गायरान मुबलक मोठें आहे. त्या ठिकाणीं जनावरांचा बाजार भरूं शकेल.

(क) बाजारचे ठिकाणीं आणखी थोडीं झाडें व पावसाळ्यांत उपयोगासाठीं धर्मशाळांची जरुरी आहे. येथें बँक असावी असें व्यापाऱ्यांना वाटतें.

सुताचा भरपूर पुरवठा होत नसलेनें येथील कांहीं कोष्टी कायमचे गांव सोडून इचलकरंजीस पोटासाठीं गेले आहेत.

## महाल शाहूवाडी : ३ बांबवडें

बांबवडें हें गांव कोल्हापूर–रत्नागिरी रस्त्यावर कोल्हापुरापासून १९ मैलावर आहे. हें शाहूवाडी महालांतील कोंकणला जाणाऱ्या मालाच्या उतारपेठेचें मुख्य गांव आहे. या ठिकाणीं एक गुरांचा दवाखाना व अँग्लो-व्हर्नाक्युलर मुलांची शाळा आहे. या गांवीं बांबवडें को–ऑ. क्रे. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

(२) ह्या गांवची लोकसंख्या २९४४ असून मुख्य वस्ती मराठा व हरिजन यांची आहे.

(३) दर शनिवारीं आठवड्याचा बाजार भरतो.

(४) बाजाराकरितां खालील गांवचे अजमासें ३।४ हजार लोक येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| डोनोली | १३३९ | १ |
| चरण | १२४८ | २ |
| वाडी चरण | ५६७ | १ |
| जाधववाडी | — | १ |
| सोनवडें | ६५१ | २ |
| साळशी | १६२० | १॥ |
| सुपात्रें | ६७१ | १॥ |
| आवळी | ९३६ | ३ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| सैदापूर | १४५ | ३ |
| आमतेवाडी | १७२ | ४ |
| सरूड | २४७४ | ३ |
| सांगाव | — | ४ |
| पाटणें | ६६४ | २॥ |
| गोगवें | ९४९ | १॥ |
| सितूर | ९७६ | २॥ |
| सावर्डे बु॥ | २०७ | ३ |
| पिशवी | १३२५ | ३ |
| परखंदळें | ६८० | ४ |

(५) येथील आठवड्याचा बाजार धर्मशाळेभोंवतालच्या मोकळ्या जागेत भरतो. बाजाराची वेळ अंदाजें १ वाजलेपासून संध्याकाळीं ७ वाजे-पर्यंत असते.

(६) बाजारांत विक्रीकरितां नेहमीं सर्व जिन्नस मिळतात. परंतु कांदे, मिरची व भुईमूग हे जिन्नस जास्त प्रमाणांत येतात.

(७) बाजारांत हल्लींचे परिस्थितींत ३।४ हजारांची उलाढाल होते.

(८) पावसाळ्यांत बाजार कमी प्रमाणांत भरतो व उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत मोठ्या प्रमाणांत भरतो.

या ठिकाणीं जनावरांचा बाजार भरत नाहीं, पण बाजार भरविण्याची लोकांची फार उत्सुकता आहे. ह्या ठिकाणीं गुरांचा बाजार चांगला होऊं शकेल. कारण जनावरांचा दवाखाना आहे व वडगांवच्या सोमवारच्या बाजारानंतर राहिलेलीं जनावरें, शिरोळ पेट्यांतील मांगल्याच्या बुधवारच्या बाजाराला जातात. नंतर मलकापूरच्या शुक्रवारच्या बाजाराकरितां हीं जनावरें बांबवड्यांतून मलकापुरास जात असल्यामुळें गुरुवारचा जनावरांचा बाजार इथें सहज भरूं शकेल. ह्या ठिकाणीं जनावरांच्या बाजाराकरितां झाडांची व पाण्याची निराळी सोय करण्याची जरूरी नाहीं. कारण बांबवड्यालगतच सरूड रस्त्यावर दोन्हीं बाजूला मोठीं झाडें असून जनावरें

बांधण्यासाठीं मोकळी जागाही आहे व बाजूला ओढा असल्याकारणानें पाण्याची मुबलक सोय आहे.

(१०) बाजारांतील लोकांना बसण्याकरितां सावलीची जागा नाहीं. कारण ज्या धर्मशाळेभोंवतीं बाजार भरतो. त्या धर्मशाळेंत पोस्ट ऑफिस आणि गुरांचा दवाखाना आहे, म्हणून बाजारचे लोकांकरितां शेडस् बांधणें इष्ट आहे. या गांवीं बाजाराकरितां येणेस बांबवडें ते साळशीपिशवी व बांबवडें ते कापशी हे पक्के रस्ते आहेत.

(११) हल्लीं बाजार धर्मशाळेच्या मोकळ्या जागेंत भरतो. धर्मशाळेच्या रस्त्याला लागून कायमचीं १२।१४ दुकानें आहेत, तीं काढून मे. देसाई इंजिनियर यांचे मालकीची एक मोकळी जागा आहे ती ॲक्वायर करून २०।२५ प्लॉट्स पाडून वरील दुकानें जर तिकडे नेलीं, तर बाजाराला मुबलक जागा होईल. प्लॉट्स विकत घेणेस व्यापाऱ्यांची तयारी आहे. व्यापारी दृष्टीनें ही नमुनेदार पेठ होणेची शक्यता आहे. कारण पूर्वी शिराळें, इस्लामपूर, वाळवें इत्यादी भागांतील शेती उत्पादनाचा माल बांबवडेंतून कोंकणांत जात असे; परंतु बांबवड्याचे व्यापाऱ्यांना जरूर त्या सवलती व मदत सरकारकडून न मिळालेकारणानें ती बाजारपेठ होऊं शकली नाहीं.

या गांवाला बाजारपेठेचें स्वरूप देणें अत्यंत जरूर आहे. कारण येथें कांदा, लसूण, मिरची, भुईमूग व भुईमुगाचें तेल या जिनसांचा व्यापार मोठ्या प्रमाणांत होईल. लोकही बाजारपेठ करावयास उत्सुक आहेत आणि पुणें–कोडोली–रत्नागिरी हा रस्ता तयार झालेवर या गांवाला बरेंच महत्त्व येणार आहे. तरी या दृष्टीनें विचार करून जर त्याला चालना दिली तर या गांवाला फार महत्त्व येईल.

## महाल रायबाग : १ चिंचली

रायबाग महालांतील सर्वांत मोठें बाजार भरण्याचें हें ठिकाण आहे. प्रख्यात मायाक्काची यात्रा या ठिकाणीं भरते. यात्रेच्या वेळीं जनावरांचा बाजार अतिशय मोठ्या प्रमाणांत भरतो. दूरदूरचे लोक जनावरांच्या खरेदी–विक्रीसाठीं या ठिकाणीं येतात. लाखों रुपयांची उलाढाल होते त्यावेळीं. चिंचली स्टेशनपासून चिंचली गांव अडीच मैल अंतरावर आहे. तेथें जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी दोन आहेत. चिंचली हातमाग को–ऑ. सोसायटी लि. नांवाची संस्था आहे.

(२) येथील बाजार रविवारीं भरत असून २ ते ६ वाजेपर्यंत उलाढाल चालते. मायाक्काचे देवळाचे समोर बाजारपेठेंत बाजार भरतो.

(४) बाजारास लोक संकरट्टी, चिकुड, कोळीगुड, ससलागर, शिद्दापूर, कुसनाळ, मोळवाड, कुडची, भिर्डी, जलालपूर, रायबाग, निलजी, मोरब, परमानंदवाडी इत्यादि संस्थानी व खालसा ठिकाणांहून व्यापारासाठीं व बाजारासाठीं येतात.

(५) मुख्यतः व्यापार जोंधळा, मका, गहू, हरभरा, कापूस व इतर नेहमींच्या वस्तूंचा होतो. कापसाचे हंगामांत ही उलाढाल १० हजारावर जाते. एरव्हीं मात्र चारपांच हजारापर्यंत मर्यादित असते.

१९४२ सालापासून हा बाजार मंदावला आहे आणि याचें कारण ४२ सालीं झालेली धान्यलूट असें सांगण्यांत आलें आहे.

दळणवळणाचे बाबतींत रेल्वे स्टेशन ते चिंचली गांव हा बांधलेला रस्ता आहे.

तद्वतच जमखिंडी–चिकोडी ही पक्की सडक चिंचली रायबागहून जाते. जलालपूर–चिंचली रस्ता व मोरब–चिंचली रस्ता हे दोन्ही रस्ते नादुरुस्त स्थितींत आहेत. चिंचली नजीक असलेल्या दुधओढ्यास पाणी आलें म्हणजे रहदारी थांबते. तेव्हां या दुधओढ्यावर मोरी बांधल्यास ही अत्यंतिक स्वरूपाची गैरसोय दूर होण्यासारखी आहे.

ठिकठिकाणीं मोठमोठ्या विहीरी असलेमुळें पाण्याची सोय झालेली आहे.

हल्लींची जागा बाजाराच्या दृष्टीनें विशेष बरी नसलेनें सगरे यांच्य गिरणीसमोरील इंग्रजी शाळेनजीकचें तिकोणी भव्य पटांगण हें सर्व दृष्टीनें सोईचें होणारें आहे. नजीक असलेल्या तीन विहीरींमुळें पाण्याची चांगली सोय आहे व झाडेंही आहेत.

## महाल रायबाग : २ रायबाग

महालाचें मुख्य ठाणें रायबाग. प्राथमिक शाळा व ए. व्ही. स्कूल येथें आहेत. या गांवीं रायबाग को-ऑ. के. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

(२) ५०२५ लोकसंख्या आहे. लिंगायत, मुसलमान व मराठा यांचा भरणा विशेष आहे.

(३) सोमवारीं बाजार भरतो. बाजाराची वेळ २ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत असते. पेठेंतील रस्त्यावरच बाजार भरतो.

(४) बाजारास खालील गांवचे लोक येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| मिर्डी | २२६३ | ३ |
| चिंचली | ३९३५ | ६ |
| जलालपूर | १०८८ | ६ |
| नागराळ | ४३७ | ३ |
| नसलापूर | १८०० | ६ |
| यड्राव | ७०० | ३ |
| ब्याकूड | ९९० | ६ |
| दिगेवाडी | ११५७ | ३ |

इत्यादि गांवाहून लोक व्यापारास व बाजारास येतात.

(४) जोंधळा, मका, कापूस, लोकर, भुईमूग इत्यादी व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो.

(५) जनावरांचा बाजार असून मुख्यतः तो मेंढ्यांच्या बाजारापुरता मर्यादित झालेला आहे. हा बाजार गांवाबाहेरील मारुतीचे देवळानजीक भरतो.

(६) साप्ताहिक व्यापारी उलाढाल ५००० हजारापर्यंत होत असावी असें वाटतें.

(७) रस्त्यांच्या सोईच्या दृष्टीनें हा गांव बराच सुदैवी म्हणावा लागेल. रायबाग स्टेशन ते गांवापर्यंत पक्की सडक आहे. चिकोडी ते जमखिंडी ही पक्की सडक रायबाग चिंचलीहून जाते. जलालपूर–रायबाग रस्ता आहे. नसलापूर–दिगेवाडी–रायबाग रस्ता पक्क्या सडकेचा आहे.

पाण्याचे बाबतीत मात्र लोकांना हलाखीचे दिवस काढावे लागतात. पाण्याची दुर्मीळता हा येथला विशेष होय.

हल्लीं बाजार भरत असलेली जागा प्रशस्त नसलेनें तेथून बाजार हलविणें उचित आहे. बाजार गांवाबाहेर मुसलमानांचें कबरस्थान असलेल्या जागेच्या शेजारच्या पटांगणांत भरविण्यास हरकत नाहीं. जवळच एक मोठी बांधलेली विहीर आहे. झाडेंही आहेत.

## महाल रायबाग : ३ भेंडवाड

हा गांव चिकोडी रोड स्टेशनपासून सुमारें तीन मैलांवर आहे. रायबाग महालांत भरणाऱ्या बाजारापैकीं बऱ्यापैकीं बाजार आहे. या गांवीं भेंडवाड को-ऑ. क्रे. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) बहुसंख्य असलेल्या या गांवाची लोकसंख्या १६११ इतकी आहे.

(३) बाजार शनिवारीं भरतो. दोनप्रहरीं बारा वाजल्यापासून सायंकाळीं सहा वाजेपर्यंत व्यापार चाललेला असतो.

(४) चावडीशेजारच्या खुल्या बागेंत बाजाराची बसण्याची व्यवस्था केलेली आहे. जागा अत्यंत अपुरी आहे.

बाजारास खालील गांवचे लोक येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| गिरनाईकवाडी | १४२ | २ |
| खोडहट्टी | २८३ | २ |
| कंकणवाडी | १४५८ | ५ |
| माईनहुडा | २७७ | ३ |
| मोरब | १२७१ | २॥ |
| देवापूरहट्टी | १९८ | ४ |
| कटकभाव | ११९५ | ३ |

(५) तांदळाखेरीज सर्व तऱ्हेचा व्यापार चालतो. मका, जोंधळा, मिरची व इतर नेहमींच्या बाजारीं येणाऱ्या वस्तूंची उलाढाल अंदाजी ३००० रुपयांवर जात असावी.

(६) पायवाटा व गाडीरस्ता यांनीं निरनिराळीं गांवें जोडलीं असलीं तरी वाहतुकीची व्यवस्था समाधानकारक नाहीं. पिण्याच्या पाण्याची गरज विहिरीवर भागवावी लागते. गांवाबाहेरील माळ हा विस्तृत पायावर बाजाराची उभारणी करावयाची झाल्यास अत्यंत सोईचा आहे.

## महाल रायबाग : ४ पट्टण कोडोली

कोल्हापूर-रेंदाळ रस्त्यावर अकराव्या मैलावर हा गांव वसला आहे. या गांवीं पट्टण कोडोली हरिजन को-ऑ. क्रे. सोसायटी अन्‌लि. नांवाची संस्था आहे.

येथील लोकसंख्या ४०५० असून ११७९ मराठा, ९६७ हरिजन व बाकी इतर आहेत.

सोमवार हा बाजार दिवस. बाजार पेठेंत भरतो. ३ ते ६ वाजेपर्यंत भरतो.

सोयाबीन, तांदूळ व इतर जिन्नस यांचा व्यापार होतो. उलाढाल साधारणपणे १०००।१५०० पर्यंत होत असावी.

तळगें, हुपरी, इंगळी, सांगवडें, रेंदाळ, वसगडें, हलसवडें, माणगांव, वई इत्यादी गांवचे लोक बाजारासाठीं येतात.

कोल्हापूर–रेंदाळ रस्ता पक्का असून बाकीच्या गांवांना जाण्यासाठीं पायवाटा व गाडीरस्ते आहेत. नळाचे साह्यानें गांवांत पाणीपुरवठा केला आहे.

नजीकच दोन मैलांवर मोठें नाणावलेलें बाजारकेंद्र आहे. साहजीकच त्याचा परिणाम या केंद्रावर होतो. तथापि कोल्हापूरकडील बाजूस दुसरा चांगला बाजार जवळपास नाहीं, हें नमूद करावेसें वाटतें.

बिरोबाचे देवळाजवळील भव्य पटांगण साप्ताहिक बाजाराचे दृष्टीनें अत्यंत सोईचें होईल.

## महाल कटकोळ : १ कटकोळ

कोल्हापूर इलाख्यांतील तीन महालांपैकीं कटकोळ हा एक महाल आहे. येथें महालकरी कचेरी असून पोलिस सब्‌इन्स्पे.चें मुख्य ठाणें आहे. मुलकीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. सरकारी दवाखाना आहे. हें गाव कोल्हापुरापासून अदमासें १०० मैल अंतरावर असून कोल्हापुराहून गोकाक, यरगट्टी मार्गें इकडे यावें लागतें. या गांवीं कटकोळ को–ऑ. क्रे. सोसायटी अन्लि. नांवाची संस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या ५५६५ असून वस्ती लिंगायत व इतर यांची आहे.

(३) येथील आठवड्याचा बाजार दर शुक्रवारीं सकाळीं ८ वाजले-पासून संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपास गांवचे अदमासें दहा सात हजारापर्यंत लोक जमतात.

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| का॥ बन्नूर | ८७९ | |
| कुळूर | ६३१ | १३ |
| चन्हटी | १६० | ९ |
| गुडगुमनाळ | ३२ | १० |
| इळे तोरगल | ३४४ | |
| आरिबेंची | ४७५ | ११ |
| बिजकूपी | ५८२ | १० |
| बुधनूर | ५७२ | ९ |
| बिडकी | ३४९ | १३ |
| ददीभावी | १३०९ | १३ |
| गुडकट्टी | ३११ | ९ |
| हालोली | २६५ | ९ |
| कंदापूर | ३४१ | ९ |
| कंकणवाडी | १२६ | १२ |
| उदपुडी | ४४३ | १३ |
| रामापूर | ८५ | ९ |
| सुनाळ | ८५० | ९ |
| का॥ चंदरगी | ६७१ | ४ |
| मौजे चंदरगी | ३२५ | ५ |
| चिलमूर | ८९७ | ७ |
| गोडची | १२५९ | ४ |
| गुदगोप | ५८७ | ५ |
| केसरगोप | ५२ | ५ |
| कामनगोप | ५०१ | ९ |
| मुरकटनाळ | ३१४ | ७ |
| माजरेव्हसूर | ५९५ | ९ |
| सिदनाळ | ८३५ | ३ |
| तोरगटी | २७८ | ३ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| भंडारहळी | ५७५ | ११ |
| बोचनाळ | ५१७ | ११ |
| गोणगनूर | ३५२ | ९ |
| हरलापूर | ५ | ८ |
| जखबाळ | ४३९ | ९ |
| खानपेट | ३७९ | ५ |
| मल्लापूर | १३३ | ६ |
| मांगनूर | ११८ | ९ |
| तोरगल | ४७१ | ९ |
| तोरणगट्टी | १५२७ | ३ |

(५) बाजार मुख्य पेठेंत श्रीलक्ष्मीचे देवालयासमोरील भव्य पटांगणात भरतो.

(६) या बाजारांत सर्व प्रकारचें धान्य, तंबाखू, मिरची, शेंग, कापड, तयार कपडे, लुगडी, चोळखण, वाणसौदा, घोंगडी, भाजीपाला, पालपट्या वगैरे जीवनोपयोगी सर्व माल विकावयास येतो.

(७) या बाजारांत सर्वसाधारण २५००० रुपयेपर्यंत उलाढाल होते; व शेंगाचे हंगामामध्यें प्रत्येक बाजारी ४०,००० रुपयेपर्यंत होते. ही कोल्हापूर इलाख्यांत शेंगेची मोठी पेठ समजली जाते. कारण दरसाल या पेठेंत सरासरी एक लाख पोत्यांची आवक होते. येथें अकरा अडत दुकानें आहेत.

(८) या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाहीं. याचें कारण येथें गुरांकरितां बाराहि महिने पाण्याची सोय नाहीं व बाजार भरविणेबद्दल प्रयत्नहि झालेला नाहीं.

(९) येथें गांवांतील लोकांना बाराहि महिने पाणी पिण्याकरतां सरकारी मोठा तलाव आहे त्याचा उपयोग होतो.

(१०) १ कटकोळ ते यरगट्टी रस्ता;

२ कटकोळ, चंदरगी ते यरगट्टी रस्ता;

३ कटकोळ, तोरगल ते रामदुर्ग रस्ता;
४ कटकोळ, चंदरगी ते साळहाळी रस्ता;
५ कटकोळ, गोडची ते साळहाळी रस्ता;

असे पक्के रस्ते असून बरीचशी खेडीं वर नमूद केलेल्या रस्त्याकगत असलेनें आसपासचे खेडेगांवांतील लोकांना बाजारास येणेंस सोईस्कर आहे. तरी पण कांहीं ओढ्यांवर मोऱ्या होणें आवश्यक आहे.

## जहागीर विशाळगड : १ महागांव

महागांव हें गांव विशाळगड जहागिरींतील असून गडहिंग्लजचे दक्षिणेस गडहिंग्लजपासून सात मैलावर आहे. या ठिकाणीं शिक्षणाची मराठी मुळकीपर्यंत सोय आहे; आणि पोस्ट ऑफिसचीहि सोय आहे.

(२) या गांवची लोकसंख्या ३४७८ असून मुख्य वस्ती मराठा, लिंगायत, व इतर यांची आहे.

(३) आठवड्याचा बाजार दर सोमवारीं दोनप्रहरीं २ वाजलेपासून संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपास गांवचे २००० लोक अदमासें जमतातः—

| गांवचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| गडहिंग्लज | ९०१७ | ७ |
| मडिलगें | ११२४ | ४ |
| कांकूडवाडी | ४०८ | ३ |
| मुळें | ७३५ | ५ |
| कोळिंद्रें | ७६८ | ४ |
| वटकणंगलें | ८१३ | ६ |
| नेसरी | १८६३ | ८ |
| शिरशिंगी | ५८८ | ५ |
| हसूर | २५९ | ६ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| इंचनाळ | १३१७ | ५ |
| कुपवडे (ब्रि.) | | |
| मडगांव | २८७६ | ६ |
| हरळी | ८३९ | ३ |
| कोलगें | १०४९ | ६ |
| गिजवणें | १९४२ | ५ |
| हुकेरी (ब्रि.) | | |
| अत्याळ | १०९६ | ६ |
| मुंगरवाडी | ७१२ | ६ |
| बाघराळी | ७१९ | ७ |

(५) बाजार तळावानजीक पटांगणांत भरतो.

(६) या बाजारांत मुख्यतः सर्व प्रकारचें धान्य, तंबाकू, मिरची, घोंगा, कापड, तयार कपडे, घोंगडीं, लोणी, भाजीपाला, वाणसोदा, लुगडीं, चोळ-खण वगैरे जीवनोपयोगी सर्व प्रकारचे जिन्नस विकावयास येतात.

(७) या बाजारांत सर्वसाधारण पांच हजार रुपयेपर्यंत उलाढाल होते.

(८) या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाहीं.

(९) या गांवचे लोकांना बाराहि महिने पाणी पिण्याची सोय उत्तम आहे. तलाव गांवांतच आहे.

(१०) या गांवचे बाजारास येण्याकरितां भडगांवपासून महागांवपर्यंत पक्का रस्ता ६ मैल आहे. गांवांत देवळें वगैरे असलेनें लोकांना बसावयास जागा आहे.

(११) बाजारवाढीचे दृष्टीनें या गांवीं कांहीं सुधारणा करतां येण्याजोग्या नाहींत. कारण मुख्य रस्त्यापासून सदरचें गांव लांब आहे.

## जहागीर विशाळगड : २ कापशी

विशाळगड जहागिरींतील तिसऱ्या नंबरचें हें गांव असून, मलकापूरचे पूर्वेस ७ मैलांवर आहे. या गांवीं मराठी चौथीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. मलकापूर ते कापशी पक्का रस्ता पूर्वी होता. पण हल्लीं तो व्यवस्थित स्वरूपांत नाहीं. गांवामध्यें १० व्यापारी असून ते घडाडीचे दिसतात.

(२) गांवची लोकसंख्या— ११९५ आहे.

(३) आठवड्याचा बाजार दर गुरुवारीं दुपारीं २ ते ५ पर्यंत भरतो.

(४) खालील गांवचें सुमारें ४०–५० लोक या बाजारास येतात.

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| वडगांव | २३९ | ॥ |
| शिवारें | ६४५ | १ |
| आकुर्ले | ४६७ | १॥ |
| सौतें | ६०६ | २ |
| आमेणी | ३८६ | २ |
| शिरगांव | ९९७ | १ |

ब्रिटिश हद्दीतील कणदूर, पुनवत, फिपीरें या गांवचे लोकहि या बाजारास येतात.

(५) गांवाचे मध्यांतून एक रस्ता जातो, त्या रस्त्यावर बाजार भरतो. बाजार हळूं हळूं कमी होत चालला आहे.

(६) जोंधळा, मक्का, तांदूळ, कडधान्यें हे मुख्य विक्रीचे जिन्नस होत.

(७) सुमारें १०० रु. ची उलाढाल होते.

(८) पावसाळ्यांत बाजार भरत नाहीं. बाकीचे आठ महिने बाजार भरतो.

(९) गुरांचा बाजार नाहीं.

(१०) मलकापूर ते कापशी रस्ता दुरुस्त नाहीं. इतर सर्व पायवाटा आहेत. धर्मशाळा, पाणी, सावली यांपैकी एकहि सोय नाहीं.

(११) जरूरीच्या सोयीः—

(अ) मलकापूर Postal Division मधून हें गांव कमी होऊन सरूडाहून या गांवीं टपाल यावें; म्हणजे आठवड्यांतून निदान दोन वेळां टपाल मिळेल.

(ब) बाजारचा दिवस गुरुवार बदलून सोमवार ठरवावा. गुरुवारीं बांबवड्याचा बाजार असल्यानें, लोक बांबवड्यास जातात. त्यामुळें येथला बाजार कमी भरतो.

(क) गांवाशेजारीं मठ म्हणून एक सरकारी जागा आहे. तेथें विहीर काढून मिळावी. म्हणजे बाजारास पाण्याची सोय होईल.

(ड) गांवांत असलेल्या पोलिस–नाक्यामध्यें सतत पोलिस राहिले तर व्यापाऱ्यांचें संरक्षण होईल. गुंड लोकांचा फार त्रास आहे.

(ई) रस्ते:—

(१) मलकापूर–कापशी रस्ता दुरुस्त व्हावा. या रस्त्यावरच्या कडवी नदीस पूल नसल्यानें पावसाळ्यांत वाहतुक बंद असते.

(२) सरूड ते कापशी व कापशी ते भेडसगांव हा रस्ता तयार झाल्यास व्यापाऱ्यांची सोय फार होईल.

## जहागीर कागल (सी.) : १ कागल

पुणें–बंगलोर रस्त्यावर, कोल्हापुरापासून बारा मैलांवर हा कागलकरांचा राजधानीचा गांव वसला आहे. मोटारीमुळें वाहतुकीची उत्कृष्ट सोय झाली आहे.

येथील लोकसंख्या ८०११ एवढी आहे. पैकीं ४१२० मराठा, ९६३ हरिजन असून बाकी इतर आहेत.

बाजार दोन वारीं भरतो, सोमवार व गुरुवार. सोमवारचा बाजारच मोठा व महत्वाचा आहे. बाजारास सुरवात २ वाजतां होते, ७ वाजतां

बाजार संपतो. केनवडेकर घाटगे यांच्या वाड्यापासून कागलाधिपती यांच्या वाड्यापर्यंत साप्ताहिक बाजाराची स्थलमर्यादा आहे.

बाजारास खालील गांवचे लोक येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| क॥ सांगांव | ३६८२ | २ |
| मौजे सांगांव | २५१५ | २ |
| यळगूड | १८८८ | ३ |
| नांगनूर | १०९९ | ५ |
| बामणी | ७८७ | ५ |
| व्हन्नूर | १७८२ | ५॥ |
| पिंपळगांव | ७७४ | ४ |
| सिदनेर्ली | १८०९ | ३॥ |
| वंदूर | ११२७ | ४ |
| मुळकूड | २२६२ | ४ |

शिवाय कोगनोळी, सौंदलगें, हुपरी, रेंदाळ, कोल्हापूर व इतर ठिकाणचे लोक व्यापारासाठीं येतात.

जोंधळा, तंबाकू, मिरची, भुईमूग व इतर सर्वप्रकारचा व्यापार या ठिकाणीं चालतो. येथील साप्ताहिक उलाढाल ५००० हजारावर आहे.

कांहीं गांवांना जोडणारे गाडीरस्ते व कांहीं गावांना पायवाटा आहेत. कागलमध्यें ठिकठिकाणीं पाण्याचे हौद असून नळाचे साह्यानें गांवांत पाणी पुरवठा केला आहे; पाण्याची सोय एकंदरींत बरी आहे.

कोल्हापूर–निपाणी यांचे मध्यावर हा गांव वसला आहे. वहातुकीचीं साधनें भरपूर आहेत. बागायत जमिनी पुष्कळ असल्यामुळें गूळ, पानाचे डाग इत्यादींची ही एक लहानशी पेठ होण्याची शक्यता आहे. तंबाकूचें पीक चांगलें आहे. व थोड्या फार प्रमाणांत कापूसही होतो; म्हणून पेठेंत गूळ, पानाचे डाग याबरोबरच तंबाकू व कापूस यांची अडत होण्यासारखी आहे. दरवर्षी दर्ग्यांत पिराचा उत्सव अत्यंत थाटांत होतो. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या सर्व सोई या गांवांत आहेत व त्याप्रमाणें बॅंकिंगच्याही सवलती

आहेत. म्हणून असें वाटतें कीं किंचित् चालना दिल्यास कागल येथें एक चांगल्यापैकीं पेठ होण्याची शक्यता आहे.

गांवांत हल्लीं बाजार भरतो ती जागा सोडून दुसरी चांगली व सोयीची जागा नाहीं. गांवाबाहेरील चांगलीशी जागा जवळ नाहीं. किरकोळ मार्केटच्या दृष्टीनें या गांवाकडे न पाहतां भावी मोठ्या मार्केटच्या दृष्टीनें पाहावें.

## जहागीर कागल (सी.) : २ मुरगूड

मुरगूड हें गांव कागल (सिनियर) जहागिरींतील असून तें निपाणी पासून निपाणी–फोंडा रस्त्यावर निपाणीपासून १३ मैलावर आहे. या गांवांत म्युनिसिपालिटी आहे. नागरिक शिक्षण प्रसारक मंडळानें चालविलेल्या शाळेंत इंग्रजी ५वीपर्यंत शिक्षण दिलें जातें व सरकारी शाळेंत मराठी ७वीपर्यंत शिक्षणाची व्यवस्था आहे. येथं एक रयत को–ऑपरेटिङ्ग सोसायटी नावाची संस्था असून गांवचे लोकांचे उपयोगाकरितां एक सरकारी दवाखाना आहे. गांवांत ४०।५० दुकानें असून व्यापार चांगला चालतो.

(२) या गांवची लोकसंख्या अंदाजें ४५२४ असून त्यांत मराठा व हरिजनांचा भरणा फार आहे.

(३) आठवड्याचा बाजार दर मंगळवारीं भरतो. बाजारची वेळ साधारणतः १२ वाजलेपासून संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत असते.

(४) आठवड्याच्या बाजाराकरितां खालील गांवचे अदमासें १०।१२ हजार लोक येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| आदमापूर | ५२६ | १ |
| मुधाळ | ८०९ | २ |
| बूर | ८८३ | ३॥ |
| बोरवडें | २०४२ | ४ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| बिद्री | ७३६ | ३ |
| सोनाळी | १११६ | २॥ |
| वाळवें खुर्द | ८९५ | ३ |
| चौंडाळ | २६९ | २ |
| कुरणी | ५०९ | १ |
| मडगांव | ६३४ | २॥ |
| मळगें | ७५० | ३ |
| सोनगें | ६१७ | ४ |
| कुरुकली | ६२५ | ४ |
| हमिदवाडा | १७६० | ५ |
| सुरुपळी | ७१२ | ३॥° |
| यमगें | १६२८ | २ |
| चिमगांव | १३१९ | १ |
| दौलतवाडी | ४८५ | २ |
| गंगापूर | १०४८ | २ |
| मडिलगें बु॥ | १८०० | २॥° |
| मडिलगें खु॥ | ५५३ | ३ |
| कळनाकवाडी | ७२३ | ४ |
| खानापूर | ७२४ | ५ |
| पळशिवणें | ५८९ | ४ |
| करंजिवणें | ५९९ | ४ |
| हळदवडें | २९६ | |
| बोळावी | १०८१ | |
| आलाहाबाद | ८११ | |

(५) बाजार गांवांतील मुख्य रस्यावरच भरतो.

(६) या बाजारांत तांदूळ, जोंधळा, डाळ, मिरची हे जिन्नस मोठ्या प्रमाणांत येतात. तसेंच कोंकणांत रवाना करणेकरितां जवळ जवळ ४।५ ट्रक येथेल तेल अडतीकरितां प्रत्येक आठवड्याला येतें.

(७) बाजारांत हल्लींचे परिस्थितींत साधारणतः २० हजाराची उलाढाल होते. स्वस्ताईचे काळांत हा बाजार फारच मोठ्या प्रमाणांत भरत असे. नुसत्या तांदुळाचाच व्यापार दर बाजारीं २०।२५ हजारापर्यंत होईल.

(८) पिकाचे पेरणीपासून हंगामापर्यंत बाजार सर्वसाधारण भरतो व इतरवेळीं मोठ्या प्रमाणांत भरतो.

(९) येथें जनावरांचा बाजार मोठ्या प्रमाणांत भरतो. हल्लीं जवळ जवळ सर्व तऱ्हेची जनावरें १२०० पर्यंत विक्रीकरितां येतात. जनावरांचे बाजाराकरितां गांवाचे सुरवातीला रस्त्याचे उजवेबाजूस बाजार भरविणेची सोय केली असून जनावरांना पाण्याकरितां एक विहीर बांधली आहे. बाजारांत ८।१० हजाराचीं जनावरें विकलीं जातात. म्युनिसिपालिटीचें शिंगोटीकराचें उत्पन्न वर्षाला ४००० रु. चें आहे.

(१०) पावसाळ्यांत आजूबाजूचे लोकांना गाड्या घेऊन येण्याकरितां फार अडचण होते. म्हणून कणकवली खिंडीपासून एक चार मैलाचा रस्ता जर मुरगूडपर्यंत केला तर मडिलगें, गंगापूर, चिगूळ हीं खेडीं त्या रस्त्यावर येतील. तसेंच कापशीचे बाजूनें या बाजाराला येणाऱ्या लोकांची बरीच गैरसोय होत असलेनें त्याकरितां हळदीवाडा, आलाहाबाद, करंजिवणें, बोलावी, दौलतवाडी, इकडून जर मुरगूडपर्यंत रस्ता केला तर त्या दोहीकडील लोकांना जो त्रास होतो तो चुकून त्या लोकांची व्यापारी दृष्टीनें सोय होईल. हे दोन्ही रस्ते विशेष लांबीचे नसलेनें विशेष खर्च होणार नाहीं. जयसिंगराव तलाव इतका जवळ असतांनासुद्धां पाण्याची सोय अजिबात नाहीं. बाजारचे लोकांना बसणेकरितां सावलीची जागा धर्मशाळा अगर देवळें नाहींत.

(११) उपरिनिर्दिष्ट रस्ते, बाजाराकरितां येणाऱ्या लोकांना सावलीकरितां शेडस् व पिण्याचे पाण्याची सोय इ. सुधारणा करणें इष्ट आहे.

## जहागीर कागल (सी.): ३ चिखली

(१) हें गांव निपाणी–कोल्हापूर रस्त्यावर यमगर्णीपासून आंत पश्चिमेकडे ३ मैल आहे. तसेंच निपाणी–फोंडा रस्त्यावर खडकेवाडापासून आंत १॥ मैल आहे.

(२) येथील लोकसंख्या २३१६ असून मुख्य वस्ती मराठा व लिंगायत यांची आहे.

(३) येथें मराठी ७वीपर्यंत मुलांची व ४थीपर्यंत मुलींची अशा दोन सरकारी शाळा असून त्यांत ७५ मुलें व २० मुली शिक्षण घेतात.

(४) दर सोमवारीं व शुक्रवारीं बाजार भरतो. बाजारची वेळ दोनप्रहरीं २ वाजलेपासून संध्याकाळीं ६ पर्यंत असते.

(५) या बाजारास खालील गांवचे लोक येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| कोडणी (ब्रि.) | | १॥ |
| बुध्याळ ,, | | १॥ |
| यमगर्णी (का. शि.) | १०९५ | ३ |
| कुर्ली (ब्रि.) | | १ |
| निंगनूर ,, | | ३ |
| बेलुकी ,, | | २ |
| हमिदवाडा | १७७० | ३ |
| कौलगें | १०९३ | २ |
| बस्तवडें | ७९२ | ३ |
| खडकेवाडा | १६८६ | १॥ |

(६) हा बाजार चावडीसमोर मारुतीचे देवळासमोर व गेत्रीसमोर असा वर्षांतून ठराविक ठिकाणीं, ठराविक वेळीं फिरता बाजार भरतो.

(७) सर्वप्रकारचें धान्य, तंबाकू, तयार कपडे, घोंगडी व वाणसौदा इ. माल विक्रीस येतो.

(८) बाजारांत सर्वसाधारण १००० रुपयांची उलाढाल होते. सुगी-मध्ये ३००० रुपयापर्यंत होते. सुगीच्या दिवसामध्ये बाजार बरा भरतो व इतरवेळीं सर्वसाधारण भरतो.

(९) येथें गुरांचा बाजार भरत नाहीं.

(१०) गांवालगतच एक लहानसें तळें आहे. त्याचें पाणी वर्षांतून ८–१० महिने पिण्यास उपयोगीं पडतें. उन्हाळ्यांत लोक गांवापासून १ फर्लांग असलेल्या चिकोत्रा नदीचें पाणी पितात.

(११) बाजार वाढीसाठीं यमगर्णी ते चिखली व खडकेवाडा ते चिखली असे दोन गांवरस्ते करावे लागतील. तसेंच चिखली व बुध्याळच्यामध्यें चिकोत्रा नदीस पूल बांधल्यास बाजार समाधानकारक वाटेल.

## जहागीर इचलकरंजी : १ मणेराजुरी

इचलकरंजी जहागिरीपैकीं सांगलीपासून १८ मैलावर असलेलें हें या संस्थानचें एकटेंच गांव असून भोंवतालीं खालसा, सांगली, बुधगांव, मिरज इत्यादींचीं गांवें आहेत.

येथील लोकसंख्या ५२५५ असून तीन हजारावर मराठ्यांची वस्ती आहे.

बाजारदिवस बुधवार असून बाजारास सुरवात १२ वाजतां होऊन सायंकाळीं ६ वाजतां आटपतो. गांवांतील चावडीसमोर बाजार भरतो.

ओंवळा, तांदूळ, मिरची, भुईमूग व इतर किरकोळ जिनसांचा व्यापार होतो. विक्री साधारण दोन–तीन हजारापर्यंत होते.

गवाण, वज्रचवडें, मळणगांव, गायगवाण, बोरगांव, देशिंग, खरशिंग, भोसर, सोनी, करोली, धुळगांव, उपळाव, कुमठें, मणमतकणकी, नागांव, चिंचणी, तासगांव, सावर्डे, व कुसगांव इत्यादि गांवांहून लोक व्यापारासाठीं येतात. ही सर्व गांवें खालसा व पटवर्धन संस्थानांतील आहेत.

निरनिराळ्या गांवास जोडणारे गाडीरस्ते आहेत. सरकारी दोन मोठ्या आडामुळें पिण्याचे पाण्याची सोय झाली आहे. आजूबाजूस जवळ-पास बाजार भरत नसल्यानें हा बाजार उल्लेखनीय झाला आहे.

बाजारासाठीं शाळेनजीकचें मोठें पटांगण विशेष सोईचें होईलसे वाटतें. जवळच पाण्याचा आड असून ज्योतिर्लिंगाचें देवालय आहे.

## जहागीर इचलकरंजी : २ भैरेवाडी

भैरेवाडी हें गांव इचलकरंजी जहागिरीपैकीं असून उत्तूर–आजरा या रस्त्यावर असून आजऱ्यापासून आठ मैलांवर व गडहिंग्लजपासून पांच मैलांवर आहे. येथें मराठी चार इयत्तेपर्यंत शिक्षणाची सोय असून पोस्ट ऑफिसची सोय आहे.

याची लोकसंख्या ९२५ असून मुख्य वस्ती मराठा, हरिजन व इतर यांची आहे.

येथें दर मंगळवारीं संध्याकाळीं ३ ते ६ वाजेपर्यंत बाजार भरतो.

येथें बाजाराकरितां खालीं नमूद केलेल्या आसपासच्या गांवचे अदमासे १२५ लोक जमतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| वडरगें | १५० | २ |
| माद्याळ | १९७७ | १॥ |
| बाळेघोल | १३६४ | १॥ |
| हणबरवाडी | १५० | २ |

बाजार गांवांत पेठेंत रस्त्यावर भरतो व ही जागा पुरेशी आहे.

बाजारांत मुख्य जिन्नस तांदूळ, नाचणे, भाजीपाला वगैरे जीवनोपयोगी जिन्नस विक्रीस येतात.

या बाजारांत सर्वसाधारण १५० रुपयेपर्यंत उलाढाल होते. नेहमींच बाजार सर्वसाधारण भरतो.

या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाही.

या गांवचे लोकांस पिण्याच्या पाण्याची सोय म्हणजे विहिरी आहेत.

## जहागीर इचलकरंजी : ३ उत्तूर

१ जहागीर इचलकरंजीपैकी उत्तूर हें गांव असून आजरा, भैरेवाडी, उत्तूर या रस्त्यावर आजऱ्यापासून अदमासें सहा मैल अंतरावर आहे. येथें मुलकीपर्यंतच शिक्षणाची सोय असून पोस्ट-टपालाची सोय आहे.

२ या गांवची लोकसंख्या ३१५० असून मुख्य वस्ती मराठी, हरिजन व लिंगायत यांची आहे.

३ येथें दर शनिवारीं दुपारीं १२ वाजलेपासून संध्याकाळीं ६ वाजे-पर्यंत बाजार भरतो.

४ या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपास गांवचे आदमासें १५०० लोक जमतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| चामर्पे | ११४० | ५॥ |
| बामणें | २०२ | ४ |
| कडगांव | ५११ | ६ |
| पिंपळगांव | ११३४ | ३ |
| दिंडवाडी | १३० | ४॥ |
| हुडेवाडी | १२५ | २॥ |
| वडकशिवाले | ३१४ | ३॥ |
| कडगांव | १५२० | ३ |
| बखेवाडी | ४८५ | २ |
| शिपूर | ६४५ | ३ |
| करंबळी | ११६८ | ४ |
| करपेवाडी | ३९७ | २ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| म्हांगूड | ८३९ | ६॥ |
| बेळेवाडी | ६८३ | ४॥ |
| मायाळ | १९७७ | ५ |
| कापशी | १७५३ | ५॥ |
| व्हनाळी | ९२१ | ४ |
| आरदाळ | १३४२ | ३॥ |
| पेंढारवाडी | ३९ | ४ |
| भादवण | १४८७ | ३ |
| मडिलगें | १११४ | ३ |
| बहिरेवाडी | १७८९ | २॥ |

५ येथें बाजार पेठेंतील रस्त्यावर भरतो.

६ या ठिकाणीं गुरांचा बाजार भरत नाहीं.

७ या बाजारांत मुख्यत: सर्व प्रकारचें धान्य, कापड, तयार कपडे, लुगडीं, चोळखण, शेंग, मिरची, तंबाकू, किराणामाल, वाणसौदा, मासळी, भाजीपाला वगैरे जीवनोपयोगी सर्व जिन्नस विकावयास येतात.

८ या बाजारांत सर्वसाधारण चार ते पांच हजारापर्यंत उलाढाल होते.

९ या गांवचे लोक सरकारी तलावाचें पाणी पिण्याकरितां उपयोग करितात.

१० या गांवास शिपूर, बहिरेवाडी, उत्तूरमार्गें आजऱ्यास जाण्यास पक्का रस्ता आहे. उत्तूर–गडहिंग्लज रस्ता ६ मैल पावेतों कडगांवपर्यंत ३ मैल पक्का रस्ता व पुढें उत्तूरपर्यंत ३ मैल रस्ता होणें जरूर आहे. जखेवाडीहून माळानें रस्ता केल्यास फक्त एक नाल्यावर पूल बांधणें जरूर आहे. याप्रमाणें बाजारास येणेकरितां कांहीं आडमार्ग आहेत. ते दुरुस्त होणें जरूर आहे.

११ या गांवचे उत्तरेस एक तलाव आहे. तेथें जनावरांचा नवीन बाजार भरणेची सोय होणेसारखी आहे. कारण येथील लोकांची जनावरांचा बाजार भरविण्याबद्दल मागणी आहे. तसेंच येथील आठवड्याचा बाजार

मोठ्या प्रमाणांत भरत असल्यामुळें जनावरांचाहि बाजार बऱ्या प्रमाणांत भरूं शकेल.

## जहागीर इचलकरंजी : ४ आरग

आरग हें इचलकरंजी जहागिरीपैकीं संस्थानच्या मुलुखापासून अलग पडलेलें एक मोठें गांव आहे. मिरजपासून बार्शी लाईट रेल्वेवरील तिसरें स्टेशन म्हणजे आरग.

निम्याहून अधिक मराठे लोकवस्ती असलेल्या या गांवची एकूण लोकसंख्या ६७१४ आहे.

इथला बाजार गुरुवारचा आहे. दोनप्रहरीं २ वाजतां बाजारास सुरवात होते व संध्याकाळीं ७ वाजतां बाजारचे लोक घरीं परततात.

मारुतीचे देवळासमोरील पटांगणांत व त्यास लागून मिळणारे आळींत बाजारचे लोक इतस्ततः बसलेले असतात.

बेडग, नरवाड, म्हैशाळ, लोकूर, मंगसुळी, कैंपवाड, खटाव, निगनूर, बेळुंकी, शिपूर, एकोची वाडी व एरंडोली इत्यादि खालसा व पटवर्धनी संस्थानांतून लोक या बाजाराकडे आकर्षिले जातात. बाजार नियमितपणें भरत असून जोंधळा, कापूस, भुईमूग, मिरची इत्यादींची उलाढाल मोठ्या प्रमाणांत होते. अजूनही पांच हजाराचे खालीं उलाढाल होत नाहीं. यावरून त्या बाजाराच्या स्वरूपाची कल्पना करतां देण्या-सारखी आहे.

आजूबाजूचे गांवांना गाडीरस्ते आहेत. विहिरींच्या योगें गांवास पाणीपुरवठा होतो.

हा गांव पानमळ्यांचें केंद्र आहे. हंगामांत प्रतिदिनीं १२५ ते १५० डाग (खाऊच्या पानाचे) मुंबईस रवाना होतात. एरव्हीं ७५ ते १०० डाग पाठविले जातात.

या भागांत एवढेंच "कोल्हापूर" चें गांव असलें तरी आजूबाजूस दुसरा बाजार जवळपास नसल्यामुळें खालसांतील गांवांना व मिरज, सांगली पैकीं कांहीं खेड्यांना बाजारासाठीं या गांवीं यावें लागतें. हें गांव या भागांतील "वडगांव" आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. धान्याचा बाजार फारच मोठ्या प्रमाणांत भरतो.

हल्लीं बाजार भरत असलेली जागा एवढ्या मोठ्या व्यापाराच्या दृष्टीनें विचार करितां अत्यंत अपुरी असलेनें बरीच कुचंबणा होते. बाजाराची व्यवस्थित मांडणी करण्यासाठीं बाजार येथून हलवून चावडीसमोरील भव्य पटांगणांत भरवावा. सावलीसाठीं या पटांगणांत मोठमोठाले वृक्ष आहेत, कांहीं जीर्ण इमारतीही पण आहेत. सरकारी दुमजली चावडीही आहे. याशिवाय दुसरी एक जागा सोईवार दिसते. गांवच्या ओढ्याकाठीं १५०×१५० फूट असा एक सरकारी जमिनीचा मालकीचा तुकडा आहे. अतिवृष्टी झाल्यास मात्र फक्त तेथें पाणी जाऊं शकतें.

## जहागीर तोरगल : १ चंदरगी

जहागीर तोरगलमध्यें क. चंदरगी हें गांव तोरगलपासून अदमासें दहा मैलांवर रामदुर्ग–कटकोळ–बागलकोट या मोठ्या रस्त्यावर आहे. कोल्हापूरपासून तें अदमासें नव्वद मैलावर असून यास गोकाक–यरगट्टीमार्गे जातां येतें. येथें प्राथमिक चौथी ईयत्तेपर्यंत शिक्षणाची सोय असून सरकारी लहानसा दवाखाना आहे.

(२) याची लोकसंख्या ६७१ असून मुख्य वस्ती लिंगायतांची आहे.

(३) येथें दर गुरुवारीं दोनप्रहरीं दोन तास बाजार भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपास गांवचे अदमासें ८०।९० लोक येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| गुदकोप | ५८७ | १ |
| मुरकटनाळ | ३१४ | २ |
| बिदनाळ | ८३५ | १ |
| तोरगट्टी | २७८ | १॥ |

(५) बाजार चंदरगी ते कटकोळ या रस्त्यावर भरतो.

(६) बाजारांत मुख्य जिन्नस भाजीपाला, वाणसौदा इत्यादि माल विक्रीस येतो.

(७) या बाजारांत सर्वसाधारण १०० रुपयेपर्यंत उलाढाल होते.

(८) या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाहीं.

(९) या गांवांत बऱ्याचशा विहिरी असलेनें पाण्याची भरपूर सोय आहे.

## जहागीर कागल (ज्यू०) — १ म्हाकवें

कागल ज्यू. जहागिरीतील या गांवीं जाण्यासाठीं कोगनोळीपासून ८ मैल पायवाटेनें जावें लागतें. रस्त्याच्या गैरसोईच्या त्या भागांतील सात खेड्यांपैकीं हें गांव सर्वांत मोठें असून येथील बाजारही सवळपास भरणाऱ्या सेंडूर, मेरांबे, बाणगें इत्यादि बाजारांपेक्षां मोठ्या प्रमाणांत भरतो.

मराठा वस्तीच्या या गांवची लोकसंख्या १८६० एवढी आहे.

चावडीसमोर बाजार भरतो. बाजारचा दिवस रविवार असून बाजार १ ते ६ वाजेपर्यंत भरतो.

बाजारास लोक खालील गांवचे येतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| सेंडूर | १४९४ | ४ |
| बाणगें | १३४२ | ३ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| गोरंबें | १२२१ | २ |
| केनवडें | ८०४ | ३ |
| पिराची वाडी | ५६५ | २॥ |
| म्हनाळ | ९२१ | ३ |
| अनूर | १०३५ | ४ |
| कोळेंग | १०९३ | ४ |

शिवाय सौंदळगें, कागल, कुर्ली, बस्तवडें, चिखली, कोगनोळी व मविवडें इत्यादि गांवांहून लोक व्यापारासाठीं येतात.

जोंधळा, मिरची, तांदूळ, नाचणा, भुईमूग, इतर जिन्नस यांचा व्यापार मोठ्या प्रमाणांत होतो. १०००।१५०० वर होणारी व्यापारी-उलाढाल आज मितीस ५०००चे वर गेली आहे.

रस्त्यांची कल्पनातीत गैरसोय व पिण्याचे पाण्याची दुर्मीळता. यामुळें जनतेला अत्यंत त्रास होत आहे.

दिवसेंदिवस व्यापार वाढत चालला आहे. मुरगूड, कागल, निपाणी व कोगनोळी हीं बाजारकेंद्रें बऱ्याच अंतरावर आहेत त्यामुळें आजूबाजूच्या खेड्यांना याच बाजाराचा आधार आहे.

गुरांचे बाजाराची उणीव तीव्रतेनें भासते.

हल्लींच्या अपुऱ्या जागेंतून बाजार उठवून मरगाईच्या देवाळाचे प्रांगणांत पद्धतशीर बांधणी केल्यास बाजारास अति उत्तम होईल. ही जागा सरकारी मालकीची आहे.

## जहागीर कागल (ज्यू.) : २ शेंडूर

हा गांव कागल ज्यूनियरपैकी कोगनोळीपासून ६ मैलांवर आहे.

येथील लोकसंख्या १४९४ आहे. मराठा लोकांची वस्ती अधिक आहे.

बाजार बुधवारी सायंकाळी ४ ते ६ वाजेपर्यंत भरतो.

बाजार भरण्याचें ठिकाण चावडीलगतची गल्ली आहे.

बाजारांत जोंधळा, तांदूळ, मिरची भुईमूग, लोणी व भाजीपाला इत्यादींचा व्यापार होतो. व्यापारी उलाढाल २००० रुपयांपर्यंत होत असावी असा अंदाज आहे.

बाजारास कागल, व्हन्नाळ, मतिवडे, शंकरवाडी, बामणी, गोरंबें, बेनवडे, शिदनोरी इत्यादि ठिकाणांहून लोक येतात.

रस्त्याची अत्यंत गैरसोय आहे. इलाखा पंचायतीनें बांधलेला पिण्याचे पाण्याचा एक मोठा आड आहे. पण तो ओढ्याचे पलिकडे असलेनें, ओढ्यास पाणी आलें म्हणजे आडास पाण्यास जातां येत नाहीं. पाण्याची सोय समाधानकारक नाहीं.

गांवच्या एका बाजूस ओढा असून दुसऱ्या बाजूस डोंगर आहे. डोंगराकडील बाजूस पाण्याची सोय मुळीच नाहीं. व ओढ्याकडील बाजूस पाणी आल्यास त्रास होतो. म्हणून बाजारास योग्य अशी जागा गांवाबाहेर पाहणें सयुक्तिक वाटणारें झालें आहे.

## जहागीर कागल (ज्यू०) ३ गोरंबें

कागल ज्यूनियरपैकी हा गांव बामणें व शेंडूर यांच्या मध्यावर वसला आहे.

येथील लोकसंख्या १२२१ असून बहुतेक सर्व लोक मराठा आहेत.

मरगाईच्या भव्य पटांगणांत शनिवारीं ४ ते ६ पर्यंत येथील बाजार भरतो.

व्यापारासाठीं जोंधळा, तांदूळ व भाजीपाला बाजारास येतो. याची विक्री अंदाजें ५०० रुपायांपर्यंत होत असावी.

बाणगें, शेंडूर, बेनवडें, शिदनोरी, शंकरवाडी, मतिवडें वगैरे ठिकाणाहून लोक येतात.

गुरांचा बाजार नाहीं, पाण्याची विशेष चांगली सोय नाहीं, अशा या लहानशा गांवांत व्यापार वाढण्याचीं चिन्हें मुळींच नाहींत.

बाजारास आहे ती जागा उत्तम आहे.

## जहागीर हिंमतबहादूर : १ किणी बाजार-केंद्रें

हिम्मतबहादुरांचा हा गांव संस्थानच्या सरहद्दीवर आहे. वारणा अगदीं जवळून वाहाते. पुणें-बंगळोर रस्ता गांवास चाटून जातो.

२८२३ लोकसंख्येपैकीं चौथा हिस्सा मराठ्यांनीं व्यापलेला आहे व हरिजनांची वस्ती आठव्या हिस्साइतकी आहे.

दर शुक्रवारीं दुपारीं ३ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत साप्ताहिक बाजाराची उलाढाल होते.

वठार, वडगांव, भादूरवाडी, घुणकी, आंबप व पारगांव इत्यादि गांवचे लोक येथें बाजारास येतात.

बाजार भरतो तो मारुतीचे देवालयाचे आसमंतांत.

जोंधळा, मिरची, भुईमूग व भाजीपाला इत्यादींची खरेदीविक्री पूर्वी बऱ्याच प्रमाणांत होत असे. हल्लीं बाजार किरकोळ स्वरूपाचा झाला आहे.

१५।२० हजारावरची उलाढाल १५०० ते २००० वर येऊन बसली आहे.

वर्षाकाळचे दिवस सोडल्यास बाकीचे आठ महिने बाजार नियमित व व्यवस्थित भरतो.

गुरांचा बाजार येथें भरत नाही व त्याची आवश्यकताही पण नाही. येथून दोन मैलांवर वडगांव आहे व तेथील जनावरांचा बाजार ख्यातनाम व उल्लेखनीय आहे.

बाजारास व्यवस्थित स्वरूप द्यावयाचें झाल्यास (१) मारुती देवाळयाचें पटांगण; (२) गांवच्या पश्चिमेचे गायरान; या दोन जागांपैकीं एकीची निवड बाजारासाठीं केल्यास विशेष सोईचें होण्यासारखें आहे.

(१) देवालयाचें पटांगण—मारुतीचें देऊळ केंद्रस्थानी धरून भोंवतालीं जी मोकळी जागा आहे त्या ठिकाणीं व्यवस्थितपणें बाजार बसविणें शक्य आहे. गांवाच्या प्रवेशद्वारी ही जागा असलेनें व्यापारी व गांवकरी या ठिकाणीं बाजार भरविणेस अनुकूल आहेत.

(२) गायरान—गांवाचे पश्चिमेस दोन फर्लोंगावर गायरान आहे. पाण्याची सोय होण्यासारखी आहे. जवळच हिम्मतबहादुरांची एक मोठी विहीर आहे.

## जहागीर हिंमतबहादूर : २ हलकर्णी

हलकर्णी हें गांव हिंमतबहादूर जहागिरीपैकीं आहे. कोल्हापूर बेळगांव या रस्त्यावर ४४ मैलांपासून खानापूर (ब्रि) पासून तीन मैल आंत हें गांव आहे. सर्व रस्ता खडीचा असून मोटार सर्व्हिस आहे. येथें मुलकीपर्यंत शिक्षणाची सोय असून येथील शाळा कोल्हापूर संस्थानांतील एक नमुनेदार शाळा समजली जाते. येथें पोस्टाची सोय असून वैद्यकीय केंद्र आहे. मिरची व गुळाकरतां लहानशी पेठ आहे. हलकर्णी तपकिरीविषयीं फारच प्रसिद्ध आहे.

(२) या गांवची लोकसंख्या ३४०५ असून मुख्य वस्ती मराठा, लिंगायत व जैन यांची आहे.

(३) येथें दर बुधवारीं सकाळीं ९ वाजल्यापासून संध्याकाळीं ६ वाजे-पर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपासच्या गांवचे अद-मासें २००० लोक जमतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| खानापूर ( ब्रि. ) | — | ३ |
| हुंचनाळ | १३१७ | ४ |
| चंदनकुड | २२५ | १ |
| हदरगुची | ५३७ | ३ |
| कडलगें | १११४ | ४ |
| नांगनूर | १०७० | ५ |
| बसर्गे | २०८१ | १ |
| खणदाळ | १३०४ | ४ |
| हिटणी | १७२५ | ५ |
| यत्रेचवंडी | ६४० | २ |
| नोकूड | ८१९ | ४ |
| नंदनवाड | ७४० | २ |
| कुंवळहाळ | ३५४ | १ |
| बुगडीकट्टी | ११०४ | ४ |
| मनवाड | ७४० | ३ |
| नरेवाडी | ९४१ | ४ |
| तुरराडी | ३९५ | ४॥ |
| हिडदुगी | ७६२ | ५ |

(५) बाजार गांवचे मुख्य पेठेंतील अरुंद रस्त्यावर भरतो.

(६) या बाजारांत मुख्य सर्व प्रकारचें धान्य, तंबाकू, मिरची, शेंग, कापड, तयार कपडे, घोंगडीं, चोळखण, लुगडीं, किराणा माल, वाणसोदा, भाजीपाला वगैरे जीवनोपयोगी सर्व जिन्नस विकावयास येतात.

(७) या बाजारांत सर्वसाधारण ५ हजार रुपयेपर्यंत उलाढाल होते; आणि शेंग, मिरची, कापूस यांचे हंगामामध्यें दर बाजारीं १० हजार रुपयेपर्यंत उलाढाल होते.

(८) सुगीच्या दिवसांत बाजार मोठा भरतो व इतर वेळीं सर्वसाधारण बरा भरतो.

(९) या बाजारांत गुरांचा बाजार भरत नाहीं. या गांवालगत एक ओढा आहे. त्याचे बाजूस झाडी आहे. गुरांचा बाजार भरण्यासारखी सोय आहे. लोकांची गुरांच्या बाजाराकरितां मागणी आहे व त्यास लागणारी मदत करण्यास त्यांची तयारी आहे.

(१०) या गांवांत बऱ्याचशा विहिरी आहेत व लगत ओढा आहे. यामुळें पाण्याची सोय चांगली आहे.

(११) या बाजारास बाकीच्या आजूबाजूच्या खेडेगांवचे लोकांना बाजारास येणेची पायवाटांशिवाय दुसरी सोय नाहीं. तरी खालील रस्ते होणें जरूर आहे:-

१ हलकर्णी-कुंबळहाळ-नंदनवाड-नोकूड.

२ हलकर्णी-बसर्गे-नूल.

३ हलकर्णी-चंदनकूड-हदरगुची-कडलगे-नागनूर.

४ हलकर्णी-बसर्गे-हिटणी.

## जहागीर कापशी :

### १ कापशी

कापशी हें जहागिरीचें मुख्य ठिकाण असून कोल्हापुरापासून ३४ मैलांवर आहे. निपाणी ते गैबीखिंड या रस्त्यावर निपाणीपासून ३ मैलांवर या गांवास जाणारा ६ मैलाचा रस्ता आहे. येथें इंग्रजी ४ थी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. तसेंच दररोजच्या पोस्टाचीही सोय आहे. सरकारी मोफत दवाखाना आहे.

(२) गांवची लोकसंख्या २७५३ असून यांत मराठ्यांची वस्ती अधिक आहे. बाजार चावडीजवळ मिळणारे तीन अरुंद रस्त्यांवर भरतो.

(३) दर सोमवारीं दुपारीं १२ वाजलेपासून सायंकाळीं ६ वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) खालीं नमूद केलेल्या गांवचे अंदाजें चार हजार लोक या बाजारास येतातः—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| आलाबाद | ८११ | १॥ |
| बेलेवाडी (मासा) | २७२ | २ |
| हळदी | १०९३ | ४ |
| हळदवडें | २९६ | ४॥ |
| करंजिवणें | ५९९ | ३ |
| बेनिक्रे | १७१७ | ३ |
| अर्जुनवाडा | ५८० | २॥ |
| हमिदवाडा | १७६० | ४ |
| मेतका | ४५० | ३ |
| निंगनूर | १६८६ | ६ |
| खडकेवाडा | ९५४ | ६ |
| गलगला | ७०७ | ५ |
| येंडूर | | ३ |
| बाळिक्रे | १६५ | २ |
| बेनाळ | ६०४ | ३ |

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
| --- | --- | --- |
| मुंगळी | ६१६ | २॥ |
| नंद्याळ | ६७६ | २ |
| बाळेघोल | १३६४ | २ |
| तमनाकवाडा | ८९९ | १॥ |
| वडगांव | ८२५ | १॥ |
| बेळेवाडी ( काळमा ) | ७९३ | ३ |
| हसूर ( खु॥ ) | ९६४ | ४॥ |
| ठाणेवाडी | १२७ | ४॥ |
| कासारी | ६३० | २ |

(५) जोंधळा, तांदूळ, मिरची, तंबाकू, शेंग, वाणसौदा, कापड वगैरे जीवनोपयोगी वस्तू या बाजारांत येतात.

(६) गुरांचा बाजार भरत नाहीं.

(७) ऑक्टोबर ते जूनपर्यंत येथें मोठा बाजार भरतो व बाकीचे वेळीं सर्वसाधारण भरतो; अदमासें १० हजारापर्यंत उलाढाल होते.

(८) पावसाळ्यांत बाजार अगदींच लहान प्रमाणांत भरतो याचें कारण गांवाजवळून वहात जाणाऱ्या चिकोत्रा नदीवर पूल नाहीं. हा पूल जर गांवच्या पश्चिमेकडील बाजूस बांधला तर आजूबाजूच्या १५।२० खेड्यांतून येणाऱ्या लोकांना सोईस्कर होऊन बाराही महिने बाजार चांगला भरेल.

(९) बाजारास येणाऱ्या लोकांकरितां पिण्याचे पाण्याची सोय नसून त्यांना विश्रांतीकरितां मोटी धर्मशाळा नाहीं. हल्लीं बाजार भरत असलेली जागा अपुरी आहे. व अरुंद रस्त्यावरच बाजार भरत असलेकारणानें रहदारीस अत्यंत अडथळा होतो. तेव्हां एखादी धर्मशाळा, सार्वजनिक विहीर व बाजार भरणेकरितां गांवाबाहेर एखादें पटांगण इतक्या सोई करून मिळाल्यास बाजारवाढीस मदत होईल.

(१०) निपाणी-गारगोटीपासून येणारा हा कापशीचा रस्ता तसाच पुढें वाढवून उत्तूर-बहिरेवाडी-आजरा या रस्त्यास मिळविल्यास येथें व्यापाराची मध्यम प्रतीची पेठ होऊं शकेल.

## जहागीर कापशी : २ खडकलाट

कापशी जहागिरींतील हें गांव असून निपाणी–चिकोडी रस्त्यावरील चौथ्या मैलापासून आंत या गांवास जावें लागतें. येथें मुलकीपर्यंत शिक्षणाची सोय असून दररोजच्या पोस्टाची टपालाची व्यवस्था आहे.

(२) या गांवची लोकसंख्या ६६९५ असून मुख्य वस्ती लिंगायत, मराठा यांची आहे.

(३) येथें दर बुधवारीं दुपारीं १२ वाजल्यापासून संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत बाजार भरतो.

(४) या बाजारास खालीं नमूद केलेल्या आसपासच्या गांवचें अदमासें दोन हजारपर्यंत लोक जमतात:—

| गांवाचें नांव | लोकसंख्या | अंतर मैल |
|---|---|---|
| वाळकी | १८९१ | ५ |
| पट्टणकुडी | ३८८१ | ४ |
| रामपूर | ८६२ | ५ |
| चिखलव्हाळ | ११७१ | ३ |
| पांगिरें | ७८९ | ३ |
| मनुचीवाडी | ३०० | ३ |
| संकणवाडी | ७०० | २ |
| नवनिहाळ | १३२१ | २॥ |
| पिराचीवाडी | ४५० | २ |
| शिरगांव | २७०१ | ५ |

(५) येथें बाजार मुख्य पेठेंत भरतो.

(६) या बाजारांत मुख्य सर्व प्रकारचें धान्य, तंबाकू, शेंग, मिरची, कापड, तयार कपडे, वाणसौदा, लुगडीं, चोळखण, भाजीपाला वगैरे जीवनोपयोगी सर्व प्रकारचे जिन्नस विकावयास येतात.

(७) या बाजारांत सर्वसाधारण दहा हजार रुपयेपर्यंत उलाढाल होते.

(८) या गांवास सार्वजनिक पिण्याचे पाण्याची सोय नसून गांवांत खासगी आड आहेत, त्यांचा पिण्याचे पाण्याकडे उपयोग होतो.

(९) गुरांचा बाजार भरत नाही.

(१०) या बाजारास जाण्याकरितां निपाणी-चिकोडी रस्त्याला जोडून नवीनच रस्ता केलेला असून नियमित जाणारी मोटरसर्व्हिस आहे.

(११) बाजार नवीन होणाऱ्या वसाहतीचे पूर्व बाजूस खुल्या असलेल्या जागेत नेऊन तेथें शेडस् बांधून मिळाल्यास बाजारचे दृष्टीनें सोईचें होईल.

## बाजारयोजना व त्यांवरील खर्चासह तपशील

मागील प्रकरणांत प्रत्येक गांवीं कोणकोणत्या योजना करणें जरूर आहे याबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहेच. त्यावर अंदाजिक खर्च किती करावा लागेल याची तांत्रिक कल्पना येण्याकरितां खालील तक्ता तयार केलेला आहे:—

| बाजाराचें गांव | योजना | अंदाजी खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|
| **पेटा करवीर** | | | | |
| १ कोडगांव | येथें तूर्त कांहींच करणेची गरज नाहीं. बाजार अगदीं अल्प प्रमाणावर भरतो. | | | नदी उन्हाळ्यांत न अटणारी ५ फर्लो-वर आहे. |
| २ हसूर | शेड्स दोन पाहिजेत. विहीर, रस्ता हसूर ते शिरोली. | ५०००,६००० २००० | १३००० | विहिरीची योजना (बाजारालगत) केली आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ खेबवडे | हौद्स दोन, एक विहीर | ५०००,६००० | ११००० | गांवापासून १ फर्लांगवर (उन्हाळ्यांत आटणारी) दूधगंगा नदी आहे. |
| ४ इस्पुर्ली | हौद्स दोन. | ५००० | ५००० | बाजार जागेजवळ विहीर बांधणेची योजना झाली आहे. |
| ५ सांगरूळ | हौद्स दोन, विहीर एक. | ५०००<br>+६००० | ११००० | डोंगरांतील झऱ्याजवळ विहीर खुदाई १६ फूट झाली आहे. |
| —<br>५ | | | | |
| पेटा शिरोळ | | | | |
| १ घोसरवाड | — | — | — | विहीर खुदाईचें काम हातीं घेतलें आहे. |
| २ दत्तवाड | हौद एक | २५०० | २५०० | नदीवर टॉवर बांधून पुरा झाला आहे. |
| ३ नांदणी | हौद एक | २५०० | २५०० | — |
| ४ शिरोळ | हौद्स, दोन पाण्याचा नळ बाजारांत. | ५००० | ५००० | — |
| —<br>४ | | | | |

| बाजाराचें गांव | योजना | अंदाजी खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|
| पेटा हातकणंगलें | | | | |
| १ हेर्ले | शेड एक, विहीर | २५०० | २५०० | विहीरखुदाईचें काम हातीं घेतलें आहे. |
| २ पारगांव | शेड एक | २५०० | २५०० | विहीरीबा॥ फ. १३५४ योजना झाली आहे. |
| ३ सांगाव | शेड एक | २५०० | २५०० | विहीर खुदाईचें काम हातीं घेतलें आहे. |
| ४ वठार तर्फ वडगांव | — | — | — | पीराचा आड बांधण्याची योजना अद्यापि हातीं घ्यावयाची आहे. |
| ५ कुंभोज | शेड्स दोन | ५००० | ५००० | विहीरीस घर न मिळाल्यानें विहीर-खुदाई बंद केली आहे. |
| ६ हातकणंगलें | शेड्स दोन, विहीर एक | ५००० | ५००० | नळानें पाणी आणणेंबा॥ म्यु. कडून विचार चालू आहे. |
| ७ रुकडी | शेड्स दोन, पाण्याचा नळ बाजारांत नेणें आवश्यक आहे. | ५००० | ५००० | तलाव दरबारचे ताब्यांत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ यळगूड | — | — | | — | विहीर खुदाईचें काम चालू आहे. |
| ९ आळते | एक हौद | २५०० | | २५०० | |
| १० रेंदाळ | हौदस दोन | ५००० | | ५००० | तलावाचे बाजूस खोदलेली विहीर खोदून बांधणें. |
| ११ हुपरी | हौदस दोन, पाण्याचा नळ बाजारांत नेणें आवश्यक. झाडांची लागवड | ५००० | | ५००० ५००० | |
| —<br>११ | | | | | |
| पेटा पन्हाळा | | | | | |
| १ पन्हाळा | हौदस दोन | ५००० | | ५००० | |
| २ कळे | हौदस दोन, विहीर एक, झाडांची लागवड | ५००० | | ५००० | मोठी विहीर बांधण्याची योजना हातीं घ्यावयाची आहे. |
| ३ कोतोली | हौद एक | २५०० | | २५०० | विहीरखुदाईचें काम हातीं घेतलें आहे |
| ४ सातवे | हौद एक, विहीर एक | २५०० | | २५०० | वारणा नदी २ फर्लांगावर आहे. |

| बाजाराचें गांव | योजना | अंदाजी खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|
| ५ मालें | | | | |
| ६ पडळ | | | | |
| ७ बाजार भोगांव | शेड्स दोन | ५००० | ५००० | कासारी नदी ४ फर्लांगवर आहे. |
| ८ कोडोली | शेड्स दोन, विहीर एक | ५००० | ५००० | नदीपासून नळानें पाणी आणण्याची तरतूद करण्याची व्यवस्था हातीं घ्याव-याची आहे. |
| — ८ | | | | |
| जहागीर विशाळगड | | | | |
| १ महागांव | शेड्स दोन | ५००० | ५००० | |
| २ कापशी | शेड एक, विहीर एक | २५०० +१००० | ८५०० | |
| — २ | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जहागीर बावडा | | | | |
| १ तिरंगी | शेडूल दोन | ५००० | | ५००० |
| २ गगन बावडा | शेडूल दोन, पाण्याची विहीर | ५००० | +६००० | ११००० |
| ३ धुंदवडे | | | | |
| ४ भुई बावडा | | | | |
| ५ राशिवडे | शेडू एक | २५०० | | २५०० |
| ६ पळसंबे | शेडू एक | २५०० | | २५०० |
| — | | | | |
| ६ | | | | |
| जहागीर कागळ | | | | |
| १ कागळ | शेडूल दोन, बाजारांत नळानें पाणी नेणें | ५००० | | ५००० |
| २ मुरगूड | | | | |

| बाजाराचें गांव | योजना | अंदाजी खर्च | एकूण | शेरा |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ चिखली | | | | |
| — | | | | |
| १ | | | | |
| जहागीर इचलकरंजी | | | | |
| १ मणेराजुरी | शेड् एक | २५०० | २५०० | |
| २ भैरेवाडी | शेड् एक | २५०० | २५०० | |
| ३ उत्तूर | शेड् एक | २५०० | २५०० | |
| ४ आरग | शेड्स दोन | ५००० | ५००० | |
| — | | | | |
| ४ | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| जहागीर तोरगळ | | | |
| १ चंदरगी | | | |
| — | | | |
| १ | | | |
| जहागीर कापशी | | | |
| १ कापशी | घोड्स दोन, विहीर एक | ५०००<br>+६००० | ११००० |
| २ खडकलाट | घोड् एक, विहीर एक | १५००<br>+७००० | ८५०० |
| — | | | |
| २ | | | |
| जहागीर कागल(ज्यु.) | | | |
| १ येडूर | घोड् एक | २५०० | २५०० |

| बाजाराचें गांव | योजना | अंदाजी खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|
| २ म्हाकवें<br>२ गोरंबें<br>—<br>२ | शेड् एक, विहीर एक | २५००<br>+६००० | ८५०० | |
| जहागीर हिंमत-बहादूर | | | | |
| १ किणी | शेड् एक, विहीर एक | २५००<br>+६००० | ८५०० | |
| २ हलकर्णी<br>—<br>२ | शेड् एक | २५०० | २५०० | |

पेटा राधानगरी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ राधानगरी | हौद दोन | ५००० | ५००० | — |
| २ घोटवडे | हौद एक | २५०० | २५०० | — |
| ३ शरवडे | हौद दोन | ५००० | ५००० | नदी असलेनें विहीरीची आवश्यकता नाही. |
| ४ वाळवे | हौद एक | २५०० | २५०० | — |
| ५ टिकपुर्ली | हौद एक | २५०० | २५०० | विहीर बांधली आहे. |
| ६ धामूड | हौद एक, विहीर पुरी करून पाहिजे. | २५०० | २५०० | विहीरीची योजना करणेंत आली आहे. |
| ७ तारळे | हौद एक | २५०० | २५०० | — |
| — | | | | |
| ७ | | | | |

पेटा गारगोटी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ गारगोटी | हौद एक, विहीर एक | २५०० | २५०० | नदीचें पाणी हौदांत आणून पुरवठा करण्याच्या योजनेचा विचार चालू आहे. |
| २ पिंपळगाव | हौद एक, विहीर एक | २५०० | २५०० | विहीरखुदाईची योजना करणेंत आली आहे. |

| बाजाराचें गांव | योजना | अंदाजी खर्च | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|
| ३ पाटगांव | — | — | — | विहीर खुदाईची योजना करणेंत आली आहे. |
| ४ शेणगांव | शेड् एक | २५०० | २५०० | विहीरीची दुरुस्ती होत आहे. |
| ५ मडिलगे बुद्रुक | — | — | — | तलावावर टॉवर बांधणेंत आला आहे. |
| — | | | | |
| ५ | | | | |
| पेटा गडहिंग्लज | | | | |
| १ नेसरी | शेड्स दोन, विहीर एक | ५००० +६००० | ११००० | — |
| २ नूल | शेड् एक | २५०० | २५०० | — |
| ३ शिरगांव | शेड् एक, विहीर एक | २५०० | २५०० | खासगी विहीरीपकीं महनशेट्टी यांची विहीर बांधणेची योजना हातीं घ्यावयाची आहे. |
| — | | | | |
| ३ | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| महाल शाहूवाडी | | | | |
| १ भेंडवगांव | — | — | — | विहीर खुदाईची योजना करणेंत आली आहे. |
| २ कुडची | घेड् एक, विहीर एक | २५०० | २५०० | विहीर खुदाईचें काम हातीं घेतलें आहे. |
| ३ बावनसौंदत्ती | घेडूस दोन, विहीर एक | ५००० | ५००० | — |
| — | | | | |
| ३ | | | | |
| महाल रायबाग | | | | |
| १ चिंचली | घेडूस दोन | ५००० | ५००० | — |
| २ रायबाग | घेडूस दोन, विहीर एक | ५००० | ५००० | विहीरीचें बांधकाम हातीं घेतलें आहे. |
| ३ भेंडवाड | घेडूस दोन, विहीर एक | ५००० +६००० | ११००० | — |
| — | | | | |
| ३ | | | | |
| महाल कटकोळ | | | | |
| १ कटकोळ | घेडूस दोन, विहीर एक | ५००० +६००० | ११००० | |

शेज्याच्या कोष्टकांत ज्या योजना इलाखा पंचायतनें हातीं घेतल्या आहेत किंवा पुऱ्या केल्या आहेत त्यांचा विचार विहिरी बांधणें खर्च 'अंदाजी खर्च' या कोष्टकांत दिलेला नाहीं. जेथें दिलेला आहे तेथें विहिरींची अत्यावश्यकता आहे.

या एकंदर योजनेस अंदाजिक ३,००,००० रुपये खर्च येणार आहे हें लक्षांत येईल. ही खर्चयोजना एकदम हातीं न घेतां १० वर्षांत पुरी करावी. म्हणजे वार्षिक तीस हजार रुपये खर्च केल्यास ही योजना १० वर्षांत पुरी होईल.

ज्या ज्या बाजार गांवीं बाजार भरण्याच्या ठिकाणीं व जनावरांचा बाजार भरण्याच्या ठिकाणीं झाडें नसतील त्या त्या ठिकाणीं झाडें लावण्याकरितां ११,००० रुपये अंदाजी खर्च धरणेंत आलेला आहे.

* या ठिकाणीं पाण्याची सोय असलेनें अथवा इलाखा पंचायत किंवा ग्रामपंचायतकडून विहीर बांधण्याचें अथवा पाण्याची सोय केलेली किंवा केली जाणार असलेनें विहिरीकरितां लागणारा खर्च दाखविलेला नाहीं.